म. ग्रं. सं. ठाणे.
विषय चरित्र
सं. क्र. २६२

REFBK-0001762

म. ग्रं. सं. ठाणे

# कै. श्रीमंत महाराज पतंगशहा राजेसाहेब, संस्थान जव्हार, यांचें चरित्र.

REFBK-0001762

गंगाधर अण्णाजी दिमोटे,

वकील, सं. जव्हार.

The Manoranjan Press, Bombay

अ. ग्रं. सं. ग्रंथालय
सं. इ. प. नं. २८८
८५

श्रीशंकर प्रसन्न.

# कै. श्रीमंत महाराज पतंगशहा राजेसाहेब, संस्थान जव्हार, यांचें चरित्र.

लेखक,

गंगाधर आण्णाजी दिमोटे, वकील, सं. जव्हार.

---

शके १८४२, सन १९२०

---

किंमत पांच आणे

---

सर्व अधिकार राखिले आहेत.

ग्रंथ संग्रहालय नं. २८८
दा. क. १७६२.

Printed by K. R. Mitra, at the Manoranjan Press,
3 Sandhurst Rd., Girgaon, Bombay;
and published by Gangadhar Annaji Demote, Vakil,
at Jawhar State.

श्रीशंकर प्रसन्न.

# अर्पणपत्रिका.

हें चिमुकलें पुस्तक

जव्हार संस्थानचे अधिपति

**श्रीमंत महाराज विक्रमशहा राजेसाहेब**

यांचे शेवेशीं,

त्यांची निस्सीम पितृभक्ति, नितांत धर्मनिष्ठा

व निरुपम प्रजावात्सल्य वगैरे गुणांनां लुब्ध होऊन

पुस्तककर्त्यांनें

अत्यंत नम्रतापूर्वक व प्रेमपूर्वक अर्पण केलें असे.

महाराजांचा नम्र स्वामिनिष्ठ सेवक,

गंगाधर आण्णाजी दिमोटे,

वकील, सं. जव्हार.

जव्हार,

ता. २३ माहे जुलई,

सन १९१९.

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# प्रस्तावना.

यात्येकतोऽस्तशिखरं पतिरोषधीनां
आविष्कृतारुणपुरःसर एकतोऽर्कः ॥
तेजोद्वयस्य युगपद्व्यसनोदयाभ्यां
लोको नियम्यत इवैष दशान्तरेषु ॥ १ ॥

[ शाकुंतल ]

**अवतरण**—कण्वमहामुनि शिष्यांसह शकुंतलेला नवऱ्याच्या घरीं पोंचविण्यासाठीं वद्य प्रतिपदेच्या पहाटेस आश्रमाबाहेर पडले, त्या वेळचा सृष्टिदेखावा कविकुलगुरु कालिदासानें वरील श्लोकाच्या पहिल्या अर्थात वर्णिला आहे. **अर्थः**—"पश्चिमेस क्षणोक्षणीं अधिकाधिक फटफटित होणारा चंद्र अस्तास जात आहे, तर पूर्वेस उदयोन्मुख सूर्याच्या अरुण प्रकाशाची वाढती लाली फुटत चालली आहे. दोन तेजस्वी गोलांचा एकाच समयीं होणारा अस्त व उदय यांनीं हा लोक भिन्न दशांतून नियमितच केला आहे."

पुरातन जव्हार संस्थानचे लोकप्रिय अधिपति कै० श्री० महाराज **पतंगशहा** राजेसाहेब यांची जेव्हां या संस्थानचे गादीवर स्थापना झाली, तेव्हांचा तो काल वरील श्लोकांतील भावार्थाला तंतोतंत जुळतो. त्या वेळीं जव्हार संस्थानचा तरुण राजा चौथा **विक्रमशहा** हा अकालीं एकाएकींच वारला. अशा मोठ्या नाजुक स्थितींत, ब्रिटिश सरकारच्या, हिंदुस्थानांतील राजेरजवाडे संस्थानिक यांचीं राज्यें व त्यांचे मानमरातब व अधिकार जसेच्या तसेच पूर्ववत् चालून, त्याला जेणेंकरून पुष्टि देतां येईल अशा प्रकारचे उदार राजकीय धोरणामुळेंच, जव्हार संस्थानच्या नृपमालिकेचा प्रतापसूर्य कायमचा अस्तंगत होऊन अंधकारगर्तेंत आपण बुडतों कीं काय अशा प्रकारच्या सर्व प्रजाजनांच्या निराशाजनक मनः-

स्थितींत, या चरित्रनायकाच्या भाग्यरवीचा उदय होऊन सर्वांचीं अंतःकरणें प्रमुदित झालीं. अस्तु.

चरित्र कोणाचें लिहावें, चरित्रांपासून फायदे कोणते वगैरे शंका मनांत येतात व जोतो आपापल्या बुद्धीप्रमाणें वरील शंकांचा निरास करून टाकतो. आपल्या महाभारत, रामायण इत्यादिकांतील थोर पुरुषांचीं चरित्रें वाचूनच श्रीशिवाजी महाराजांनीं स्वराज्य संस्थापना केली; पहिले बाजीरावानें स्वराज्यवर्धन केलें, व थोर पुरुषांच्या चरित्राकडे दुर्लक्ष केल्यामुळें दुसरे बाजीरावांनीं स्वराज्य नाश करून घेतला, हें आपण पहात आहों.

थोर व उदात्त पुरुषांचीं चरित्रें शीलसंवर्धनास उपयोगीं पडतात. ज्याचा स्वभाव निसर्गतः सात्त्विक असतो त्याला आपल्या नैसर्गिक स्वभावाची ओळख पटण्यास किंवा त्यांची पूर्ण वाढ करण्यास थोर पुरुषांच्या चरित्रांचें वाचन हेंच एक उत्तम साधन होत असतें; इतकेंच नव्हे तर ज्यांचा स्वभाव किंवा प्रकृति जन्मतः अपरिपक्क असेल त्यांसही सदर प्रकृति परिपक्व दशेस आणण्यास थोर पुरुषांच्या चरित्रांचा चांगला उपयोग होत असतो.

वरील सर्व विचार सुचण्याचें कारण आमचे मित्र रा. रा. गंगाधरपंत दिमोटे यांनीं लिहिलेलें कै. पतंगशहा राजेसाहेब यांचें चरित्र हें होय. स्वराज्यपर्वाच्या हल्लींच्या काळांत थोर पुरुषांचीं जितकीं जितकीं चरित्रें तरुण पिढीपुढें लायक, कर्त्या व विद्वान् लोकांकडून मांडलीं जातील तितकीं आह्मांस पाहिजेच आहेत. स्वराज्याचा पहिला हप्ता ज्या काळांत दिला जात आहे त्याच काळांत पूर्वी ‘ प्रजाप्रिय ’ होऊन गेलेल्या हिंदुस्थानांतील एका राजाचें चरित्र बाहेर जगासमोर येत आहे हा योग किती उत्साहजनक आहे बरें !

एकाद्या पुरुषाचें चरित्र लिहिणारा इसमही जर चरित्रनायकाच्या कृतीशीं संलग्न नसेल, ह्मणजे त्या चरित्रनायकासंबंधीं पूर्ण माहितगार नसेल तर तें चरित्र ओजस्वी वाङ्मयांत गणतां येणार नाहीं. आमचे मित्र रा. दिमोटे हे बालपणापासून या जव्हार संस्थानांतच वाढले, व त्या संस्था-

नच्या निरनिराळ्या खात्यांत कारकुनीचीं कामें करीत करीत आपल्या हुशारीनें संस्थानच्या प्रायव्हेट सेक्रेटरीच्या हुद्यापर्यंत चढले अर्थात् महाराज साहेबांचें, संस्थानचें हवापाणी, लोकस्थिति, संस्थानचीं निरनिराळीं खातीं वगैरेचें ज्ञान जसें चरित्रलेखकास असेल तसें इतरांस असणें शक्य नाहीं, व ह्मणूनच आह्मीं वर चरित्रनायकाचें चरित्र लिहिणाराशीं तादात्म्य असावें लागतें असें ह्मटलें आहे, व तें रा. दिमोटे यांस पूर्ण लागू पडतें, असें मला वाटतें.

आतां थोडीशी जव्हार संस्थानची माहिती देऊंया.

ठाणें जिल्ह्याच्या डोंगराळ प्रदेशांत जव्हार हें एक संस्थान आहे. या संस्थानांत वारली, कोळी, कातोडी, वगैरे—शिक्षणांत अत्यंत मागसलेल्या लोकांची वस्ती आहे. येथील हवा साधारण ' मलेरियस.' सह्याद्रि पर्वत लागून असल्यानें ह्या भागांत हवा ऊष्ण यामुळें येथें पाऊस फार पडतो. व भात, तुरी, नागली, वरी, तीळ, इत्यादि धान्यें पुष्कळ होतात; पण या संस्थानची विशिष्टता कायम रहाण्यास येथें जंगलचें इमारती लांकडांचें उत्पन्न फार येतें हेंच होय.

जव्हारीस यावयास बी. बी. सी. आय्. रेल्वेचें स्टेशन डाहाणू हें लागतें. या स्टेशनापासून ३८ मैलांवर जव्हार हें शहर आहे. हवा साधारण, लोक मागसलेले, दळणवळणाचे साधनांचा अभाव, हाताखालीं ठेवावयाच्या नोकरांची टंचाई, अशी स्थिति जेव्हां कै. पतंगशहा महाराज यांनीं पाहिली तेव्हां लायक नोकर त्यांनीं नेमिले. गुजर, वाणी, ठक्कर, मारवाडी, ब्राह्मण वगैरे लोकांना जमीन लागवडीकरितां सवलतीनें दिली. व डहाणू ते थेट जव्हारपर्यंत दगडी सडक बांधली. यांनींच जव्हार स्टेटमध्यें जिकडेतिकडे शाळा काढिल्या, इंग्रजीशाळा, संस्कृतशाळा, दवाखाना वगैरे संस्था जव्हारीस काढिल्या; जंगलचें उत्पन्न वाढविलें; रयतेस सुख दिलें; व संस्थानची सांपत्तिक स्थिति पुष्कळच सुधारली. असल्या पुरुषाचें चरित्र त्या संस्थानच्या अभिमान्यांनीं पूर्वीच लिहावयास पाहिजे होतें; पण ही उणीव आमचे मित्र रा. दिमोटे यांनीं भरून काढिली या बद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

स्थितींत, या चरित्रनायकाच्या भाग्यरवीचा उदय होऊन सर्वांचीं अंतःकरणें प्रमुदित झालीं. अस्तु.

चरित्र कोणाचें लिहावें, चरित्रांपासून फायदे कोणते वगैरे शंका मनांत येतात व जोतो आपापल्या बुद्धीप्रमाणें वरील शंकांचा निरास करून टाकतो. आपल्या महाभारत, रामायण इत्यादिकांतील थोर पुरुषांचीं चरित्रें वाचूनच श्रीशिवाजी महाराजांनीं स्वराज्य संस्थापना केली; पहिले बाजीरावानें स्वराज्यवर्धन केलें, व थोर पुरुषांच्या चरित्राकडे दुर्लक्ष केल्यामुळें दुसरे बाजीरावांनीं स्वराज्य नाश करून घेतला, हें आपण पहात आहों.

थोर व उदात्त पुरुषांचीं चरित्रें शीलसंवर्धनास उपयोगीं पडतात. ज्याचा स्वभाव निसर्गतः सात्विक असतो त्याला आपल्या नैसर्गिक स्वभावाची ओळख पटण्यास किंवा त्याची पूर्ण वाढ करण्यास थोर पुरुषांच्या चरित्रांचें वाचन हेंच एक उत्तम साधन होत असतें; इतकेंच नव्हे तर ज्यांचा स्वभाव किंवा प्रकृति जन्मतः अपरिपक्क असेल त्यांसही सदर प्रकृति परिपक्व दशेस आणण्यास थोर पुरुषांच्या चरित्रांचा चांगला उपयोग होत असतो.

वरील सर्व विचार सुचण्याचें कारण आमचे मित्र रा. रा. गंगाधरपंत दिमोटे यांनीं लिहिलेलें कै. पतंगशहा राजेसाहेब यांचें चरित्र हें होय. स्वराज्यपर्वाच्या हल्लींच्या काळांत थोर पुरुषांचीं जितकीं जितकीं चरित्रें तरुण पिढीपुढें लायक, कर्त्या व विद्वान् लोकांकडून मांडलीं जातील तितकीं आह्मांस पाहिजेच आहेत. स्वराज्याचा पहिला हप्ता ज्या काळांत दिला जात आहे त्याच काळांत पूर्वी 'प्रजाप्रिय' होऊन गेलेल्या हिंदुस्थानांतील एका राजाचें चरित्र बाहेर जगासमोर येत आहे हा योग किती उत्साहजनक आहे बरें !

एकाद्या पुरुषाचें चरित्र लिहिणारा इसमही जर चरित्रनायकाच्या कृतीशीं संलग्न नसेल, ह्मणजे त्या चरित्रनायकासंबंधीं पूर्ण माहितगार नसेल तर तें चरित्र ओजस्वी वाङ्मयांत गणतां येणार नाहीं. आमचे मित्र रा. दिमोटे हे बालपणापासून या जव्हार संस्थानांतच वाढले, व त्या संस्था-

नच्या निरनिराळ्या खात्यांत कारकुनीचीं कामें करीत करीत आपल्या हुशारीनें संस्थानच्या प्रायव्हेट सेक्रेटरीच्या हुद्यापर्यंत चढले अर्थात् महाराज साहेबांचें, संस्थानचें हवापाणी, लोकस्थिति, संस्थानचीं निरनिराळीं खातीं वगैरेचें ज्ञान जसें चरित्रलेखकास असेल तसें इतरांस असणें शक्य नाहीं, व ह्मणूनच आह्मीं वर चरित्रनायकाचें चरित्र लिहिणाराशीं तादात्म्य असावें लागतें असें ह्मटलें आहे, व तें रा. दिमोटे यांस पूर्ण लागू पडतें, असें मला वाटतें.

आतां थोडीशी जव्हार संस्थानची माहिती देऊंया.

ठाणें जिल्हयाच्या डोंगराळ प्रदेशांत जव्हार हें एक संस्थान आहे. या संस्थानांत वारली, कोळी, कातोडी, वगैरे–शिक्षणांत अत्यंत मागसलेल्या लोकांची वस्ती आहे. येथील हवा साधारण ‘ मलेरियस.’ सह्याद्रि पर्वत लागून असल्यानें ह्या भागांत हवा ऊष्ण यामुळें येथें पाऊस फार पडतो. व भात, तुरी, नागली, वरी, तीळ, इत्यादि धान्यें पुष्कळ होतात; पण या संस्थानची विशिष्टता कायम रहाण्यास येथें जंगलचें इमारती लांकडांचें उत्पन्न फार येतें हेंच होय.

जव्हारीस यावयास बी. बी. सी. आय्. रेल्वेचें स्टेशन डाहाणू हें लागतें. या स्टेशनापासून ३८ मैलांवर जव्हार हें शहर आहे. हवा साधारण, लोक मागसलेले, दळणवळणाचे साधनांचा अभाव, हाताखालीं ठेवावयाच्या नोकरांची टंचाई, अशी स्थिति जेव्हां कै. पतंगशहा महाराज यांनीं पाहिली तेव्हां लायक नोकर त्यांनीं नेमिले. गुजर, वाणी, ठक्कर, मारवाडी, ब्राह्मण वगैरे लोकांना जमीन लागवडीकरितां सवलतीनें दिली. व डहाणू ते थेट जव्हारपर्यंत दगडी सडक बांधली. यांनींच जव्हार स्टेटमध्यें जिकडेतिकडे शाळा काढिल्या, इंग्रजीशाळा, संस्कृतशाळा, दवाखाना वगैरे संस्था जव्हारीस काढिल्या; जंगलचें उत्पन्न वाढविलें; रयतेस सुख दिलें; व संस्थानची सांपत्तिक स्थिति पुष्कळच सुधारली. असल्या पुरुषाचें चरित्र त्या संस्थानच्या अभिमान्यांनीं पूर्वीच लिहावयास पाहिजे होतें; पण ही उणीव आमचे मित्र रा. दिमोटे यांनीं भरून काढिली या बद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

अठराव्या शतकांत अटकेपासून कटकेपर्यंत मराठ्यांच्या नांवाचा दरारा, मराठी राजे व त्यांचे प्रधान पेशवे बसवीत असतांही हें संस्थान स्वतंत्र होतें. हल्लींही येथील राजांचे हक्क कायम ठेवण्यांत आले आहेत. "राजा प्रकृतिरंजनात्" अशी राजा या शब्दाची कविकुलगुरु कालिदासानें व्याख्या केली आहे. या व्याख्येप्रमाणें कै. **पतंगशहा** यांचे ठायीं पुष्कळच गुण होते, व त्यांनीं आपल्या मुलांसही तसेंच शिक्षण दिलें होतें. हल्लींचे राजे साहेब ह्मणजे कै. पतंगशहा राजे यांचे द्वितीय चिरंजीव श्री. मार्तंडराव ऊर्फ भाऊसाहेब **विक्रमशाह महाराज** यांचेही आंगीं त्यांच्या वडिलांच्या आंगचे बरेचसे गुण उतरले आहेत. हल्लीं तेथें रावसाहेब गुणे यांचेसारखीं मेहनती, गुणी, करारी व राजकारणकुशल रत्नें आहेत, तेव्हां महाराजांनीं आपल्या वडिलांचें चरित्र आदर्श ह्मणून डोळ्यांपुढें ठेवून संस्थानच्या सर्व लोकांच्या 'जीवींचे जीव' व्हावें, व रयतेची, हाताखालच्या नोकरांची सर्वांगपूर्ण सुधारणा करून संस्थानचा उत्तरोत्तर उत्कर्ष करावा, व रावसाहेब गुणे यांच्या मदतीनें राज्यकारभार पहिले प्रतीचा चालवावा असें करण्यास हल्लींचे महाराज व त्यांचें कार्यकारी मंडळ यांस परमेशानें आयुरारोग्य द्यावें व दीर्घायु करावें अशी परमेशाची प्रार्थना करितों व असले पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याची मला संधि दिल्याबद्दल माझे मित्र रा. गंगाधरपंत दिमोटे यांचे पुनः एकवार आभार मानून व

सर्वे नुः सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ॥
सर्वे भद्राणि पश्यन्तु । न कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥

अशी त्या जगच्चालकाची प्रार्थना करून ही लांबलेली प्रस्तावना पुरी करितों.

डाहाणू, ता. ४ जानेवारी, सन १९२०.

आपला,
आत्माराम जनार्दन करंदीकर,
बी. ए., एल्एल्. बी., वकील, डाहाणू.

श्री.

# पुस्तककर्त्याचे दोन शब्द.

कै. श्रीमंत महाराज पतंगशहा राजेसाहेब सं. जव्हार यांचें हें लहासें चरित्र कसें व केव्हां लिहिलें ह्याबद्दल दोन शब्द लिहिणें अगदीं जरूरीचें आहे, असें वाटल्यावरून लिहितों. मला साधारण चांगलें समजूं लागल्या-पासून माझे परमपूज्य वडील कै. आण्णाजी बाळाजी दिमोटे पेन्शनर वांकनीस यांनीं जव्हारसंस्थानचा इतिहास व दंतकथा ज्या त्यांनीं आपल्या वडिलांकडून ऐकिल्या होत्या, व ज्या कांहीं त्यांनीं साक्षात् घडलेल्या पाहिल्या होत्या ( कारण त्यांचा लहानपणापासून अखेरपर्यंत सर्वकाळ— जव्हार येथेंच गेलेला होता. ) त्यासंबंधें मला गोष्टीच्या रूपानें पुष्कळ वेळां मनोरंजक व बोधप्रद माहिती देऊन जव्हारच्या गादीविषयीं दृढतर व निर्मल स्वामिभक्तीचें उत्कृष्ट बीजारोपण केलें. पुढें मी सन १९०४ पासून सन १९१७ पर्यंत श्रीमंतांचे पदरीं निरनिराळया जागेवर नौकर असतांना सरकारी कामकाजासंबंधें अनायासेंच दप्तरची साधार माहिती मिळविण्याची मला जी सुसंधि महाराजांच्या कृपेमुळें लाभली तिचा उप-योग करून, जव्हारसंस्थानसंबंधें कांहींतरी चार वेड्यावाकड्या ओळी लिहाव्या अशी मनांत स्फूर्ति उत्पन्न झाली. त्याप्रमाणें सन १९१७ सालीं माझे वडील वारल्यानंतर मी नोकरींतून मोकळा झाल्यावर मला जो वेळ मिळाला, त्यांत कै. श्रीमंत पतंगशहा महाराज व त्यांच्यासंबंधानें माझ्या वडिलांनीं गाइलेले धन्यवाद ह्याबद्दल वारंवार वारंवार स्मरण होऊन त्यांची कांहींतरी अल्पसेवा आपल्या हातून घडावी ह्या शुद्धबुद्धीनें हा लहानसा चरित्रलेख मी लिहिण्यास हातीं घेतला, व तो लिहितांना माझे मित्र कै. रा.रा. कृष्णाजी महादेव साने (सं.चे माजी कारभारी ) रा. रा. गणपतराव कापसे, (दप्तदार सं. जव्हार) व रा. रा. बाळकृष्ण

परशुराम फाटक, बी. ए. एल्‌एल्‌. बी., श्रीमंतांचे माजी प्रायव्हेट सेक्रेटरी, यांनीं आपला बहुमोल वेळ मोडून या पुस्तकांत ग्रथित करण्याच्या माहितीसंबंधें व रचनेसंबधें जी मदत वेळोवेळीं केली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. तसेंच, हल्लींचे संस्थानचे कारभारी रावसाहेब केशवरावजी गुणे यांनीं माझी हस्तलिखित प्रत तपासून महत्वाच्या सूचना देण्याचे कामीं आपला जो अमूल्य वेळ खर्च केला त्याबद्दल मी त्यांचा खरोखर अत्यंत ऋणी आहें. त्याचप्रमाणें माझ्या जव्हार येथील व बाहेर ठिकाणच्या सर्व मित्रमंडळींनीं मला हें चिमुकलें पुस्तक लिहिण्याचे कामांत निरनिराळया प्रकारें उत्तेजन देऊन साहाय्य केलें आहे याबद्दल मला फार धन्यता वाटते. आमचे परमपूज्य महाराज श्रीमंत विक्रमशहा राजेसाहेब यांचे शेवेशीं जेव्हां मी माझा वरीलप्रमाणें चरित्रलेखनाचा उद्देश निवेदन केला तेव्हां त्यांनीं त्यांच्या उदारःस्वभावानुरूप मला संस्थानच्या रेकार्डमधील जरूर ती माहिती घेण्याची परवानगी देऊन द्रव्यद्वारें मदत केली आणि या मुळेंच माझा उद्देश तडीस गेला, याबद्दल मी सर्वथैव श्रीमंतांच्या ऋणांतच आहें. कै. श्री. पतंगशहा महाराज याच्या सद्गुणांमुळें त्यांनीं किती लोकप्रियता संपादन केली होती हें त्यांचें चरित्र लिहिण्याचे कामांत मला सर्वांकडून जी मदत झाली त्यावरून स्पष्टतर होतें.

या पुस्तकास प्रस्तावनारूपी अलंकारानें सजविणेचें काम माझे मित्र रा. रा. आत्माराम जनार्दन करंदीकर, बी.ए., एल्‌एल्‌.बी., वकील कोर्ट डहाणू यांनीं केल्याबद्दल मी त्यांचा ही फार आभारी आहें. तसेंच—

हें पुस्तक सर्वांगसुंदर छापण्याचें काम मुंबई येथील मनोरंजन प्रेसचे मालक. श्रीयुत मित्र यांनीं हल्लींच्या कामाच्या गर्दीमध्यें व बिकट परिस्थितीमध्येसुद्धां फार लौकर करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानिल्याशिवाय माझ्यानें रहावत नाहीं. असो. शेवटीं सर्व वाचकवृंदांस माझी सप्रेम नम्र विनंति अशी आहे, कीं, त्यांनीं हंसक्षीर न्यायानें ह्या

माझ्या लहानशा लेखाचा स्वीकार करून मी माझ्या मातृभाषेची अत्यल्प सेवा करण्याचा जो प्रथमचा प्रयत्न केला आहे तो गोड मानून घ्यावा.

जव्हार.<br>
ता. १५ माहे जानेवारी<br>
सन १९२०

आपला नम्र,<br>
**गंगाधर आण्णाजी दिमोटे,**<br>
वकील.

# पोंच.

हें पुस्तक छापून पूर्ण होण्यापूर्वी ज्या सद्गृहस्थांनीं या कामास उत्तेजन देऊन द्रव्यद्वारें साहाय्य केलें त्या आश्रयदात्यांचीं नांवें.

| | रु. |
|---|---|
| श्रीमंत महाराज विक्रमशहा राजेसाहेब. | १५० |
| श्रीमंत राधाबाई राणीसाहेब. | २५ |
| रावसाहेब तुळाजीराव मुकुंदराव भांगरे. | १० |
| शेठ गुलाबदास रामदास वाणी. | १५ |
| शेठ कासम इमाम सातपुरे, जंगल मक्तेदार. | १० |
| शेठ धोंडू महिपती कासार. | १० |
| रा. रा. सखाराम बापूजी जोशी, जंगल मक्तेदार. | १० |
| रा. रा. भिकाशेट बाळा कोल्हे. | ५ |
| रा. रा. बाळकृष्ण महादेव सरदार. | ५ |

याखेरीज आणखी कांहीं सद्गृहस्थांनीं मदत करण्याचें मला आश्वासन दिलें असून त्यांचेकडून योग्य मदत होईल अशी पूर्ण उमेद आहे.

वरील सर्व आश्रयदात्यांचा मी फार अभारी आहें. ह्यांनीं मला असाच पुढेंहि वारंवार आश्रय देऊन माझ्याकडून आणखी निरनिराळीं पुस्तकें लिहून घेण्याच्या कामीं मला उत्तेजन द्यावें, अशी नम्र विनंति आहे.

आपला नम्र,

गंगाधर.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| | | पान. |
| प्रकरण १ लें, जव्हार संस्थानचें स्वाभाविक वर्णन. | ... | १ |
| प्रकरण २ रें, जव्हार संस्थानचा पूर्वेतिहास (वंशावळ.) | ... | ४ |
| प्रकरण ३ रें, श्री. पतंगशहा यांची पूर्वपीठिका, व बाळपण. | ... | ११ |
| प्रकरण ४ थें, शिक्षण व दरम्यानचा संस्थानचा राज्यकारभार..... | | १४ |
| प्रकरण ५ वें, अधिकारप्राप्ति व राज्यकारभार. ... | ... | १९ |
| प्रकरण ६ वें, आजारीपण व मृत्यु. (स्वभाव, वागणूक, मतें व त्यांचे सद्गुण) | | ४० |
| प्रकरण ७ वें, उपसंहार. ... ... ... | ... | ६१ |



कै. श्रीमंत महाराज पतंगशहा राजेसाहेब.

जन्मः—ता. ३० एप्रिल, १८५४ अवसानः--ता. २७ जानेवारी, १९०५

म. ग्रं. सं. ठाणें.
नं. १५६२


श्री

# कै. श्रीमंत महाराज पतंगशाह राजेसाहेब,

## संस्थान जव्हार,

# यांचें चरित्र.

## प्रकरण पहिलें.

### जव्हार संस्थानचें स्वाभाविक वर्णन.

( थोडक्यांत साधारण माहिती. )

जव्हार हें संस्थान मुंबई इलाख्यांतील ठाणे जिल्ह्यामध्यें आहे. याचें क्षेत्रफळ चौरस मैल ३१० असून दरसालचें उत्पन्न सवादोन लक्ष रुपये आहे. सन १९११ सालीं झालेल्या खानेसुमारीप्रमाणें ह्या संस्थानची एकंदर लोकसंख्या ५३,५०० आहे. ह्या संस्थानचा बहुतेक प्रदेश सह्याद्रि पर्वताच्या शाखांवरच असल्यानें पुष्कळसा भाग डोंगराळ आहे. खुद्द राजधानीचें शहर जें जव्हार तें समुद्र सपाटीपासून सुमारें दीड हजार फूट उंचीवर वसलेलें आहे. ज्या डोंगराच्या माथ्यावर हें गांव आहे त्याच्या पठाराचा भाग मधूनमधून उंच सखल आहेच; परंतु एकंदरीनें वस्ती करण्याजोगी ही जागा लंबवर्तुलाकार मैदानाची आहे. त्याच्याभोंवती बहुतेक सर्व बाजूंनीं ( जव्हार डाहाणू रोड व जव्हार मोखाडारोड खेरीज करून ) डोंगराचे कडे तुटलेले आहेत. ह्या कड्यांवरून सृष्टिसौंदर्याचा देखावा प्रत्येक ऋतूंत निरनिराळ्या प्रकारचा असा फारच नयनमनोहर दिसतो. संस्थानमध्यें दोन तीन नद्या बऱ्याच मोठ्या आहेत; तथापि एकंदरीनें हा सर्व प्रदेश देवमातृक आहे. संस्थानच्या बहुतेक सर्व भागांत साग, सिसव, ऐन व बांबू वगैरे जातींचीं झाडें मुबलक आहेत. जंगला-

मध्यें वाघ, तरस, रानडुकरें, कोल्हे, बाऊल, पोशे वगैरे हिंस्र पशु पुष्कळच आहेत. खेरीज भेंकरें, ससे, रोही वगैरे वनपशूहि बरेच आढळतात. संस्थानच्या सर्व प्रदेशांत अनेक जातीचे विषारी सर्प फार आहेत. वरील लोकवस्तीपैकीं मूळचे रहिवासी जे कोळी वारली ठाकूर वगैरे यांचीच संख्या अधिक आहे. ह्या प्रदेशांत मुख्यत्वेंकरून भात, नागली, तूर, उडीद व खुरासणी हीं धान्यें पिकतात. ह्या भागांतील तुरीची फारच प्रसद्धि आहे. इतक्या चांगल्या तुरी गुजराथ खेरीज इतर आजूबाजूस फारच क्वचित् होतात. अलीकडे उत्तम जातीचें बारकाचें भातहि फार नामांकित ह्मणून सर्वत्र गणिलें जात आहे. व्यापाराचे मुख्य जिन्नस ह्मटले ह्मणजे धान्य, इमारती लांकूड व कोळसे हे होत. संस्थानांतून बाहेर प्रदेशीं माल जाण्याला रहदारीच्या पक्क्या सडका दोन आहेत—एक डहाणू स्टेशनला जाणारी सडक—व दुसरी जव्हार वरून मोखाड्यास जाऊन घोटी-स्टेशनकडे जाणाऱ्या सडकेस मिळणारी. जव्हार गांवाला रेलवे स्टेशन कोणत्याहि बाजूनें कमींत कमी ४० मैल लांब पडतें. संस्थानचें हवापाणी एकंदरीनें पहातां वाईट ह्मणूनच गणिलें जातें; परंतु अलीकडे जंगल तुटल्यानें हवा बरीच सुधारली आहे. तथापि जव्हार गांव खेरीज इतर सर्व ठिकाणीं दरसाल सप्टेंबर ते डिसेंबर अखेर तापसराई ( Malerial Fcver ) फार जोरांत असते. खुद्द जव्हार गांवची हवा फारच चांगली आहे. पाणी गोड असून रुचकर आहे. डोंगरामधील झऱ्याचें पाणी तर फार पाचक आहे. येथें तापसराई फारच तुरळक असते. जव्हार गांवचें हवापाणी अगदीं माथेरानच्या तोडीचें आहे. पुष्कळ तज्ज्ञांनीं अनुभव घेऊन हें उत्तम असल्याबद्दल आपला अभिप्राय नमूद करून ठेविला आहे. पर्जन्यकाळांत पाऊस अतोनात पडतो तथापि हवेंत गारठा फारसा येत नाहीं. कधींकधीं तर १० ते १५ इंच पाऊस एका दिवसांत पडल्याचीं उदाहरणें आहेत. जव्हार हें ठिकाण डोंगराच्या माथ्यावर असल्यानें पावसाळ्यांत पाणी तुंबून घाण होणें व चिखल होणें ह्या गोष्टींचा मुळींच संभव नाहीं. हवा नेहमीं खुलास व मोकळी असते. हल्लीं गेल्या दहा वर्षांची सरासरी पहातां खुद्द जव्हार येथें

सरसालांत ११५ इंच पाऊस पडतो. हिवाळ्यांत कडक थंडी फार क्वचित् पडते. तसेंच भर उन्हाळ्यांत भयंकर ऊष्माहि फारसा कधीं होत नाहीं. उष्णतामापन यंत्रावरून पहातां येथील उष्णतेचें मान जास्तींतजास्त सरासरीनें ९४ व कमींतकमी ६४ असें आहे. संस्थानची जमीन सुपीक जरी नाहीं तथापि पाणी दिलें असतां देशावर होणारे बहुतेक जिन्नस भाजीपाला, फळफळावळ, उत्तमोत्तम फुलझाडें व वेली ह्या ह्या जमीनींत होतात. आंबा, फणस, व काजू ह्या फळझाडांनां ही जमीन चांगली मानवते. कोंकणप्रांतीं होणारीं झाडें—उदाहरणार्थ केळी, नारळी, पोफळी इ. हींहि ह्या ठिकाणीं होतात व त्यांनां उत्तम जातीचीं फळें येतात असा अनुभव आहे. कांहीं भागांत, भुईमूग, राताळीं, बटाटे ह्यांसारखे जिन्नस चांगले पिकतील असा अंदाज आहे.

ह्या संस्थानांत एकंदर लहानमोठे १०८ गांव आहेत. राज्यकारभाराचे सोईसाठीं त्यांचे तीन तालुके केलेले आहेत. त्यास महाल असें ह्मणतात.

**राजकीय विभाग.**

ब्रिटिश हद्दींत तालुक्याचे ठिकाणीं सरकारी कामाचीं जितकीं खातीं असतात, तितकींच खातीं लहान प्रमाणांत ह्या महालांत आहेत. ब्रिटिश मुलखांत जिल्ह्याचे मुख्य ठिकाणीं जी राज्यकारभाराची व्यवस्था असते त्याच नमुन्यावर ती खुद्द जव्हार येथें आहे. इतकें सांगितलें ह्मणजे पुरे.

## प्रकरण दुसरें.

### जव्हार संस्थानचा थोडक्यांत पूर्वेतिहास.

ह्या राजाचा मूळ संस्थापक जयाबा मुकणे ह्मणून एक कोळी होता. जयाबाच्या पश्चात् त्याचा मुलगा नेमशहा हा त्याचे गादीवर बसला. इ. स. १३४३ मध्यें दिल्लीचा बादशहा जो महंमद तघलख यानें त्याला 'शहा' ही बहुमानाची पदवी दिली, आणि बावीस किल्ले व नऊ लाख रुपये वसुलाचा मुलूख यावर त्याची सत्ता कबूल केली. ही गोष्ट जव्हारच्या इतिहासांत फार महत्त्वाची असल्यानें त्या दिवसापासून (ह्मणजे ता. ५ माहे जून सन १३४३) या संस्थानांत नवा शक चालू झाला. अद्यापिहि जव्हार संस्थानच्या गादीवर बसणाऱ्या राजाच्या नांवापुढें 'शहा' ही पदवी लाविली जाते आणि संस्थानच्या हरएक खात्याच्या हिशेबाचें साल ता. ५+ जून पासूनच धरिलें जातें. इ. सनाच्या पंधराव्या शतकांत ह्या राज्याचा विस्तार फार वाढला होता. त्या वेळच्या सनदा पत्रेंवगैरे जे कागद आज उपलब्ध आहेत त्यांवरून पहतां ठाणें व नाशिक या जिल्ह्यांमध्यें आज अंतर्भूत होणारा बहुतेक सर्व प्रदेश त्याकाळीं जव्हारचे राजाचे ताब्यांत होता. वसई गांवीं एक वाडी अद्यापिहि ह्या संस्थानच्या मालकीची आहे. तसेच शहापूर व भिवंडी या तालुक्यांतील इनाम गांवांपैकीं कांहीं गांवें जव्हारच्या राजानेंच इनाम दिलीं आहेत अशाविषयीं त्या त्या गांवच्या इनामदारांपाशीं जव्हारच्या शिक्का मोर्तबानिशीं सनदा आहेत. असो. पुढें १६ व्या शतकांत हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर जेव्हां पोर्तुगीज लोकांचें प्राबल्य वाढलें त्यावेळीं ह्या राज्याचा विस्तार कांहींसा कमी झाला, आणि नंतर १८ व्या शतकांत पोर्तुगीज लोकांहून अधिक भयंकर शत्रु जे मराठे त्यांच्याबरोबर जव्हारच्या राजाला सामना करावा लागला, आणि त्यांमध्यें जव्हार संस्थानांतील पुष्कळसा प्रांत पेशव्यांनीं काबीज केला, व जव्हारचा राजा मराठ्यांचा पूर्ण मांडलिक बनला. इ. स. १७४२ मध्यें विक्रमशहा राजा वारल्यानंतर ह्या राज्यांत जे

+ मृगसाल.

# जव्हार संस्थानचे गादीवर बसलेल्या राजांची वंशावळ.

जयाबा मुकणे. ( जव्हार संस्थानचा मूळ संस्थापक. )

नेमशहा.

भीमशहा.

महंमदशहा.

पहिला कृष्णशहा.

दुसरा नेमशहा.

पहिला विक्रमशहा.

पहिला पतंगशहा.

दुसरा कृष्णशहा. — लवजीराव.

दुसरा विक्रमशहा. — कुडतोजीराव.

तिसरा कृष्णशहा. — त्रिंबकराव.

दुसरा पतंगशहा. — देवबाराव.

माधवराव.

मल्हारराव–ऊर्फ **पतंगशहा.**

तिसरा विक्रमशहा. — माधवराव. — यशवंतराव. — "चरित्रनायक."

तिसरा पतंगशहा.

चौथा विक्रमशहा.

चौथा पतंगशहा ( मल्हारराव. )

चौथा कृष्णशहा. — पांचवा विक्रमशहा. ( हल्लींचे राजेसाहेब. )

गृहकलह सुरू झाले, त्यामुळें तर ह्या नष्टचर्यंत अधिकच भर पडली आणि ह्या गोष्टीचा फायदा घेऊन इ.स. १७८२ मध्यें पेशव्यांनीं जव्हारच्या राज्यांत आपला हात शिरकाविला, आणि त्यांनीं जव्हारच्या राजाशीं त्यावेळीं जो करार केला त्याच्या योगानें पंधरा तेवीसहजार रुपयांपर्यंतच्या उत्पन्नाचा मुलूख मात्र या राजाकडे राहिला. ह्या वेळेस जव्हारचे गादीवर पतंगशहा ह्या नांवाचा राजा राज्य करीत होता. तो सन १७९२ चे सुमारास मृत्यु पावला. त्याला विक्रमशहा, यशंवतराव व माधवराव असे तीन मुलगे होते त्यांपैकीं विक्रमशहा सर्वांत वडील ह्मणून तो पतंगशहाचे पश्चात् गादीवर बसला. त्यानें सुमारें अठ्ठावीस वर्षे राज्याचा उपभोग घेतला, व इ.स. १८११ मध्यें तो मृत्यु पावला. त्यावेळीं त्याची बायको राणी सगुणाबाई ही गरोदर होती. ती योग्य कालीं प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झालें. वास्तविक हाच मुलगा राज्याचा खरा मालक होता; परंतु यावेळीं यशवंतराव यांचे पुत्र तुकारामराव आणि माधवराव यांचे पुत्र प्रतापराव हे गादीवर आपला वारसा सांगून त्यांपैकीं एकानें तर गंजाड महाल बळकविलाही होता. याप्रमाणें राजघराण्यांत भाऊबंदकी सुरू झाली. तो काळ फारच धामधुमीचा होता. इंग्रजी अंमल नुकताच कोठें सुरू झाला होता. अशा स्थितींत राज्याची व्यवस्था नीट लावणें हें काम फारच जोखमीचें होतें, व त्याचा सर्वस्वी बोजा विक्रमशहा याचे पश्चात् त्याची एकाकी विधवा राणी सगुणाबाई हिचेवर पडला. तिनें ह्यावेळीं आपल्या पोक्त प्रधान मंडळाच्या सल्ल्याप्रमाणें वागून दयाळू इंग्रज सरकारापाशीं दाद मागितली, व ती त्यांनीं मोठ्या आनंदानें देऊन राज्यांत माजलेला बखेडा पूर्णपणें नाहींसा केला. गादीवर हक्क सांगणारे जे लोक पुढें आले होते त्यांच्या हक्काचा शहानिशा करून त्यांनां त्यांच्या त्यांच्या हक्कसंबंधाप्रमाणें नेमणुका ठरवून देऊन विक्रमशहा याचा अज्ञान लहान मुलगा गादीवर बसवून त्याचें नांव 'पतंगशहा' असें ठेविलें, आणि ह्या राज्यांत त्या वेळीं जितका मुलूख होता तितका सर्व अज्ञान राजाची आई सगुणाबाई इच्या स्वाधीन करून तिनें पतंगशहा वयांत येईपर्यंत संस्थानचा सर्व कारभार पहावा, असें ठर-

विलें. सगुणाबाई ही फार शहाणी, विचारी, धोरणी आणि राज्यकारभारदक्ष अशी बाई होती. हिनें राज्यांत तंटेबखेडे मोडून जिकडेतिकडे स्थिरस्थावर झाल्यावर राज्याच्या अंतरंग कारभारांत त्या वेळच्या कालमानाप्रमाणें सुधारणा करण्याचा आरंभ केला. राज्याच्या मुख्य उत्पन्नाची बाब ह्मटली ह्मणजे जमीन महसूल. तेव्हां त्याचें उत्पन्न व्यवस्थित आलें पाहिजे, असा विचार करून त्यावेळीं संस्थानांतील गांवचे गांव जमीन महसुलाकरतां जे मक्तयानें दरसाल उक्ती रक्कम घेऊन दिले जाण्याची वहिवाट होती ती अजिबात बंद करून 'नांगरबंदी' व 'ठोकेबंदी' ही पद्धत अंमलांत आणिली. संस्थानचे घनदाट मौल्यवात् जंगल ही एक उत्पन्नाची बाब आहे, व पुढेंमागें ती फारच मोठी महत्त्वाची बाब होईल ही कल्पना प्रथम राणी सगुणाबाई हिचे डोक्यांत आली, आणि ती "साग शिसव ह्या माझ्या सोन्याच्या लगडी आहेत" असें प्रसंगविशेषीं बोलून दाखवून व्यक्त करीत असे. जव्हार येथील राजवाड्याचा मधला मुख्य भाग ह्याच राणीनें बांधला.तसेंच राजवाड्याच्यानजीक 'जेल'चे कंपौंडांत जो मोठा हौद आहे त्याचेंहि काम तिनें आपल्या खास देखरेखीखालीं करून घेतलें. राजवाड्याच्या भोंवतालचा कोट दुरुस्त करून राजवाड्याचे पूर्वदरवाजापुढें एक मोठा सुंदर बगीचा बनविला होता. कालवशात् तेथील फळझाडें व फूलझाडें नाहींशीं होऊन त्या ठिकाणीं नवीननवीन इमारती हल्लीं बांधल्या गेल्या आहेत. तथापि बकूल आंबा वगैरे सारखीं कांहीं झाडें अद्यापिहि दृष्टिगोचर होत आहेत. हिचा रोजचा कार्यक्रम जो या लेखकाच्या आजोबानें प्रत्यक्ष पाहिला होता तोहि मोठा मजेदार व कित्ता घेण्याजोगा आहे. ही राणी प्रातःकाळीं सूर्योदयापूर्वीं उठून स्नान, देवतार्चन वगैरे करी. नंतर सुमारें १० वाजेपर्यंतचा वेळ आपल्या मुलाच्या शिक्षणाकडे व नवीन बांधल्या जाणाऱ्या राजवाड्याचे कामाकडे साक्षात् नजर देण्यांत जाई. पुढें भोजन करून वामकुक्षी करी. दुपारीं २ ते ४ पर्यंत राज्याचें कामकाज स्वतः पाही, व आपले कारभारी ( त्या वेळीं या जागेचा हुद्दा 'प्रधान' असा असे ) यांस निरनिराळ्या कामाबद्दल ते जरूर हुकूम

देई. ४ चे पुढें एक तास पुराण ऐकण्यांत जाई. नंतर पुनः सकाळप्रमाणें नवीन चाललेल्या कामावर देखरेख करून दिवे लावण्याचे वेळीं सर्वांचे मुजरे घेऊन देवघरांत जाई तेथें कांहीं वेळ नामस्मरण, भजन वगैरे करून भोजनोत्तर निजावयास जाई. हिचे कारकीर्दींत कराडोहो येथें एक 'शिवालय' व श्रीक्षेत्रत्र्यंबक येथें एक मोठा राजवाडा बांधला गेला. आपले शेवटचे दिवस ह्या पुण्यक्षेत्रीं शिवसेवा व गंगास्नान करून सुखानें घालवावे असा तिचा इरादा होता. परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. ह्या राजवाड्याचें काम अपुरें असतांनाच ती वारली. ह्या राणीसंबंधानें आणखी पुष्कळशा गोष्टी देतां येतील व कदाचित् सुदैवानें जव्हार संस्थानचा संपूर्ण इतिहास लिहिण्याचा सुयोग आला तर त्यांत त्या नमूद करणें अधिक चांगलें. जास्त विस्तार ह्या ठिकाणीं तूर्त नको. एवढी गोष्ट खरी कीं, सगुणाबाई राणी हिला जव्हार संस्थानची 'अहिल्याबाई' राणी ह्मणणें मुळीं-सुद्धां अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

ह्या संस्थानाच्या इतिहासाचें सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन केलें तर असें दिसून येतें, कीं, ह्या राज्याचा मूळ संस्थापक जो जयाबा मुकणे त्याच्या खालचा नंबर ह्या राणीस देणें अगदीं योग्य होईल. वरील सनांत ( इ. स. १८२१ मध्यें ) सगुणाबाई राणीनें ब्रिटिश सरकाराशीं जो दोस्तीच्या नात्याचा तह केला त्या तहाअन्वयें हें संस्थान सार्वभौम इंग्रज सरकाराशीं आज तागाइत राजनिष्ठपणें व स्नेहभावानें वागत आहे. राणी सगुणाबाई वारल्यानंतर पतंगशहा यांचे हातांत पूर्ण सत्ता आली. हा पतंगशहा मोठा करारी राज्यकर्ता होता. ह्याला त्याच्या आईनें त्या काळास अनुरूप असें घोड्यावर बसणें, दांडपट्ट्याचे हात करणें, निशाण मारणें, तसेंच लिहिणें, वाचणें, हिशेब वगैरे करणें आणि इतर 'ललितकला' व 'शिल्पकला' यांचें चांगल्या तऱ्हेचें शिक्षण देण्याची फारच उत्तम काळजी घेतली होती. सन १८५७ सालच्या बंडांत ह्या राजानें ब्रिटिश सरकाराशीं राजनिष्ठपणें वागून आपल्या हद्दींत शांतता राखण्याची फार उत्तम कामगिरी बजावली. बंडाचा पुरा मोड झाल्यावर जेव्हां जिकडेतिकडे चांगली शांतता प्रस्थापित झाली

तेव्हां ह्याचें लक्ष्य अंतर्गत कारभाराच्या सुव्यवस्थेकडे जास्त लागलें. जव्हार हें ठिकाण पूर्वीच्या धामधुमीच्या काळांत डोंगरी किल्ला ह्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त व सोईचें खरें, परंतु प्राण्याच्या दुर्मिळतेमुळें त्याला हें ठिकाण पसंत वाटेनासें झालें. तेव्हां तें बदलून, मलवाडे हें राजधानीचें ठिकाण करावें असा त्यानें विचार ठरविला. त्याप्रमाणें ह्यांचा बहुतेक मुक्काम मलवाडे येथेंच असे. ह्या गांवाला लागून जी मोठी नदी वहात आहे त्यामुळें पतंगशहा ह्यांनां हें ठिकाण विशेष आवडलें. त्यांनीं तेथें आपल्या रहाण्या-साठीं एक लहानसा वाडा बांधून या गांवाला राजधानीचें स्वरूप आणण्या-साठीं नदीच्या काठीं दुसरा एक मोठा सात मजली राजवाडा बांधण्याचे कामास सुरवात केली. ह्याचें जोतें नक्षीच्या दगडांचें तयार केलेलें होतें. वरील सर्व काम एकजात शिसवी लांकडाचें तयार करून ठेविलेलें होतें. त्यावरील नक्षीसुद्धां फारच अप्रतीम होती. परंतु दुर्दैवानें जोत्याचें काम पुरें होतें न होतें तोंच कालानें ह्यांस गांठलें. पुढें तें लांकडी काम तारापूरच्या एका पारशी गृहस्थानें विकत घेतलें. वरील जोत्याचे कामास फक्त सुमारें एक लाख रुपये खर्च झाले. हल्लीं त्याचे नक्षीचे दगड जे अवशिष्ट राहिले आहेत त्यांवरून त्या काळच्या कारागिरीची व तिच्या भोक्त्याच्या रसिकतेची चांगली कल्पना होते. ह्यांनीं मलवाडे येथें मोठा बगीचा बनविला होता. अतीशय दुर्मिळ व उपयुक्त झाडें यांनीं मोठ्या परिश्रमानें व हौसीनें येथें आणून लाविलीं होतीं. बदाम, दालचिनी, वेलदोडा, अंजीर, वगैरे सारखीं झाडें, द्राक्षें वगैरे सारख्या फळवेली हिरवा चाफा वगैरे सारख्या उत्तम पुष्पवेली, निरनिराळ्या जातीचें 'वेत' नानाप्रकारचीं कमळें वगैरे तर अलीकडच्या काळापर्यंतसुद्धां त्या ठिकाणीं कित्येकजणांनीं पाहिलेलीं आहेत. असो. मलवाडे महालांत 'पोचाडे' या गांवीं त्यांनीं एक मोठा टुमदार बंगला बांधला. मलवाडे येथील वर निर्दिष्ट केलेल्या वाड्याच्या भिंतीवर तसेंच पोचाडे बंगल्याच्या भिंतीवर चुन्याचें नक्षीकाम फारच मजेदार केलेलें आहे. भिंतीला दिलेले पक्के रंग आज अर्ध्या-शतकानंतर सुद्धां अगदीं नव्या सारखे उठावदार दिसत आहेत. पुणें

येथील बुधवार पेठेंतील जव्हारकरांचा वाडा यांनींच विकत घेतला. मुंबई शहरचे डोकें त्या काळीं नुकतें कोठें वर येऊं लागलें होतें. ह्या राजधानीच्या व्यापारी शहरांत आपल्याला रहाण्यासाठीं एखादा स्वतंत्र बंगला विकत घेण्याची त्यांची इच्छा होती, परंतु ती पुरी झाली नाहीं.

हे राजेसाहेब कडकडीत शिवभक्त असत. कुडाण येथें त्यांनीं 'श्रीपतंगेश्वर'या नांवाचें एक शिवालय बांधलें आहे.ह्या देवस्थानचे पूजेची व्यवस्था व श्रावण महिना अभिषेक महापूजा वगैरे सर्व अद्यापिहि संस्थान-कडून चालू आहे. हे पार्थिवपूजा करीत. श्रावणमास नक्त करीत असत. बहुतकरून श्रावण महिना हे श्रीक्षेत्रवज्रेश्वरी येथें लिंगार्चन व त्रिकाळ शिवपूजा करून घालवीत. श्रीवज्रेश्वरी देवीला यांनीं चैत्रवद्य ३० चे दिवशीं सुरू केलेली महापूजा हल्लींसुद्धां श्रीमंत राजेसाहेब विक्रमशहा यांनीं चालविली आहे. ह्यांनां पुढेंपुढें निरनिराळीं प्रसिद्ध स्थळें व क्षेत्रें पहाण्याचा व नेहमीं प्रवास करण्याचा फार नाद लागला होता. तथापि त्यांच्या शिस्तींत करारीपणांत व राज्यव्यवस्थेंत बिलकुल कमीपणा आला नाहीं. ह्यांचीं त्या वेळच्या कारभारी यांस आलेलीं जीं पत्रें उपलब्ध आहेत त्यांवरून ह्यांचा मुक्काम कोठेंहि असला तरी, तेथून हे आपल्या संस्था-नच्या कामकाजाबद्दल किती दक्षता बाळगीत असत हें चांगलें स्पष्ट दिसून येतें. संगीतकला, अश्वविद्या, व मल्लविद्या यांची यांनां फार अभिरुची असे. त्या त्या विद्येंतील उत्तम निष्णात लोक यांनीं आपल्या पदरीं बाळगिले होते. ह्यांचें वर्तन सर्वांशीं फार सरळ, प्रेमळ परंतु बाणेदारपणाचें असे. असो. थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे हा पतंगशहा मोठा कर्ता पुरुष होऊन गेला, यांत शंका नाहीं. त्यांच्या स्वतंत्र चरित्रलेखांत त्यासंबंधानें आणखी सविस्तर माहिती देतां येईल. ह्यांनां औरसपुत्रसंतान नव्हतें ह्मणून त्यांनीं आपला पुतण्या 'नारायणराव' यांस दत्तक घेतलें. ह्या नारायणरावांचा लग्नसमारंभ मलवाडे येथें फारच थाटानें करण्यांत आला. त्याला राजपुत्रास योग्य अशा प्रकारचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली. नारायणराव याचेवर पतंगशहा यांचें अतोनात प्रेम असे. तें इतकें कीं

त्यांनीं आपल्या हयातींतच त्यांस गादीवर बसवून दरबारचें काम करावें. ह्यांचा स्वभाव चैनी विलासी आणि फार खर्चिक असे. गुणी लोकांचा परामर्ष घेण्यांत, त्यांची कदर बाळगण्यांत व त्यांची चहा करून शक्य तर आपल्या पदरीं ठेवण्यांत ते पैशाकडे कमी लक्ष देत. उत्तम कारागिरीच्या बहुमोल वस्तु आपल्या संग्रहीं असाव्या अशी त्यांनां फार हौस असे. हल्लीं संस्थानचे खजिन्यांत जे किंमतवान् डागदागिने आहेत त्यांपैकीं पुष्कळसे यांनींच खरेदी केलेले आहेत. राजवाड्यांतील देवांचा चांदीचा देव्हारा यांनींच आपल्या पसंतीप्रमाणें करविला.त्यावरील नक्षीचें व कलाकुसरीचें काम पाहिलें ह्मणजे ह्याच्या रसिकतेची व संग्राह्य वस्तुसंग्रह करण्याचे हौसेची कल्पना बरोबर पटते. वरील कारणांमुळें पुष्कळवेळां यांच्या हातून वाजवीपेक्षां जास्त खर्च होत असे. ही गोष्ट खरी; तथापि, संस्थानच्या खजिन्यांत चांगला पैसा शिल्लक असावयास पाहिजे, हें तत्त्व त्यांनां पूर्णपणें मान्य होतें व त्याप्रमाणें त्यांची संस्थानच्या जमाखर्चावर फार बारीक नजर होती. हें त्यांच्या मरणसमयीं संस्थानचे खजिन्यांत जी पुष्कळ रोकड शिल्लक होती त्यावरूनच स्पष्टतर होतें.


हे **पतंगशहा**—ता. ११ जून सन १८६५ रोजीं मुंबई येथें वारले. त्यांच्या मागून त्यांचा दत्तक मुलगा—**नारायणराव** ऊर्फ **चवथा विक्रमशहा** हा गादीवर बसला; परंतु तो अगदीं अकालींच ह्मणजे. ता.२३ माहे जुलई सन १८६५ रोजीं जव्हार येथें मृत्यु पावला. विक्रमशहा आसन्नमरण झाल्यावेळीं त्याच्या आज्ञेवरून व त्याची पूर्वघरची आई श्री.गोपिकाबाई इचे सांगण्यावरून विक्रमशहाची बायको **राणी लक्ष्मीबाई** हिनें **मल्हारराव** यांनां दत्तक घेऊन त्याचें नांव **पतंगशहा** असें ठेविलें. हेच आपले **चरित्रनायक** होत.

## कै. श्री. महाराज पतंगशहा राजेसाहेब सं. जव्हार

यांची

**लग्नकुंडली.**

मिति वैशाख शु. ३ शके १७७६



# प्रकरण तिसरें.

## पूर्वपीठिका व बालपण.

मल्हारराव ऊर्फ पतंगशहा हे जव्हार संस्थानचा नववा राजा कृष्णशहा याचा भाऊ जो लवजीराव याच्या वंशांतील पांचव्या पुरुषाचे औरस पुत्र होत. यांच्या वडिलांचें नांव माधवराव मुकणे हे जव्हारपासून ८ मैलांवर नांदगांव ह्मणून एक खेडें आहे तेथें रहात असत. संस्थानच्या पूर्वापार वहिवाटीप्रमाणें माधवरावदादा यांनां संस्थानांतून वर्षाची कांहीं नेमणूक मिळत असे; परंतु ते वरील गांवीं मोठ्या प्रमाणावर शेतीभाती करून पुष्कळशीं गुरेंढोरें बाळगून एखाद्या घरंदाज माणसाला शोभेल अशा ठाकठीकीनें राहात असत. माधवरावदादा प्रसंग विशेषीं जव्हारास येत असत देखील. वरील कै. पतंगशहा राजेसाहेब हे त्यांनां फार मानीत व विशेष अडचणीच्या प्रसंगीं त्यांची सल्ला मसलत घेत. सन १८५७ सालच्या बंडाचा वणवा जेव्हां सर्वत्र पसरला व नांदगांवच्या नजीकच्या ब्रिटिश मुलखांतील कांहीं लोक जेव्हां फितूर होऊन त्यांनीं त्र्यंबक ( त्र्यंबक हें त्या वेळीं पेट्याचें ठिकाण होतें ) येथील सरकारी खजिन्यावर हल्ला केला तेव्हां माधवरावदादा यांनीं नांदगांव व त्याच्या आजुबाजूचे संस्थान हद्दींतील लोक बंडवाल्यास सामील न होतील अशी फार शहाणपणानें तजवीज करून बंडवाल्यांच्या ह्मलचालीबद्दल बरोबर बातम्या राजेसाहेबांकडे देऊन योग्य तो बंदोबस्त राखण्याची फार काळजी आणि मेहनत घेतली.

माधवराव दादा यांनां दोन मुलगे व सहा मुली होत्या. वडील मुलाचें नांव शंकरराव, शंकररावाचे पाठीवर त्यांनां तीन मुली झाल्या. नंतर एक मुलगा झाला.त्याचें नांव मल्हारराव.यांचा जन्म नांदगांव येथें तारीख ३० माहे एप्रील सन १८५४ रोजीं झाला. नांदगांव हें अगदीं खेडेंगांव. पांढरपेशयांची वस्ती तेथें मुळींच नव्हती; परंतु योगायोग असा, कीं, या मुलाच्या जन्माचे वेळीं माधवराव दादा यांचे घरीं एक सच्छील भिक्षुक ब्राह्मण

पाव्हणा आला होता. त्यानें आपण होऊनच लागलीच या मुलाची जन्मकुंडली तयार केली, व हा मोठा राजकर्ता पुरुष होईल असें भविष्य वर्तविलें. माधवराव दादा यांनीं त्या गोष्टीकडे विशेषसें लक्षच दिलें नाहीं.त्यांनां आपली स्थिति चांगली माहीत होती. आपल्या सारख्याचा मुलगा लहानपणीं गुरें वळणारा व मोठा झाल्यावर फारतर मोठासा सुखी शेतकरी होणार, यापेक्षां अधिक उच्च पद प्राप्तीची कल्पना त्यांच्या तर काय पण इतर कोणा मोठ्या मानसशास्त्रवेत्त्याच्या सुद्धां स्वप्नींहि येणें शक्य नव्हतें; परंतु पुढें पुढें त्यांचा स्वभाव व वर्तन जें दिसूं लागलें तें त्यांच्या भविष्यकाळच्या उच्चपदवींशीं साम्य पावणारें असें होतें. मल्हारराव यांनां थोडथोडें समजूं लागतांच त्यांनां गाई ह्मशी वगैरे जनावरांचा फार नाद लागला. घरीं गडी माणसें असतांनासुद्धां त्यांनीं आपल्या गाई ह्मशी स्वतःच चारण्यास रानांत न्याव्यात. तेथें आपल्या सवंगड्यांबरोबर निरनिराळ्या तऱ्हेचे खेळ खेळावेत व मजा करावी. केव्हां केव्हां आपण राजा बनून इतरांनां निरनिराळीं कामें सांगावीं. त्यांचे इनसाफ करावे; त्यांनां शिक्षा द्याव्या; कांहींनां बक्षिसें द्यावींत असा क्रम चाले. सन १८५७ सालचें बंड नुकतेंच होऊन गेलेलें होतें त्यामध्यें ब्रिटिश सरकारचें जें लष्कर संस्थानहद्दींतून गेलें होतें त्याला माधवराव दादा यांनीं दाणा गोटा वगैरेची बरीच मदत केली होती. त्या वेळची हकीकत त्यांच्या व इतर वृद्ध माणसांच्या तोंडून जेव्हां मल्हारराव यांनीं ऐकली तेव्हां त्या अनुरोधानें त्यांनीं आपल्या खेळांत कांहीं बाळमित्रांनां शिपाई करून आपण त्यांचे सेनानायक बनून एक तऱ्हेचा नवीन खेळाचा प्रकार सुरू केला. हे पुढें राजे झाल्यानंतर त्यांनीं स्वतःच मोठ्या मोकळ्या मनानें व सानंदाश्चर्यानें या लेखकाच्या वडिलांस ज्या आपल्या लहानपणच्या मजेदार गोष्टी केव्हांकेव्हां सांगाव्या त्यावरून व त्यांचे बाळमित्र जे कांहींजण आज हयात आहेत त्यांच्या तोंडून जी मनोरंजक माहिती मिळते तीवरून ते त्यांचे खेळ हुबेहूब कृष्णचरित्रांतील गोकुल वृन्दावनांतील श्रीकृष्णाच्या बाललीलेप्रमाणेंच होते, असें कोणरसिक वाचकास वाटणार नाहीं बरें? ह्यांनां राणी लक्ष्मीबाईसाहेब ह्यांनीं

दत्तक घेतलें ते वेळीं ह्यांचें वय सुमारें दहा वर्षांचें होतें. दत्तक घेण्यापूर्वी ह्यांचा बहुतेक सर्वकाल वरील खेड्यांतच गेला; परंतु मध्यंतरीं कांहीं दिवस त्यांनां माधवराव दादा यांनीं जव्हार येथें मराठी शिक्षण मिळण्यासाठीं ठेविलें होतें; पण त्याकालीं खुद्द जव्हार येथेंसुद्धां मराठी शिक्षण नीटपणें मिळण्याची चांगलीशी सोय नव्हती, व मल्हारराव यांनांहि शाळेचा लौकरच कंटाळा आला, व ते आपल्या गांवीं नांदगांव येथें परत गेले. असो. वर सांगितल्याप्रमाणें सन १८६५ च्या जुलई महिन्यांत "**नारायणराव ऊर्फ विक्रमशहा**" हे वारल्याबरोबर ब्रिटिश सरकारनें जव्हार संस्थानचा सर्व राज्यकारभार आपल्याकडे घेऊन संजाण तालूक्याचे मामलेदार यांस संस्थानीं पाठविलें. त्यांनीं साक्षात् जव्हार येथें राहून ठाणें जिल्ह्याचे कलेक्टरसाहेब यांचे देखरेखीखालीं सर्व व्यवस्था पहावी, असें ठरविलें. **मल्हारराव** यांचे दत्तविधानाचे कामांत इंडिया सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर ता. २० माहे ऑक्टंबर सन १८६६ रोजीं पुणें येथें सरकारी रीतीप्रमाणें दरबार भरविण्यांत येऊन **पतंगशहा** हे यापुढें संस्थानचे राजे आहेत असें जाहीर करण्यांत आलें. नंतर ता. १३ माहे मार्च सन १८६७ रोजीं जव्हार येथें त्यांनां हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें विधिपूर्वक राज्याभिषेक होऊन गादीवर बसविण्याचा समारंभ झाला.

पुणें येथें झालेल्या दरबारांत **पतंगशहा** ह्यांनां ब्रिटिश सरकाराकडून राजवस्त्रें व एक तरवार नजर देण्यांत आली, व मुंबई सरकाराशीं असा करार करण्यांत आला कीं, ( १ ) पतंगशहा हे वयांत येईपर्यंत त्यांची आजी गोपिकाबाई इनें संस्थानची रीजंट ह्या नात्यानें इंग्रजसरकारनें नेमिलेल्या कारभाऱ्याच्या सल्ल्यानें राज्याचें कामकाज पहावें. (२) दत्तकाची मंजूरी मिळाल्याबद्दल वीस हजार रुपये नजराणा राणीनें इंग्रज सरकारास द्यावा. ( ३ ) अज्ञान बालराजास इंग्रजी शिकण्याकरितां पुण्याच्या हायस्कुलांत पाठवावें. ( ४ ) व संस्थानच्या अर्ध्या उत्पन्नाहून अधिक खर्च करूं नये.

## प्रकरण चवथें.

### शिक्षण व दरम्यानचा संस्थानचा राज्यकारभार.

वरील ठरावाप्रमाणें पतंगशहा यांनां पुणें येथें ठेवण्यांत आलें. इंग्रज सरकारनें दुसरा नवीन इसम कारभारी न पाठवितां त्या वेळचे संस्थानचे असलेले कारभारी (ज्यांनां त्यावेळीं अधिकारी हा हुद्दा असे) कुवरजी सापुरजी तारापुरवाला यांनींच संस्थानच्या कारभाऱ्याचें काम पहावें असें ठरविलें. नंतर रीजंट गोपिकाबाई इणें विष्णु महादेव वरसईकर या नांवच्या एका गृहस्थांनां खाजगी कारभारी ह्मणून नेमिलें. कांहीं दिवस संस्थानचा राज्यकारभार सुरळीत चालला होता; पण पुढें कुवरजी सापुरजी व विष्णु महादेव यांचें पटेना; यामुळें बराच गोंधळ माजला. पुढें विष्णु महादेव यानें ठाण्याचे कलेक्टर व पोलिटिकल एजंट यांजकडे कुवरजी सापुरजी यांनीं पैशाची अफरातफर केल्याबद्दल कळविलें. सन १८६९ मध्यें ह्या बाबतींत मि. हावलाकसाहेब यांनीं चौकशी केली. त्यामध्यें कुवरजी सापुरजी यांजवर गुन्हा शाबीद झाला नाहीं; परंतु संस्थानचे हिशेब फार अव्यवस्थित व निष्काळजीपणें ठेविल्याबद्दल त्यांस कारभारावरून दूर करण्यांत आलें; व रावसाहेब जयसिंगराव आंग्रे यांनां इ. स. १८७०च्या मार्च महिन्यांत कारभारी नेमिलें. वर सांगितलेल्या चौकसीमध्यें ज्या कांहीं गोष्टी बाहेर आल्या त्यामुळें विष्णु महादेव यांसहि संस्थानांतून जावें लागलें.

श्री. पतंगशहा हे पुणें येथें इंग्रजी शिकण्यास असतांना वरील दोन वर्षांचे अवधींत महत्त्वाच्या गोष्टी झटल्या ह्मणजे ता. ६ माहे अक्टोबर सन १८६८ रोजीं नेक नामदार व्हाइसराय यांनीं पुणें येथें जो एक बडा दरबार भरविला होता त्यांत श्री. राजेसाहेब हे हजर होते. आणि पुढील वर्षीं ड्यूक ऑफ् एडिन्बरो यांची स्वारी हिंदुस्तानांत आल्या वेळीं राजेसाहेब हे त्यांच्या भेटीकरितां मुंबईस गेले होते. राजेसाहेब शिक्षण घेत असतांना त्यांच्या मातोश्री श्रीमती लक्ष्मीबाई राणीसाहेब यानांसुद्धां योग्य शिक्षण मिळण्यासाठीं रीजंट गोपिकाबाईसाहेब यांनीं

त्यांस मुद्दाम पुणें येथें ठेविलें होतें. पुणें येथील कारकुनाचें त्या वेळच्या कारभारी यांनां भाद्रपद शके १७८८ चें जें एक पत्र आलें होतें त्यावरून राजेसाहेब त्या वेळीं हायस्कूलमध्यें जात असून घरीं शिवाय खाजगी ठेविलेल्या शिक्षकाजवळ मराठी तिसरें पुस्तक शिकत होतें असें दिसतें. इ. सन १८७० च्या जुलै महिन्यापर्यन्त राजेसाहेबांच्या अभ्यासा-संबंधानें वगैरे सर्व देखरेख पुण्याचे कलेक्टरसाहेब यांचेकडे होती. नंतर पुढें ही व्यवस्था ठाण्याचे कलेक्टरसाहेब मि. जे. डब्ल्यु राबर्टसन यांनीं पहावी असें मुंबई सरकारनें ठरविलें. मशारनिल्हेसाहेबबहादुरांनीं राजेसाहेबांची स्वारी पुण्यास असे पर्यंत तेथील सर्व प्रकारची व्यवस्था पहाण्याकरितां 'मंत्री' ह्मणून एक अधिकारी नेमिला. इ. स. १८७० पासून पुढें राजेसाहेब पुण्याहून संस्थानीं परत येईपर्यंत ह्या महत्त्वाचे जागेवर **बाळकृष्ण मोरेश्वर** या नांवचे एक गृहस्थ होते. याशिवाय **गोपाळ व्यंकाजी** ह्मणून एक इंग्रजी शिक्षक व **रामचंद्र नारायण भागवत** ह्मणून एक मराठी शिक्षक असे दोन इसम नेमिले होते. 'मंत्री' यांचें मुख्य कर्तव्य राजेसाहेबांस नीट वळण लावून त्यांच्या दर्ज्याप्रमाणें त्यांस निरनिराळ्या विषयांचें शिक्षण मिळण्याची व्यवस्था करणें हें होतें. खेरीज त्यांनीं दररोजची सर्व हकीकत, राजेसाहेबांच्या प्रकृतीसंबंधानें कमजास्त असल्यास त्यासह पोलिटिकल एजंटसाहेब यांचेकडे व॰ रिजन्ट गोपिकाबाईसाहेब यांचेकडे कळवीत जावी, अशी व्यवस्था वरील साहेब बहादूर यांणीं केली होती. शिवाय ते स्वतः बहुतकरून दर रविवारीं व इतर सुटीच्या दिवशीं मुद्दाम पुण्यास जाऊन राजेसाहेबांसंबंधाची सर्व व्यवस्था आपल्या नजरेनें पहात. यावरून हें ध्यानीं येईल, कीं, बाप आपल्या मुलाच्या शिस्तीच्या व शिक्षणाच्या बाबतींत जितकी काळजी घेतो त्यापेक्षांहि कंकणभर अधिकच काळजी साहेबबहादूर यांनीं राजेसाहेबांचे संबंधांत घेतली, व त्याचा योग्य तो सुपरिणामहि झाला.

राजेसाहेबांचा अभ्यासक्रम कसा जोरांत चाललेला होता व त्यांची वागणूक कशी कित्ता घेण्याजोगी होती याबद्दल खुद्द त्या वेळचे मुंबई

इलाख्याचे गव्हरनरसाहेब यांनीं राजेसाहेबांसंबंधें लिहून ठेवलेलें मत फार मनन करण्याजोगें आहे. त्याचा थोडासा उतारा येथें दिल्यानें आमच्या ह्मणण्याला चांगली पुष्टीच येईल.

Bombay Castle 13th January 1873.

"The reported progress in his studies of the young chief is satisfactory and creditable to him."

---

Bombay Castle 4th December 1874.

"His Excellency in council observes with pleasure the favourable report of the young Raja's progress in his studies and of his exemplary conduct."

## लग्न.

ता. २० माहे एप्रिल सन १८७४ इ. रोजीं इगतपुरी तालुक्यांतील काळुस्ते गांवचे राहाणार महाद पाटील घारे यांच्या मुलीशीं * राजेसाहेबांचें लग्न झालें. हा लग्नसमारंभ जव्हार येथें फारच थाटानें पार पडला. सदर समारंभास त्या वेळचे पोलिटिकल एजंटसाहेब. मि. राबर्टसन हे खुद्द हजर होते. एवढेंच नव्हे तर लग्नाचे पूर्वीं सुमारें ७।८ महिने ही मुलगी पसंत करण्याकरितां साहेब बहादूर हे स्वतः **माधवराव** दादासाहेब ( आमच्या चरित्र नायकाचे जनक ) यांनां बरोबर घेऊन मुद्दाम विगतपुरी येथें गेले होते, आणि मुलगी पसंत केल्यावर तिला राजघराण्याला साजेल असें योग्य तें व्यवहारिक शिक्षण मिळावें ह्मणून तेव्हांच जव्हार येथें आणण्यांत आलें, व शिक्षणाची व्यवस्था केली गेली.

सन १८७५ सालीं त्या वेळचे कारभारी यांनीं पोलिटिकलएजंटसाहेब बहादूर यांचेकडे जो एक रिपोर्ट केला होता त्यावरून राजेसाहेब हे त्या वेळीं इंग्रजी ६ व्या इयत्तेंत असून त्यांच्याकरितां घरीं एक ग्रॅज्युएट इंग्रजी शिक्षक नेमिलेला होता असें दिसतें. श्री. सौ. भागीरथीबाई राणी-

---

* याच हल्लींच्या राजेसाहेबांच्या मातुःश्री श्री. सौ. **भागीरथीबाई** राणीसाहेब होत.

साहेब ह्याहि ह्या सुमारास पुण्यासच होत्या. त्यांनां मराठी शिक्षण मिळण्याकरतां मुद्दाम एका स्वतंत्र शिक्षकाची योजना केलेली होती. ह्याच सालीं आपले पूर्वींचे परम पूज्य बादशहा सातवे एडवर्ड हे त्या वेळीं प्रिन्स ऑफ वेल्स होते. त्यांची स्वारी हिंदुस्थानांत आल्या वेळीं इ. स. १८७५ च्या च्या नवंबर महिन्यांत राजेसाहेब त्यांनां भेटण्याकरितां मुंबईस गेले होते. त्यांच्याबरोबर मे. राबर्टसन साहेब हे हजर असून त्यांनीं ह्या भेटीसंबंधें फारच उत्तम प्रकारची व्यवस्था ठेविली होती.

पुणें हें शिक्षणाचें केंद्र असल्याबद्दल तेव्हांपासून त्या शहराची ख्याती आहे. तेथें असतांना राजेसाहेबांनीं फारच झटून अभ्यास केला. त्यावेळीं पुण्यास प्रसिद्ध असलेल्या मोठमोठ्या विद्वान् गृहस्थांच्या सहवासानें राजेसाहेबांच्या अंगीं बहुश्रुतपणा फार आला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत मुंबई इलाख्यामध्यें जे जे प्रसिद्ध विद्वान् व वजनदार गृहस्थ पुढें आले त्या त्या सर्वांचें उत्कृष्ट प्रेम राजेसाहेबांनीं संपादन करून तें अखेरपर्यंत तसेंच कायम ठेविलें **कृष्णशास्त्री चिपळुणकर, केरोपंत छत्रे,** रावसाहेब **विश्वनाथ नारायण मंडलीक, महादेव चिमणाजी आपटे, राजाराम शास्त्री बोडस,** न्यायमूर्ती **महादेव गोविंद रानडे** वगैरे चांगल्या चांगल्या लोकांच्या ओळखीचा पाया राजेसाहेब यांनीं पुण्यास असल्या वेळींच घातला, व त्याचा योग्य तो उपयोग राज्यशकट हाकण्यासारख्या मोठ्या जबाबदारीच्या कामांत योग्य रीतीनें करून घेतला. सन १८६७ ते सन १८७६ सालापर्यंत राजेसाहेब पुण्यास शिकण्याकरितां होते. या दहा वर्षांच्या अवधींत मे महिन्याच्या सुटीखेरीज फारच क्वचित् जरूरीच्या प्रसंगीं ते पुणें सोडून खुद्द जव्हारीस अगर इतर ठिकाणीं गेले होते, असें दिसतें. इ. स. १८७५ च्या मार्च महिन्याच्या २८ व्या तारखेस **गोपिकाबाईसाहेब** यांना देवाज्ञा झाली. सन १८७६ च्या आरंभापासून राजेसाहेबांनीं शाळा सोडली. सरकारी कामकाजाची व विशेषतः न्यायाचे कामाची माहिती

होण्याकरितां ता. ४ माहे ज्यानेवारी १८७६ पासून कांहीं दिवस ते पुणें येथील " सेशनकोर्टांत " जात असत. ह्याच सालच्या मे महिन्यापासून मधुनमधून ते जव्हारीस येऊन संस्थानचें कामहि पहात असत. राजेसाहेब शिकण्याकरतां पुण्यास असलेल्या वेळांत रा. रा. त्र्यंबक सदाशिव पंडित, रावसाहेब जयसिंगराव आंग्रे ( जे पुढें जंजिरा, फलटण, देवगड बारा, येथें कारभारी असून बडोदा संस्थानांत नायब दिवाणाच्या जागेपर्यंत चढले होते. ) व त्यांचे मागून शिवराम नीळकंठ तुंगारे हे ब्रिटिश सरकारनें नेमिलेले संस्थानचे कारभारी होते.

# प्रकरण पांचवें.

## अधिकारप्राप्ति व राज्यकारभार.

ता. २२ माहे जानेवारी सन १८७७ रोजीं राजेसाहेबांस संस्थानचे कारभाराची पूर्ण मुखत्यारी मिळाली. शाळा सोडल्यानंतर कायद्याचा अभ्यास करण्याकरितां. रा. रा. **पांडुरंग गणेश दातार** यांस खाजगी शिक्षक नेमण्यांत आले, व पुढें जेव्हां रा. रा. **शिवराम नीळकंठ** यांनीं चार्ज सोडिला तेव्हां याच गृहस्थास राजेसाहेबांनीं कारभारी नेमिलें. सदरील गृहस्थ सुमारें दोन वर्षें या जागेवर होते. त्यानंतर संस्थानांतील जुने माहितगार इसम रा. रा. **रामचंद्र खंडो कापसे** यांस राजेसाहेबांनीं कारभारी नेमिलें. ह्याच वर्षीं कार्तिक महिन्यांत ह्मणजे ता. १९ माहे नवंबर सन १८७९ रोजीं राजेसाहेबांस पहिलें पुत्ररत्न झालें. तेच **बाळासाहेब ऊर्फ कृष्णशहा राजेसाहेब होत.** असो. मशारनिल्हे कापसे हे संस्थानचे राज्यकारभारांत चांगले अनुभवी वाकब असून पोक्त सल्ला देणारे होते. ते फार करारी असून त्यांची खाजगी वागणुक अत्यंत पापाभीरूपणाची होती. ते स्नानसंध्येशील व कर्मठ होते. हें सांगण्याचा उद्देश एवढाच, कीं, त्यांची निवड करण्यांत राजेसाहेबांनीं चांगलाच मुत्सद्दीपणा व दूरदर्शीपणा दाखविला. रा. रा. **रामचंद्र खंडो** ऊर्फ भाऊसाहेब कापसे हे पूर्वीं ह्याच संस्थानांत, महालकरी, ठाणेदार, न्यायाधीश वगैरे हुद्यांचे जागेवर असल्यानें त्यांनां हरएक बाबीचा चांगला अनुभव आलेला होता, व यामुळें राजेसाहेब ह्यांच्या अज्ञान अवस्थेंत ब्रिटिश सरकाराकडून रावसाहेब **जयसिंराव** आंग्रे व **शिवराम नीळकंठ** तुंगारे हे जे कारभारी नेमिले गेले त्यांनां ह्या गृहस्थाची राज्यकारभारांत फारच चांगली मदत झाली. **जयसिंगराव आंग्रे** हे सरकारी व खासगी कामकाजाकरितां बाहेर असल्यावेळीं चार चार सहा सहा महिने भाऊसाहेब कापसे हेच इंचार्जप्रमाणें कारभार पहात, आणि तो इतका बिनबोभाट व शिस्तवार होई, कीं, रावसाहेब जयसिंगराव आंग्रे

यांनीं 'आपल्या मागें संस्थानांतील नौकरांपैकीं कारभारी होण्यास लायक असे हे एवढेच फक्त गृहस्थ आहेत.' असा आपला अभिप्राय नमूद करून ठेविला होता. असो याप्रमाणें योग्य माणसाची निवड झाल्यानें राजेसाहेबांच्या अज्ञानपणांत मे. पोलिटिकल एजंट साहेब बहादूर यांच्या देखरेखीखालीं त्यावेळच्या लायक अंमलदारांनीं संस्थानच्या राज्यकारभाराच्या हरएक बाबतींतील सुधारणेचा जो भरभक्कम पाया रचून ठेविला होता त्यावर सुंदर व टिकाऊ इमारत बांधण्याचा आरंभ करण्याचें काम रा. कापसे यांचे सल्ल्यानें राजेसाहेबांना फारच सुकर झालें.

अधिकार मिळाल्यानंतर राजेसाहेबांनीं स्वतः संस्थानांतील प्रत्येक खेड्यापाड्यांत जाऊन रयतेची सर्व स्थीति समक्ष पाहिली. नंतर पुढें कारभारी व संस्थानचे जुने इमानी नौकर यांच्या मदतीनें राजेसाहेबांनीं संस्थानांतील सर्व खात्यांची पूर्ण माहिती घेऊन पहाणी केल्यानंतर त्यांनीं प्रथमतः रयतेच्या अत्यंत हिताच्या अशा सुधारणा करण्यास आरंभ केला. सन १८७८ सालीं जव्हार गांवीं एक सरकारी दवाखाना स्थापन करून (हीच हल्लींची पतंगशहा डिस्पेन्सरी होय.) सर्व लोकांस मोफत औषधपाणी मिळण्याची सोय केली. महाराजांच्या हातांत राज्यसूत्रें आल्यावेळीं खुद्द राजधानीच्या शहरांत सरकारी इमारती खेरीज हाताच्या बोटानें मोजण्याइतकीं सुद्धां कौलारू घरें नव्हती. आमचें हें लिहिणें किती यथातथ्य आहे हें पटण्याकरतां राजेसाहेब पुण्यास असलेवेळीं संस्थानीं ब्रिटिश सरकारांनीं नेमिलेले रावसाहेब जयसिंगराव आंग्रे यांनीं सन १८७५ सालीं जव्हार गांवच्या स्थितीसंबंधें जो लेख लिहिला आहे त्याचा उल्लेख करणें अयोग्य होणार नाहीं. ते लिहितातः—

"The town of Jawhar itself is situated in so inhospitable a place that with all the architectural improvements and ornamentations that are and shall be progressing there it would be difficult to make it a safe habitable place for human beings, being surrounded on all

९५६२

sides by deep ravines and precipices, the natural houses of tigers and other ferocious animals.

त्या वेळीं, हल्लींच्या राजवाड्याचा मधला भाग फक्त अस्तित्वांत असून भोंवती कळक बांबू वगैरेचें दाट जंगल पसरलेलें होतें. यावरून बाकीची लोकवस्ती कशी असेल याची कल्पना होईलच. जव्हार गांव ह्मणजे त्या कालीं अत्यंत निकृष्ट स्थितींतील एक खेडें होतें. गांवची वस्ती वाढावी व भोंवतालचें गर्द जंगल तुटून हवा स्वच्छ व्हावी ह्मणून श्रीमंतांनीं रयतेस घरें बांधण्याकरितां जागा, लांकडें व इतर पुष्कळ सवलती मोफत दिल्या. फार काय सांगावें, ह्या दयाळू व उदार राजानें कित्येकांनां आपल्या खाजगी खर्चानें घरें बांधून दिलीं. व्यापार वाढून त्याला उत्तेजन येण्याकरितां बिनव्याजानें पुष्कळांनां भांडवल दिलें. नुकताच तयार झालेल्या डहाणू–जव्हार रोडवर कोणत्याहि प्रकारची दस्तुरी अगर जकात उभयतां सरकारनीं घेऊं नये असा सन १८८१।८२ सालीं करार केला. जव्हार येथें मराठी प्राथमिक शिक्षणाची शाळा प्रथमतः ता. २३ माहे नवंबर सन १८६६ रोजीं स्थापन झाली होती. राजेसाहेबांनीं महालच्या प्रत्येक मोठमोठ्या गांवीं शाळा स्थापून लोकांनां मोफत शिक्षण मिळण्याची सोय केली. संस्थानच्या रयतेची परिस्थिति त्यांनीं पूर्ण अवलोकन केली होती, व तिची सुधारणा होण्याकरितां शिक्षणाचीं द्वारें खुलीं करून देणें हाच जरूरीचा व योग्य मार्ग होता. बहुतेक प्रजा शेतकरी वर्गाची परंतु तिच्यांत देखील कायमपणा असा बिलकुल नव्हता. शेतीची तऱ्हासुद्धां व्यवस्थितपणाची नव्हती.

त्या वेळीं जमाबंदी वसुलाची पद्धत कशी होती व जमीन महसूल कसा वसूल केला जात असे यासंबंधें थोडीशी माहिती येथें देणें अस्थानीं होणार नाहीं.

जमीनीचा सारा वसुलीचे चार प्रकार होते. ते असेः...“**मुढेबंदी**” “**ठोकेबंदी**” “**नांगरबंदी**” आणि “**बिघावण**” (१) मुढेबंदी ह्मणजे अमूक एका लागवडीच्या क्षेत्रांत अमूक मुढे* दाणा पिकेल, असा

* १ मुढा—२० मण.

अंदाज एकदां करून त्या प्रमाणावर कायम वसूल घेण्याचा. सन १८६० पर्यंत हा वसूल धान्याच्याच रूपानें घेतला जात असे. पुढें त्या धान्याची बाजारभावानें किंमत करून रोकडीच्या रूपानें तो घेण्याची सुरवात झाली. या पद्धतींत जमिनीचें क्षेत्र निश्चित समजलें जात नसे; कारण, जमीनीच्या मगदुराप्रमाणें एक मुढा धान्य पिकण्यास १ ते १। बिघा जागा लागे. ( २ ) दुसरी पद्धत " ठोकेबंदी " ह्मणजे एकाद्या शेतकऱ्याचे नांवावर असलेल्या जमिनीची अजमासानें अमूक एक कायम रक्कम घेण्याची, असा ठोका; ह्मणजे हल्लींच्या व्यवहारांत मक्ता किंवा खंड होय. ( ३ ) तिसरी पद्धत जी " **नांगर बंदी** " तो ह्मणजे शेतकरी आपली जमीन कसण्याकरतां दरसाल जितके नांगर ठेवील त्यांची लागवडीच्या हंगामांत मोजदाद करून त्यावर दर नांगरामागें अमूक एक रोकड रक्कम सरकारांत भरावी, असा ठराव करून त्याप्रमाणें वसूल घेणें ही होय. ( ४ ) शेवटची चौथी पद्धत " **बिघावंण** " ह्मणून जी होती ती वरील तिन्ही पद्धती नंतर सुरू झालेली दिसते. ह्यामध्यें मोजणीचें तत्व—साधारणपणें कां होईना परंतु अंगिकारलेलें दिसून येतें. यामध्यें " काठ्यां " " पांड " वगैरे जुन्या मापानें लागवडीचें क्षेत्र मापून त्यावर सरकारधारा ठरवून वसूल घेतला जाई. वरील सर्व पद्धति संस्थानच्या तिन्ही महालांत ( तालुक्यांत ) कमजास्त प्रमाणांनीं सुरू होत्या.

लागवडीची जमीन अमूक, गुरचरणीची अमूक, फारेस्टचा भाग अमूक अशी वर्गवारी मुळींच नव्हती. वाटेल त्यानें वाटेल तेव्हां वाटेल त्या ठिकाणीं वाटेल तितकी जमीन करावी; त्याबद्दल धरबंध असा कांहींच नव्हता. वरील प्रमाणें सरकारसारा गांवकामगाराकडे भरला ह्मणजे झालें. कातोडी वगैरे एका ठिकाणीं कायमचे न राहणारे लोक तर दाट जंगलांत "दळी"* पाडून तेथें हळवार धान्य पिकवीत व सरकारसारा भरण्याचें चुकवून जंगलचें अतोनात नुकसान करून पळून जात. अशा स्थितींत

---

* **दळी पाडणें** मोठ्या जंगलांत सपाटीचे जागेवरील कळक बांबू व इतर झाडें मुळासुद्धां उभीच्या उभी पेटवून देऊन त्या जागेवर लागवड करणें.

अर्थात् संस्थान सरकाराच्या व रयतेच्या हिताच्या दृष्टीनें ह्यामध्यें सुधारणा होणें किती अगत्याचें होतें हें वाचकांच्या ध्यानीं येईल.

मोजणीचें काम सुरू करण्यांत राजेसाहेबांचे उच्च हेतू होते. ते असेः—(१) पहिला वर लिहिल्याप्रमाणें शेतकीची सुधारणा लागवड करणाऱ्याचा कायमपणा व जमीन महसुलाचा नियमितपणा. (२) दुसरा–संस्थानचें मौल्यवान् जंगल जें साक्षात् राजेसाहेबांनीं अधिकार मिळाल्याबरोबर गांवोगांव हिंडून समक्ष पाहिलें होतें त्याची जोपासना व वृद्धि होऊन त्याचें उत्पन्न वाढविणें. (३) व तिसरा–त्यांच्या अत्यंत प्रेमाचा विषय व शेतकीचा आधारस्तंभ जीं गुरें ढोरें त्यांच्या चरणीसाठीं मुबलक गुरचरण स्वतंत्र राखून ठेवणें.

सर्व्हेचें काम सुरू करतांना ब्रिटिश मुलखांतील सर्व पद्धत जरी राजेसाहेबांनीं स्वीकारली होती तरी संस्थानांतील जमीनीचा मगदूर व रयतेची स्थिति ही त्यांनां बरोबर रीतीनें माहीत झाली असल्यामुळें सर्व्हेचे दर त्यांनीं शेजारच्या ब्रिटिश हद्दीपेक्षां बरेच कमी असे ठरविले. इतकेंच करून ते राहिले नाहींत तर त्यांनीं "सिंदाड" ह्मणून प्रत्येक खातेदाराकरितां निराळी जमीन फारच कमी दरानें राखून ठेविली. ह्याचा उद्देश इतकाच कीं, जमीनीवरील झाडोऱ्याचा उपयोग 'राब' भाजण्याचे कामीं व शेतकीला हरघडी लागणाऱ्या इतर कामीं रयतेला अडचण न येतां वेळेवर करतां यावा. प्रत्येक गांवाला गुरचरण ह्मणून निराळी स्वतंत्र जागा मोठ्या प्रमाणावर गांवच्या जनावरांच्या संख्येच्या मानानें सोडिलेली होतीच. शिवाय, सरकारी पागेंतील घोड्यांकरितां व थट्टींतील जनावरांकरितां मोकळीं कुरणें मुद्दाम राखून ठेवण्याची व्यवस्था केली. कांहीं गांवास तर गुरचरणाचें क्षेत्र त्यांनीं जाणूनबुजून अधिक ठेविलें होतें. त्याचा हेतु इतकाच कीं, संस्थानांतील कांहीं भागांत त्या वेळीं निव्वळ गुरेंढोरें बाळगून त्यांवर उपजीविका करणारे जे 'कानडे' या जातीचे लोक होते त्यांच्या जनावरांची चर-

णीची सोय उत्तम होऊन शेतकीच्या उपयोगाच्या जनावरांची पैदास चांगली व्हावी. सिंदाड जमीन व कांहीं गुरचरणाची जमीन सरकारी फारेष्टमध्यें सामील करावी अशाबद्दल कांहीं तज्ज्ञांनीं राजेसाहेबांस सल्ला दिला होता; परंतु तो त्यांनां मुळींच रुचला नाहीं. त्यांनीं आपल्या उदार धोरणाचे उच्च हेतु वरीलप्रमाणें विशद करून त्यांनां सांगितल्यानंतर त्या तज्ज्ञांनां स्वस्थ बसण्यापलीकडे कांहीं मार्गच उरला नाहीं. असो. थोडक्यांत ह्मटलें ह्मणजे रा. भाऊसाहेब कापसे यांनीं ही बाब फार महत्त्वाची असल्याचें राजेसाहेबांचे निदर्शनास आणून दिल्यानें संस्थानचे काळीचें उत्पन्न वाढून तें दरसाल नियमित यावें, व जमीन कसणाऱ्याला त्या जमीनीच्या लागवडीचा कायमपणा यावा ह्मणून त्यांनीं सर्व्हेचे माहितगार लोक मुद्दाम बाहेर ठिकाणाहून आणून सन १८८१ सालीं पैमाष मोजणी सुरू केली, व तिची पद्धत कशी होती हें आह्मीं वर दाखविलें आहेच.

ब्रिटिश सरकारच्या न्यायाचें कोर्टांत काम कसेंप द्रुतशीर चालतें याची माहिती राजेसाहेबांनीं पुण्यास असल्या वेळींच करून घेतली होती; हें वर सांगितलेंच आहे. अर्थात् तदनुरोधानें आपल्या राज्यांत शिस्तवार काम चालून रयतेस योग्य न्याय मिळावा ह्या उच्च हेतूनें ब्रिटिश मुलखांतील दिवाणी फौजदारी कायदे संस्थानच्या परिस्थित्यनुरूप थोडासा फेरफार करून संस्थानीं लागू केले. सन १८८० सालापर्यंत दिवाणी कामाचे थोडेसे अधिकार महालचे अंमलदाराकडेसच असत. ती पद्धत मोडून स्वतंत्र न्यायाधीश कोर्ट जव्हार येथें स्थापिलें गेलें. तसेंच ह्याच सुमारास संस्थान सरकारच्या शिक्क्याचे स्टांप कागद सुरू केले. पुढें अबकारी खात्याचा कारभार एकतंत्री सुरळीत नीट चालावा व उभयतां सरकारास सोईचें व्हावें ह्मणून अबकारीचा मक्ता ब्रिटिश सरकारकडे देण्यांत आला. याप्रमाणें प्रत्येक खात्यांची व बाबींची माहिती देण्याचें ह्मटलें तर तो एक निराळा ग्रंथच होईल व तितका विस्तार सध्यां ह्या ठिकाणीं नको. वरील नमुन्यादाखल दिलेल्या उदारणावरून, राजेसाहेबांनीं आपल्या हातीं संस्थानचीं राज्यसूत्रें आल्याबरोबर किती झपाट्यानें मह-

त्याच्या सुधारणा घडवून आणिल्या हें वाचकांच्या सहज ध्यानीं येईल. पुढें राजेसाहेबांचे कारकीर्दींत जव्हार संस्थानची एकंदर जी भरभराट झाली त्याला कारण होतकरू प्रजाहिततत्पर राजेसाहेब व इमानी जुने पिढीजाद अनुभवशीर प्रधान मंडळ यांची जमलेली जोडी हेंच होय. राजेसाहेबांनां आपल्या जुन्या नौकराबद्दल फार अभिमान असे. प्रसंगानुसार त्यांचा गौरव करण्याला ते कधीं चुकत नसत. यामुळें त्यांच्यावर सर्व नौकरवर्गाची दृढतर श्रद्धा बसून ते आपआपलीं कामें फारच दक्षतेनें व काळजीनें करीत. आह्मांला याठिकाणीं 'भारवी' कवीच्या उक्तीची आठवण होते.

सदानुकूलेषु हि कुर्वते रतिं ।
नृपेष्वमात्येषु च सर्वसंपदः ॥
( किरातार्जुनीय. स. १ श्लोक. ५ )

परंतु जरा खेदाची गोष्ट ही, कीं, या सद्गृहस्थांच्या कारभाराचा योग जितके दिवस संस्थानला मिळायला पाहिजे होता तितके दिवस तो मिळाला नाहीं. कारण पूर्वी सन १८६९ मध्यें कुवरजी सापुरजी यांचेवरील चौकशीचे कामांत संस्थानांतून दूर केलेले इसम विष्णु महादेव हे सन १८८१ सालीं पुनः संस्थानांत येऊन त्यांनीं आपले स्नेही जे रामचंद्र बाळकृष्ण लेले यांच्या मदतीनें व त्यांनां पुढें करून तरुण राजेसाहेबांस आपल्या पाशांत गुरफटविण्याचा यत्न सुरू केला. रा. भाऊसाहेब कापसे हे आतां वयातीत झाले होते. पूर्वी उपद्व्यापी ह्मणून ठरलेले विष्णु महादेव यांचा राज्यकारभारांत हात शिरून पुढें मागें ते जास्त ढवळाढवळ करितील हें जाणून व या दुकलीचें खरें स्वरूप काय आहे व या बाबतींत तात्काल काय उपाययोजना केली पाहिजे या संबंधाची सल्ला जी त्यांनीं राजेसाहेबांस दिली ती त्यांनां इतकीशी पटेना. बरोबरच आहे "हितं मनोहारि च दुर्लभं वचः"—तेव्हां आतां आपण बाजूस सरणें बरें असा विचार करून सन १८८१ चे अखेरीस त्यांनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला.

त्यानंतर बडोदें येथील रहाणार रा.रा.**लक्ष्मण दिनकर शास्त्री सिंत्रे** यांना ता. ६ माहे फेब्रुवारी सन १८८२ रोजीं कारभारी नेमिलें.परंतु रा. कापसे हे गेल्यापासून राज्यकारभाराचें गाडें राजेसाहेबांच्या मनाजोगें चालेना, व आपण अधिकारारूढ झाल्या वेळीं योजिलेल्या सुधारणा कशा घडून येतील याबद्दल त्यांना अलीकडे फार विवंचना वाटूं लागली; तेव्हां त्यांनीं आपल्या मनाशीं पोक्त व ठाम विचार करून रा. रा. **शिवराम नीळकंठ ऊर्फ बापूसाहेब** तुंगारे (जे पूर्वीं सन१८७५।७६ मध्यें संस्थानांत कारभारी होते.) यांना कारभारी नेमिलें. त्यांनीं आपल्या जागेचा चार्ज ता. २६ माहे जून सन १८८३ रोजीं घेतला. ता. १७ माहे नवंबर सन १८८५ रोजीं राजेसाहेबांस दुसरें पुत्ररत्न झालें. हेच **श्रीमंत मार्तंडराव भाऊसाहेब ऊर्फ विक्रमशहा महाराज** होत. पुढें सन १८८६ च्या जून महिन्यांत श्रीमंत सौ. **भागीरथीबाईसाहेब** ( हल्लींच्या राजेसाहेबांच्या मातुश्री ) ह्या वारल्या. त्यामुळें राजेसाहेबांस दुःखाचा बराच मोठा धक्का बसला. या वेळीं दोघेहि राजपुत्र अगदीं अज्ञान होते आणि त्यांतहि **श्रीमंत मार्तंड-राव भाऊसाहेब** हे पुरे एक वर्षाचे देखील नव्हते. राजकुमारांची जोपासना उत्तम व्हावी व गृहकृत्यावर उत्तम देखरेख राहून तीं पुढें तशींच सुरळीत चालावीं ह्मणून राजेसाहेबांनीं पुढील वर्षीं मे महिन्यांत मौजे चिंचवणे ( तालुका. अकोले जिल्हा नगर. ) येथील सहादू पाटील यांचे कन्येशीं द्वितीय शरीरसंबंध केला. ह्याच श्रीमंत सौ. सरस्वतीबाई राणीसाहेब होत. असो मशारनिल्हे बापूसाहेब तुंगारे यांनीं राजे साहेबांच्या अज्ञानपणांत संस्थानचा कारभार केला असल्यानें त्यानांच मुद्दाम यावेळीं आणविलें. शिवाय त्यांची वागणूक फार निस्पृहीपणाची असून आपल्याकरितां दुसऱ्याला मुळींसुद्धां तोसीस लागूं देण्याची नाहीं, असा त्यांचा कित्ता असे. ते स्वभावानें फार कडक परंतु अंतःकरणाचे अत्यंत प्रेमळ असे होते. ते सन १८७५।७६ सालीं कारभारी असतांना जव्हार येथें पाण्याची सोय व्हावी ह्मणून एक लहानसें सुंदर टाकें बांधलें. ह्या वेळींसुद्धां त्यांनीं राजेसाहेबांस वेळोवेळीं योग्य सल्ला

देऊन लोकहिताच्या पुष्कळशा गोष्टी केल्या. जव्हार येथील श्रीगणपतीचें सुंदर मंदिर व दिवाणसाहेबांकरितां एक स्वतंत्र छानदार बंगला ह्या दोन उत्तम इमारती यांनीं आपल्या नजरेखालीं बांधल्या. दिवाणवाड्यासमोर एक सुरेखसा फुलबाग बनवून त्याच्याजवळच एक विहीर बांधली. ह्यांनां बागबगीच्याचा फार नाद होता. कारभारी ऑफीससमोर ह्यांनीं लाविलेलीं आंबा, नारळ वगैरेचीं झाडें अद्याप कायम आहेत. ह्यांनीं संस्थानच्या जमाखर्चाची उत्तम टापटीप राखून खजिन्यांत बराच पैसा शिल्लक ठेविला होता. रा. बापूसाहेब हे त्या काळीं चांगले नांवाजलेले वजनदार गृहस्थ होते. ह्यामुळें यांच्या जुन्या अनुभवाचा व पोक्त सल्लयाचा फायदा राजेसाहेबांनां पुष्कळ झाला. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे राजेसाहेबांनीं ह्या गृहस्थांची जी निवड केली ती फारच दूरदर्शीपणाची होती. आणि त्याचा फायदा असा झाला कीं, रा. बापूसाहेब तुंगारे यांची कारभारी या जागेवर नेमणूक झाल्यापासून मध्यंतरींचा गोंधळ नाहींसा होऊन बराच बज बसत चालला होता; परंतु बापूसाहेब हे हल्लीं फारच वयोवृद्ध झाले होते. वयमानपरत्वें त्यांनां अलीकडे फार अशक्तता आली होती यामुळें त्यांनीं श्रीमंतांची रजा मागितली व त्यांनींहि त्यांचा उचित असा गौरव करून त्यांस मोकळें केलें. यावेळीं सुद्धां आपल्याला आतां राज्य-कारभारदक्ष विश्वासू अनुभवी व हुषार असा माणूस कोण मिळेल ह्या-बद्दलची विवंचना पुनः राजेसाहेबांच्या मागें लागली; पण ती फार दिवस टिकली नाहीं. श्रीमंतांचे प्रायव्हेट सेक्रेटरी रा. रा. रामचंद्र मोरेश्वर ऊर्फ बाबासाहेब जोग यांनां आपल्या मागें कारभारी नेमावें असें रा. बापूसाहेब तुंगारे यांनीं जाते वेळीं निक्षून सांगितलें व तो त्यांचा सल्ला सर्वतोपरी अत्युत्कृष्ट होता असेंच अखेरीस अनुभवास आलें. कारण मशार निल्हे बाबासाहेब जोग हे सुशिक्षित व जात्याच हुषार असून रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांच्या तालमींत तयार झालेले होते. शिवाय गेलीं दहा वर्षें त्यांनीं संस्थानांत महालकरी, न्यायाधीश, हुजुर चिटणीस वगैरे मोठ्या जबाबदारीच्या हुद्यांचे जागेचीं कामें करून बराच

अनुभव मिळविला होता. यामुळें राजेसाहेबांनीं त्यांचीच योजना कारभारी या महत्त्वाचे जागेवर केली.

संस्थानचीं राज्यसूत्रें हातांत आल्यापासून या वेळपर्यंत श्रीमंतांनीं राज्यकारभार सुधारण्याची जी भव्य इमारत उभारली होती तिला सर्वांगपूर्ण सुंदर करण्याचे कामीं त्यांना वरील गृहस्थांचें फारच अमोल सहाय झालें. जग हें दरक्षणीं सुधारणेमध्यें एक एक पाऊल पुढेंपुढें जात आहे अर्थात् त्याप्रमाणें शक्य तितकी अंशतः तरी सुधारणा आपल्या राज्यामध्यें व्हावी अशी राजेसाहेबांची प्रबलतर इच्छा; आणि त्याप्रमाणें त्यांना चांगलीं चांगलीं माणसेंहि सहज मिळालीं. असो. ता. २० माहे एप्रील सन १८८९ रोजीं श्री. सौ. सरस्वतीबाई राणीसाहेब प्रसूत होऊन त्यांस कन्यारत्न झालें. ह्याच हल्लींच्या राजेसाहेबांच्या कनिष्ठ भगिनी श्रीमंत सौ. चंपाबाईसाहेब भांगरे या होत. सन १८८९ च्या अखेरीस संस्थानच्या पैमाष मोजणीचें काम पुरें झालें. ह्या सालपासून संस्थानचें उत्पन्न अर्थातच वाढलें, आणि त्याचा विनियोग राजेसाहेबांनीं पुष्कळ अंशीं सार्वजनिक कामाकडेसच केला.

पैमाष मोजणी सुरू असतांनांच आपल्या रयतेची, शेतकीची सुधारणा कशी करितां येईल व कोणत्या रीतीनें त्यांना मदत केली पाहिजे ह्या संबंधानें राजेसाहेबांचे विचार चालूच होते. भांडवलाच्या अभावीं गरीब शेतकऱ्यांनां नेहमीं एप्रील, मे महिन्यापासून धान्याची टंचाई भासूं लागे, व सावकाराकडून कर्जाऊ धान्य आणण्यामध्यें व शेतीच्या कामास लागणारे बैल त्यांच्याचकडून भाड्यानें घेण्यामध्यें त्यांनां वर्षभर शेतीची ढोर मेहनत करून तत्वतः फायदा कांहींही राहात नसे. ही गोष्ट राजेसाहेबांच्या सूक्ष्म अवलोकनानें त्यांच्या मनाला चांगली पटली होती; व ह्मणूनच त्यांनीं सन १८८८ मध्यें संस्थानांतील प्रमुख गांवीं धान्याचीं कोठारें ठेऊन तें धान्य शेतीच्या ऐन कामाच्या हंगामांत ह्मणजे जुलई, आगस्ट, सप्टेंबर या महिन्यांमध्यें शेतकऱ्यांनां फारच अल्प व्याजानें कर्जाऊ देण्याची पद्धत सुरू-

केली. तसेंच जनावरांची चांगली निपज संस्थानीं व्हावी, व शेतींच्या कामाला त्यांचा केव्हांहि तुटवडा पडूं नये एवढ्यासाठीं गुरेंढोरें बाळगून त्यावरच विशेषेंकरून उपजीवीका करणारे जे कामडे वगैरे जातीचे लोक त्यांनां चांगल्या अवलादीचीं जनावरें खरेदी करण्यासाठीं कर्जाऊ रकमा देण्याचा उपक्रम सुरू केला. ह्या त्यांच्या उदार कृत्याबद्दल व दूरदर्शीपणाबद्दल संस्थानचा सर्व शेतकरी वर्ग अद्यापिहि त्यांनां दुवा देऊन त्यांचे धन्यवाद गात आहेत. हें त्यांच्या राजनीतीचें उदार धोरण त्यांच्या मागें संस्थान सरकारनें अद्यापिही "खावटी" व "तगाई" या रूपानें कायम ठेविलें आहे. याबद्दल शेतीचें हरएक काम साक्षात् आपल्या हातीं करून त्यावरच केवळ प्रपंच चालविणारे गरीब लोक महाराजांचे फारच ऋणी आहेत. सन १८९०–९१ हे साल जव्हार संस्थानच्या इतिहासांत फार महत्वाचें गणिलें गेलें पाहिजे ह्यावर्षी ठळक ठळक अशा ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या त्यांपैकीं कांहींचा येथें उल्लेख करणें अवास्तव होणार नाहीं.

( १ ) पहिली महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे सार्वभौम इंग्रज सरकाराकडून जव्हारचे राजपुरुषांनां बहुमानपूर्वक मिळालेलें दत्तक घेण्याबद्दलची सनद ही होय.

( २ ) दुसरी गोष्टः—जव्हारचा पुरातन सुंदर राजवाडा अठराव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास अग्निनारायणाचे भक्ष्यस्थानीं पडल्यामुळें त्यांतील बहुमोल वस्तूंबरोबर राज्याच्या इतिहासाच्या साधनाचे अत्यंत महत्त्वाचे कागदांचाहि नाश झाला. त्यानंतर पुढील कालांतील कागदपत्रेंसुद्धां व्यवस्थित रीतीनें लावलेलीं व ठेवलेलीं नव्हतीं. ते सर्व कागद व्यवस्थित रीतीनें व वर्गवारीनें लावण्याचें अत्यंत जरूरीचें उपयुक्त काम राजेश्री रामचंद्र मोरेश्वर जोग हे सन १८८८ मध्यें कारभारी झाल्याबरोबर त्यांनीं प्रथमतः हातीं घेऊन तें फार परिश्रमानें ह्या सालीं ( सन १८९०–९१ ) पूर्णपणें शेवटास नेलें. जव्हार संस्थानचें रेकार्ड आज जें इतकें सुन्दर रीतीनें लागलें गेलेलें आहे त्याचें सर्वस्वी श्रेय राजेसाहेबांकडे नाहीं, असें कोण ह्मणेल?

( ३ ) तिसरी गोष्ट:—राजेसाहेबांच्या मातोश्री श्रीमती लक्ष्मीबाईराणी साहेब ह्या पुणें येथें निराळ्या राहूं लागल्यामुळें त्यांच्या नेमणूकी संबंधानें जो मोठा भानगडीचा व नाजूक प्रश्न उपस्थित झाला होता त्याचा निकाल त्या वेळचे उदारमतवादी ह्मणून नांवाजलेले पोलिटीकल एजंट मिस्टर डब्ल्यू पोर्चससाहेब यांच्या मध्यस्थीनें आईसाहेब व राजेसाहेब या उभयतां-सही हितावह व समाधानकारक असा लागला गेला, ही होय.

( ४ ) चौथी महत्त्वाची गोष्ट ही, कीं, सन १८८० मध्यें संस्थानमध्यें सुरू झालेले ओरिजिनल सर्व्हेचें काम ( सन १८९०।९१ ) याच सालीं पुरें झाले. सर्व्हेचे दर किती माफक होते, तसेच गुरचरण व सिंदाड या प्रकारची जमीन मुबलक राखून ठेवण्यासंबंधानें रयतेच्या हिताबद्दल किती दूरदृष्टी ठेविली होती या विषयींचें विवेचन आम्ही वर केलें आहेच,तथापि सर्व्हे सेंटलमेंट लागू करते वेळीं राजेसाहेबांनीं पूर्वापार चालत आलेले "लिंगोटी" "रावता" "प्रधानपदी" "नजर" वगैरे सारखे सर्व बारीकसारीक कर एकदम माफ केले. ही गोष्ट येथें मुद्दाम नमूद केल्याविना आमच्यानें रहावत नाहीं.

( ५ ) पांचवी महत्त्वाची गोष्ट जी राजेसाहेबांनीं अमलांत आणण्याचें ठरविले ती–सरकारी फारेस्टची वर्किंगप्लॅनची योजना ही होय. या योजने-संबंधें कांहीं लिहिण्याचे अगोदर राजेसाहेबांनीं संस्थानचीं राज्यसूत्रें हातीं घेतल्या वेळीं व त्यापूर्वी फारेस्टची व्यवस्था कशी होती हें थोडक्यांत सांगि-तलें ह्मणजे त्यांनीं त्यांत केलेल्या सुधारणेबद्दल वाचकांनां चांगली कल्पना होईल.

पैमाषमोजणी होईपर्यंत 'फारेस्ट' ह्मणून अमुक एक निराळी जागा हा भेदच नव्हता. सन १८७७।७८ सालपर्यंत जंगल विक्री जी होत असे ती साधारणतः ज्या कोणास माल पाहिजे असेल त्यांनीं अर्ज करून पर-वानगी मिळविल्यानंतर साग, शिसव वगैरे इमारती लांकडाच्या भरलेल्या गाडीस अमुक रुपये फी व इतर विजळी लांकडांच्या भरलेल्या गाडीस अमुक

फी घेऊन सरकारी नाकेदार दाखले देत.त्यावर देखरेख करण्याकरतां व इतर रीतीनें जंगलचें नुकसान होऊं नये याच्या बंदोबस्ताकरितां दोन वतनदार नोकर असून शिवाय गांवकामगारांनींहि त्यावर नजर ठेवावी, अशी व्यवस्था असे. याला दरमहा पगार दिला जात नसून जंगलचे उत्पन्नापैकीं शेंकडा कांहीं टक्के दिले जात. राजेसाहेबांनीं ही पद्धत मोडून " जंगल इन्स्पेक्टर " ह्मणून अंमलदाराची नेमणूक केली, व त्याचे हाताखालीं इतर लोक नेमिले. गाडीवर फी घेऊन माल देण्याची वहिवाट एकम बंद केली. सर्व्हेचें काम होईपर्यंत फारशी जंगल विक्री न करितां पुढें " फारेस्ट " ह्मणून जी जागा राखिली गेली त्या भागांतून जंगल तोडून नेण्याचे मक्ते देण्याचें सुरू केलें. जंगल शिस्तवार तुटलें जातें कीं नाहीं ? सर्व माल–मग तो बरा असो, वाईट असो, सागली असो कीं विजळी असो–मक्तेदाराकडून उठविला जाऊन जागा पुढील फुटव्या करितां साफ मोकळी केली जाते कीं नाहीं ? यावर त्यांची फारच करडी नजर असे. संस्थानमध्यें फिरतीवर निघाले ह्मणजे जंगलची तोड कशी चालली आहे हें ते स्वतः आपल्या नजरेनें पहात. पुढेंपुढें गांवचें सबंद फारेस्ट विक्री करणें सोईचें नाहीं असें त्यांच्या नजरेस आल्यावरून सन १८९०।९१ सालीं त्यांनीं ब्रिटिश मुलखाप्रमाणें संस्थानमध्यें " कूपसिस्टीम " सुरू करण्याचें ठरविलें. सन १९०३ सालीं बहुतेक सर्व हिंदुस्थानांत जी मोठी "वारेमोड" झाली त्याची लाट संस्थानमध्येंसुद्धां आलीच व त्यामुळें जंगलचें कांहीं ठिकाणीं फारच नुकसान झालें. कितीतरी शतकाचे जुने सागाचे वृक्ष अगदीं जमीनदोस्त झाले, व कांहीं कांहीं जागीं, जेथें पूर्वी कधींदेखील भर दोनप्रहरींसुद्धां सूर्यकिरणाचा कवडासा येण्याची मारामार तेथें अगदीं सपाट मैदान झालें. ह्या वेळेपासून तर राजेसाहेबांचें लक्ष जंगलखात्याची अधिक सुधारणा "प्लॅंटेशन" करून कशी करितां येईल ह्याकडे लागलें. कांहीं ठिकाणीं त्यांनीं त्याप्रमाणें प्रयोगहि सुरू केले होते. परंतु ह्या शास्त्रांतील निष्णात माणूस मिळाल्याशिवाय आपले हेतु तडीस जाणें मुष्किलच हें जाणून " डेराडून कालेजांतील " शिक्षण घेतलेला माणूस

मिळविण्याचा व त्याठिकाणीं संस्थानचा एकदा विद्यार्थी पाठविण्याचा त्यांनीं विचार करून तदनुरोधानें प्रयत्न चालविले. दुर्दैवानें ह्या प्रयत्नांत त्यांनां त्यांच्या हयातींत यश आलें नाहीं. त्यास नाइलाज. पण पुढें दोन वर्षांतच एक डेराडून कालेजामधील फारेस्ट खात्याचा तज्ज्ञ माणूस संस्थानला लाभला होता, परंतु तो लाभलेला पाहण्यास राजेसाहेब वांचले नाहींत. हा ईश्वरी संकेत ह्मणावयाचा, दुसरें काय ? वरील थोडक्या विवेचनावरून ही गोष्ट निखालस स्पष्ट होते, कीं, राजेसाहेबांनीं संस्थानचें फारस्ट खातें सुधारण्याचे प्रयत्न आमरणपर्यंत फारच आटोकाट केलें यांत संदेह नाहीं.

आह्मी वर लिहिल्याप्रमाणें राजेसाहेबांचा सार्वजनिक कामाकडे किती जास्त ओढा होता याची कल्पना होण्यास त्यांनीं सन १८९२ ते १८९४ या तीन वर्षांत संस्थानमध्यें जीं जीं महत्त्वाचीं, चिरस्थाई अशीं मोठमोठीं लोकहिताचीं कामें केलीं त्यांपैकीं कांहीं कांहींचा जरी उल्लेख केला तरी पुरे. जव्हार येथें मराठी शाळेकरितां मोठी भव्य इमारत बांधली; हेंच हल्लींचें कृष्णविद्यालय होय. सरकारी कामें खात्यानिहाय निरनिराळीं स्वतंत्र जागेंत चालून तीं आपल्या खास दृष्टीसमोर असावींत एवढ्यासाठीं मूळच्या राजवाड्याच्या दुपटीपेक्षांहि अधिक इतका त्याच इमारतीला जोडून आजुबाजूस वाढवा केला; जव्हार येथें पाण्याची अत्यंत टंचाई व त्याकरितां उत्तम सोय व्हावी ह्मणून **सूर्यतलाव** ह्या नांवचा मोठा तलाव बांधला; त्यामुळें वरील गैरसोय त्यावेळीं तर सर्वांशींच परंतु हल्लींच्या वाढत्या लोकवस्तीच्या मानानेंमुद्धां बऱ्याच अंशीं दूर झाली आहे. याशिवाय जव्हार गांवांत व संस्थानच्या इतर भागांत ज्या ठिकाणीं पाण्याची विशेष अडचण होती तेथें विहिरी बांधल्या.* जव्हार डाहाणू रस्ता ठिकठिकाणीं मोऱ्या पूल वळणें वगैरे देऊन पुष्कळ सुधारला. त्याच्या बाजूस सावलीसाठीं

---

* सन १८९२ ते ९४ ह्या तीन सालातच नव्या १५ विहिरी बांधल्या गेल्या आहेत.

झाडें लावण्याचा उपक्रम केला. जव्हारच्या राजवाड्यापासून ३ मैलपर्यंत जीं सारखीं सडकेच्या कडेला दुतर्फा अंब्याचीं वगैरे झाडें आहेत त्यांवरून ही गोष्ट चांगली पटेल. घाटमाथ्यावर व्यापाराचें दळणवळण वाढावें ह्मणून जव्हार ते मोखाड्यापर्यंत नवी पक्की सडक केली. गुरांनां व माणसांनां पाणी मिळण्यास अडचण पडूं नये ह्मणून त्या ठिकाणीं पाणी काढणारे नौकर ठेविले. अनाथ व पंगू लोकांकरितां धर्मशाळा; गरीब प्रवाश्यांकरितां मुसाफरखाने, सभ्य गृहस्थ व सरकारी नौकर यांनां उतरण्यासाठीं रहदारी बंगले बांधले; सर्वांनां मोफत औषध मिळावें ह्मणून उघडलेल्या दवाखान्याची इमारत भव्य व सुंदर बांधून त्याला जोडून गरीब रोग्यांस रहाण्यासाठीं निराळ्या खोल्या बांधून त्यांच्या आजारीपणांत त्यांनां खाण्यापिण्याची व वस्त्रप्रावरणाची सोय केली. राजवाड्यासमोर एक श्रीगणपतीचें सुंदर मंदिर, व राजवाड्याच्या जुन्या तटबंदीच्या पूर्व दरवाजावर सर्व इमारतीपेक्षां प्रत्येक गुणानें 'मी अधिक आहें आणि ह्मणून उच्चस्थानीं मीच अधिष्ठित होणार' असें आपल्या स्वरूपानें सर्वांस दाखविणारा भव्य नगारखाना अशा दोन इमारती आधुनिक शिल्पकारांच्या कलेचें दिग्दर्शन करीत आहेत. अशा एक कीं दोन गोष्टी लिहाव्या? श्रीमंतांनीं सार्वजनिक कामाकडे जो पैसा खर्च केला त्याची खरी साक्ष—आह्मीं मागें वर्णन केलेल्या जव्हारच्या पूर्वस्थितीशीं तिच्या हल्लींच्या स्थितीची तुलना करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस पटेल. आणि आह्मी वर दिलेलें वर्णन अगदीं अतिशयोक्तीचें नसून बऱ्याच अंशीं अपुरें आहे असें कोणाहि निःपक्षपाती मनुष्याला वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

सन १८९१ सालापासून वडील राजपुत्र श्री. कृष्णशहा ऊर्फ बाळासाहेब यांनां इंग्रजी विद्येचें शिक्षण मिळण्यासाठीं मुंबईस ठेवण्यांत आलें. ते तेथें सन १८९७ सालपर्यंत होते. राजकुमारास योग्य प्रकारचें शिक्षण मिळण्याबद्दल त्यांनीं याप्रमाणें फार काळजी घेतली. एवढेंच नव्हे तर एकंदरीनें विद्यादानासंबंधानें त्यांचा हात अव्वल पासून अखेरपर्यंत फारच सढळ होता. सन १८९३।९४ चे सुमारास संस्थानांतील व बाहेर ठिका-

णचेसुद्धां कांहीं निवडक विद्यार्थ्यांस उच्च दर्जाचें शिक्षण मिळण्यासाठीं त्यांनीं मुंबई पुणें व इतर ठिकाणीं पाठविलें होतें. संस्थान हद्दींतील अडाणी जंगली लोकांकरितां त्यांनां हळुहळू विद्येची गोडी लागावी ह्मणून एक नमुनेदार शाळा जव्हारपासून ८ मैलांवर एका खेड्यांत काढली होती. त्या ठिकाणीं विद्यार्थ्यांच्या रहाण्याची, खाण्यापिण्याची, वस्त्रप्रावरणाची व शिक्षणसामुग्रीची यथायोग्य तजवीज मोफत करण्यांत आलेली होती. यावरून विद्येची गोडी त्यांनां किती होती व आपल्या प्रजेपैकीं मागासलेल्या जातीच्या सुधारणेसाठीं त्यांनीं कसे आटोकाट प्रयत्न चालविले होते हें सर्वांच्या सहज ध्यानीं येईल.

राजेसाहेब एवढेंच करून राहिले नाहींत. तर त्यांनीं बाहेरच्या ठिकाणच्या शिक्षणसंस्थेस देखील वेळोवेळीं पुष्कळ मदत केली आहे. मराठीवाङ्मयाचे वृद्धीसाठींसुद्धां त्यांनीं निरनिराळया प्रकारांनीं बराच मोठा आश्रय दिलेला होता.

गुप्तदान करण्यांतच महत् पुण्य आहे असें ते नेहमीं ह्मणत व त्यामुळें आपले दानाची व नांवाची प्रसिद्धि होऊन आपली केलेली स्तुति त्यांनां बिलकूल आवडत नसे.

सन १८९३ च्या मे महिन्यांत श्री. लक्ष्मीबाई राणीसाहेब ह्या मृत्यु पावल्या. राजेसाहेबांचा व त्यांचा जो निकट संबंध त्यामुळें त्यांनां ह्या वेळीं साहजिकच फार वाईट वाटलें. राणी लक्ष्मीबाईसाहेब ह्या करारी व मानी स्वभावाच्या होत्या. त्यांनीं आपल्या दिलदार, प्रेमळ व सढळ वागणुकीमुळें लोकांची मनें इतकी आकर्षिलीं होतीं, कीं, त्यांच्या मृत्यूची वार्ता कळतांच सर्वांच्या तोंडून दुःखोद्गार निघाले.

पुढील वर्षींसुद्धां राजेसाहेबांना दुःखाचा एक झपाटा सोसावा लागला. तो ह्मणजे पूर्वघरचे वडील बंधु शंकरराव दादा यांचें २३।६।९४ रोजीं अकालीं एकाएकींच निधन झालें, हा होय. शंकरराव वारल्यामुळें राजेसाहेबांचे वृद्ध वडील माधवरावदादा यांनां पुत्रशोकाचा ऐन वृद्धापकाळीं केवढा

जोराचा धक्का बसला ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. माधवदादांची तर त्यामुळें कंबरच खचल्यासारखी झाली. त्यांनीं त्या दिवसापासून जें अंथरूण धरलें तें धरलेंच. ते सुमारें दोन वर्षें सारखे पडून होते. पुढें ता.२८।४।९६ रोजीं त्यांचा अंत झाला.माधवराव दादांचें वय मरणसमयीं सुमारें ८० वर्षांचें होतें. असो.

राजेसाहेबांची आपल्या सर्वजातीच्या प्रजेवर सारखी ममता असे. राजेसाहेब हिंदूधर्मीय असल्यानें हिंदूधर्मशास्त्राप्रमाणें देवस्थान धर्मादाया-कडे असा त्यांचा ओढा होता तसाच आपल्या मुसलमान प्रजेनेंहि त्यांच्या धर्माप्रमाणें वागावें ह्मणून त्या लोकांकरितां मशीद, इदगा, दर्गा वगैरे इमारती त्यांनीं बांधून देऊन त्यांच्या व्यवस्थेसाठीं संस्थानांतून कायमच्या नेमणुका करून दिल्या. मुसलमान लोकांस उर्दू भाषेचें व त्यांच्या धर्मशास्त्राचें मोफत शिक्षण मिळण्याकरितां जव्हार येथें एक उर्दू शाळा स्थापिली. जव्हार येथें श्रीसदानंद ह्मणून एका अवलियाचा दर्गा आहे. हें पीराचें स्थान, राजघराण्यांतील एक कुलदैवत असून त्याचा उत्सव दरसाल भाद्रपदमासीं मोठा उरूस भरून करण्यांत येतो. या उत्स-वामध्यें इस्लामी धर्माचे जे विद्वान् लोक येतात त्यांनां त्यांच्या विद्वत्ते-नुरूप नेमणुका देण्याची पद्धत श्रीमंतांनीं सुरू केली. यावरून त्यांची धर्मांचे बाबतींत समतेची वागणूक कशी होती हें वाचकांच्या ध्यानीं येईल. सन १८९३।९४ सालीं मुंबई पुणें व इतर दुसरे ठिकाणीं हिंदू मुसल-मानांचे जे दंगे झाले त्या वावटळीची लाट जव्हार संस्थानांत जी मुळींच आली नाहीं याचें मुख्य कारण सर्व जातीच्या आपल्या प्रजेवर सारखी ममता हेंच होय. राजेसाहेबांची खाजगी वागणूक जशी प्रत्येकाशीं अत्यंत प्रेमळपणाची व सरळ असे तसाच त्यांचा दराराहि फार विलक्षण होता. राज्यकारभार हाकण्याची हातोटी जशी To be feared to be loved अशी असायला पाहिजे ह्मणून एका इंग्रज विद्वानाचें मत आहे तशी ती होती. संस्थानांत डोंगरी जातीच्या लोकांचीच वस्ती पुष्कळ. त्यांनींसुद्धां आपल्या धर्माप्रमाणें चालावें ह्मणून त्यांच्यासाठीं हिरोबा, वाघ्या, वेताळ

नारायणदेव वगैरे देवतांच्या पूजेअर्चेकडे योग्य ती सरकारांतून मदत व्हावी अशी योजना केली. या त्यांच्या उदार, प्रेमळ, व तसेंच करारी वागणुकीचा फायदा पुष्कळच झाला. या गोष्टीचें अधिक स्पष्टीकरण होण्यासाठीं एक दाखला दिला ह्मणजे पुरे आहे.

सन १८९७।९८ च्या सुमारास ठाणे नाशिक व नगर या जिल्ह्यांमध्यें कोळी, वारली, कातोडी वगैरे रानटी जातीच्या कांहीं लोकांनीं बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पुंडावा करण्याची सुरवात केली. या बंडवाल्या दरोडेखोर टोळीचे पुढारी हैबत्या खाडे व सख्या सातपुते या नांवाचे दोन कोळी जातीचे इसम होते. सख्या हा संस्थान हद्दींत रहाणारा जरी होता तरी संस्थानांतील त्याच्या जातीच्या लोकांकडून त्यास बिलकूल आश्रय मिळाला नाहीं; एवढेंच नव्हे तर डोंगरी जातीच्या सर्व रयतेनेंदेखील मनापासून त्याचा तिट्कारा करून तो बंडावा मोडण्यास संस्थान सरकारास तसेंच ब्रिटिश सरकारास योग्य प्रकारें मदत करून आपली राजनिष्ठेची कसोटी चांगलीच निदर्शनास आणिली. नाहीं तर हे जंगली अज्ञानी लोक, मेंढराच्या स्वभावानुसार सहजीं सदरील बंडवाल्यास सामील व्हावयाचे; परंतु राजेसाहेबांनीं ह्या बंडाचा मोड करण्याबद्दल सर्व बाजूंनीं आपली फारच शिकस्त केली. ह्या आणीबाणीचे प्रसंगीं ते बिलकुल देखील डगमगले नाहींत. ह्या संकटाच्या कसोटीमुळें व त्यांच्या बाणेदार सरळ वागणुकीमुळें त्यांची स्वभावतःच उज्ज्वल असलेली राजनिष्ठा उत्तम हत्याराला पाणी दिल्याप्रमाणें फारच प्रखर तेजानें इतकी चमकूं लागली, कीं, राजनिष्ठेचा पोकळ आव आणून तिचें फाजील स्तोम माजविणाऱ्या लोकांचे तर डोळेच दिपून गेले. पुंडाव्याचें मान वाढत जात आहे असें पहातांच त्यांनीं मुंबईसरकारकडे ब्रिटिश लष्कराच्या मदतीची मागणी केली. त्याप्रमाणें तिकडून ताबडतोब १९ वी पायदळ पलटणीची एक तुकडी सन १८९८ च्या आगस्ट महिन्यांत जव्हार येथें येऊन दाखल झाली. तिच्या मदतीकरितां राजेसाहेबांनीं एक स्वतंत्र आफिसर नेमून आपले सर्व पोलीस, शिबंदी, स्वारलोक, त्यांच्या दिमतीस दिले. इतकेंच करून

ते स्वस्थ बसले नाहींत, तर त्यांचें आतां लक्ष संस्थानचें पोलीस खातें सुधारून तें ब्रिटिश मुलखातील पोलीच खात्याच्या तोडीचें व्हावयास काय काय गोष्टी करावयाला पाहिजेत याकडे लागलें. त्यांनीं ताबडतोब त्यावेळचे. पो. ए. मि. ब्यारोसाहेब यांच्या सल्ल्यानें ब्रिटिश मिलिटरी पेन्शनर रा. गोविंद लिंबाजी शिर्के यांची संस्थानचे पोलीस आफीसरचे जागीं नेमणूक केली. सदर गृहस्थ हे बर्मावॉर, व अफगाणवॉर मध्यें इंग्रज सैन्यांतील एक नांवाजलेले सुभेदार होते. त्यांनीं संस्थानचें पोलीसखातें थोड्याच काळांत मिलिटरीच्या तोडीचें करून दाखविलें. असला लष्करमध्यें कसलेला माणूस लाभल्यावर त्यांनीं व वरील इंग्रजी लष्करचे तुकडीनें लौकरच इतका दरारा बसविला, कीं, बंडवाले आपलें सर्व चंबू गवाळें गुंडाळून संस्थान हद्दींतूनच काय पण ठाणे जिल्ह्यांतून देखील पार पळून गेले. अखेरीस त्यांचे पुढारी पकडले जाऊन बंडाचा पुरा नायनाट झाला व राजेसाहेबांच्या आपल्या रयतेवर असलेल्या अतोनात प्रेमालाच जय मिळला.

यांच सुमारास मुंबई पुणें वगैरे ठिकाणीं प्लेगनें अगदीं कहर उडवून दिला होता. अशा वेळीं राजपुत्रास बाहेर शिक्षणासाठीं ठेवणें सोईचें नव्हतें, ह्मणून केवळ नाईलाजास्तव राजकुमार कृष्णशहा यांनां सन १८९७ मध्यें मुंबईहून जव्हार येथें आणण्यांत आलें, व कायद्याचा अभ्यास त्यांनीं जव्हार येथें राहून करावा ह्मणून रा. रा. बाळकृष्ण भिकाजी सरदेसाई या विद्वान् गृहस्थास खासगी शिक्षक नेमिलें. (हल्लीं हे संस्थान मिरजमळा येथें कारभारी आहेत) शिवाय कारभारी आफिसमध्यें जाऊन त्यांनीं सरकारी कामाची माहिती घ्यावी अशी तजवीज केली. सन १८९६।९७ सालीं सर्व हिंदुस्थानभर जो भयंकर दुष्काळ पडला होता त्याचा परिणाम संस्थानांतहि झाला, नाहीं असें नाहीं, परंतु यावेळीं श्रीमंतांनीं मोठमोठीं दुष्काळी कामें व नवीन इमारती बांधण्याचीं कामें, तसेंच अनाथ व दुष्काळपीडित लोकांकरितां अन्न छत्रें, साधारण मध्यम प्रतीच्या गरीब लोकांकरितां स्वस्त दरानें धान्य पुरविण्याचीं सरकारी दुकानें, असे नानाप्रकारचे उपाय वेळींच योजून रयतेचें फारच संगोपन केलें. प्लेग सारखा संसर्गजन्य व भयंकर हानि-

कारक रोग आपल्या प्रांतांत मुळींच प्रादुर्भूत होऊं नये एवढ्यासाठीं राजेसाहेबांनीं फारच मोठी काळजी घेतली, आणि निरनिराळ्या सर्व उपायांची तावडतोब योजना केली. या प्रयत्नांत परमेश्वरानें त्यांनां यशहि दिलें. यामुळें ज्या प्लेगनें हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व खेडें न् खेडें सुद्धां सोडिलें नाहीं त्या प्लेगचा जव्हार हद्दींत कोठेंहि मुळींदेखील प्रवेश झाला नाहीं. याचें सर्व श्रेय राजेसाहेबांकडेसच आहे. या सत्कृत्याबद्दल जव्हार संस्थानच्या प्रजेपैकीं व्यक्तिमात्र राजेसाहेबांच्या अत्यंत ऋणांत आहे हें कोणीहि प्रांजलपणें कबूल करील.

सन १८९७ च्यां आरंभापासून श्री. सौ. सरस्वतीबाई राणीसाहेब यांची प्रकृति थोडथोडी बिघडत जाऊन माघ शु॥ १० शके १८२० रोजीं त्यांचा अंत झाला. या दुःखानें श्रीमंतांच्या मनावर बराच जोराचा धक्का बसला. याच वर्षी मे महिन्यांत वडील राजपुत्र श्री. कृष्णशहा यांचा अजनूप येथील ( विगत पुरी तालुक्यांतील एक गांव ) रा. बारकूजी पाटील घारे यांच्या कन्येशीं मोठ्या थाटानें जव्हार येथें विवाह झाला. ( ह्याच श्रीमती राधाबाई राणीसाहेब होत. ) ह्या वेळीं जव्हार नगरीला कांहीं अपूर्व शोभा आली होती. राजेसाहेबांचें हें पहिलेंच कार्य. किंबहुना थोरले पतंगशहा यांचे लग्नानंतर आपल्या स्वतःच्या हातांनीं आपल्या औरस राजपुत्राचे लग्नासारखा अत्यंत मंगलकारक समारंभ करण्याची वेळ आज अर्ध्या शतकानंतर आली असल्यानें राजेसाहेबांनीं हा लग्नसमारंभ फार उत्साहानें आणि अतिशय आनंदानें करणें अगदीं साहजिकच होतें. त्यांत राजेसाहेबांच्या गुणग्राहकतेची व औदार्याची भर पडली असल्यानें सुमारें १५ दिवस जव्हार नगरी गुणीलोक, याचक लोक, व बडेबडे विद्वान् व श्रीमान् पाव्हणे मंडळी–कीं जी जव्हारला कधींसुद्धां येणारी नाहींत–अशा सर्व तऱ्हेच्या व सर्व दर्ज्यांच्या लोकांनीं अगदीं गजबजून गेली होती. राजेसाहेबांनीं ह्या वेळीं अत्यंत सढळ हातांनीं सर्वांचा यथोचित सत्कार केला. या लग्नाच्या सुमंगल प्रसंगाचें सर्व वर्णन आह्मी विस्तारभयास्तव या स्थलीं देत नाहीं; परंतु थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे या

वेळीं जव्हार राजधानी आपल्या ऐश्वर्यशृंगाराच्या थाटमाटानें नखशिखांत नटून गेली होती.

सन १८८५ पासून व पुढें सन १८८८ मध्यें रा. जोग यांनां कारभारी नेमिल्यापासून त्यांच्या टापटीपीच्या, दक्षतेच्या व राजेसाहेबांच्या प्रागतिक धोरणास अनुसरून त्यांच्या मनाजोगा होणाऱ्या हरएक कामकाजामुळें आतांपर्यंत राज्यकारभाराचें गाडें यंत्रासारखें अगदीं रेखीव सुरळीत व फारच शांत मजेदारपणें चाललेलें होतें. सन १९०२ मध्यें घडून आलेली महत्वाची गोष्ट ह्मणजे त्यावर्षीं मे महिन्यांत राजकन्या. श्री. सौ. चंपाबाईसाहेब यांचा व कनिष्ठ चिरंजीव श्री. मार्तंडराव भाऊसाहेब ( हल्लींचे श्री विक्रमशहा राजेसाहेब ) यांचा जव्हार येथें मोठ्या थाटानें विवाह झाला. हें सुमंगल कार्य राजेसाहेबांच्या कारकीर्दींतील शेवटचेंच असें ह्मणावयाचें; आणि ह्मणूनच कीं काय या वेळीं त्यांच्या सर्व गुणांचा परिपोष एकत्र होऊन त्यांच्या औदार्यगंगेला जणूं कांहीं मोठा पूर आला होता. जव्हार नगरी आपल्या शृंगाराचा कळस झाला ह्मणून प्रमुदित अंतःकरणानें डुलत होती. ह्याच सालीं जव्हार केळघर रस्त्याचें काम जारीनें सुरू झालें. नवीन डिस्पेंसरीची इमारत व पोलीस चावडी आणि पोलिस लोकांनां रहाण्याकरितां एक मोठी लाईन ह्या इमारतीचीं कामें ह्याच सुमारास पुरीं करण्यांत आलीं. यापुढेंहि कोणत्याना कोणत्या बाबतींत सुधारणा अंमलांत आल्याविना एक वर्षहि सुनें गेलें नाहीं.

# प्रकरण सहावें.

## अजारीपण व मृत्यु.

राजेसाहेबांची शरीरप्रकृति अतीशय मजबूत अशी जरी नव्हती तथापि अत्यंत नाजूकहि नव्हती;परंतु कौटुंबिक स्थितीमुळें व राज्यकारभाराच्या अतिशय दगदगीमुळें ते या वेळेपासूनच थोडेसे उतारवयाचे दिसूं लागले. पुढें सन १९०४ च्या आरंभापासून कांहींना कांहीं शुष्क दुखण्यांनीं त्यांची तब्येत नेहमीं आजारी असे. दिवसेंनुदिवस ते जास्तच अशक्त व थकलेले दिसूं लागले. सन १९०५ च्या जानेवारीच्या पंधरा तारखेनंतर ते अगदींच अंथरुणावर पडले. श्रीमंतांच्या अत्यंत लोभांतले डाक्तर नानासाहेब देशमुख हे जव्हार येथें मुद्दाम येऊन राहिले होते. त्यांनीं औषधोपचाराची आपलेकडून पराकाष्ठा केली; परंतु परमेश्वरानें त्यांनां त्यांत यश दिलें नाहीं.राजेसाहेब पुढें जानेवारीच्या २७ व्या तारखेस कैलासवासी झाले.

" अद्य वाऽब्दशतांते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः "

हें वाक्य जेथपर्यंत प्रसंग नाहीं तेथपर्यंतच.परंतु तो आला ह्मणजे आपण मायापाशांत गुरफटलेले जे अज्ञ लोक त्यांचें हें शाब्दिक ब्रह्मज्ञान जेथल्या तेथेंच रहातें. वरील दिवशीं राजकुटुंबांतील सर्व मंडळींनां तसेंच संस्थानच्या अखिल प्रजाजनांना जें दुःख झालें त्याचें वर्णन करण्यास या लेखकाच्या लेखणीस सामर्थ्य नाहीं. ज्यांनां ज्यानां ह्मणून राजेसाहेबांच्या नांवाचा परिचय झालेला होता त्या सर्वांच्या तोंडून दुःखोद्गार निघाल्यावांचून राहिले नाहींत. अस्तु. ईश्वरेच्छेनुरूपच जगांतील सर्व कांहीं गोष्टी व्हावयाच्या. मानवी इच्छा व प्रयत्न त्यापुढें फोल आहेत.

## स्वरूप व स्वभाव.

राजेसाहेबांच्या शरीराची ठेवण सडसडीत होती. त्यांचा बांधा मध्यम होता. प्रकृति निरोगी असे. ते जात्या इतके सुंदर व देखणे जरी नव्हते तरी त्यांचा चेहरा अत्यंत सतेज व रुबाबदार असून डोळे मोठे व पाणि-

दार होते. त्यांच्याकडे पाहिल्याबरोबरच कोणाहि पाहाणाऱ्याच्या मनांत त्यांच्या विषयीं आदर व उच्च भावना प्रादुर्भूत झाल्याविना रहात नसत; याबद्दल वरील त्यांच्या फोटोवरून वाचकांची खात्री होईल.

राजेसाहेबांची रहाणी फारच साधी असे. त्यांचा खाजगी नेहमींचा पोषाख ह्मटला ह्मणजे साधें फार लांबलचक नाहीं असें धोतर. अंगांत एक पांढरा सद्रा. सकाळच्या प्रहरीं आणि रात्रीच्या वेळीं कधीं कधीं ते फारतर नागपुरी रेशीमकाठी उपर्णें पांघरीत. डोक्यास थंडीचे वेळीं पांढरी कानटोपी व इतर वेळीं मखमालीची साधी लांबट टोपी असे. ते अशा वेळीं पांढरा पायघोळ अंगरखा, पांढरी हिंदुस्थानी रिवाजाची विजार, डोकीस मराठेशाई पागोटें व खाकेंत पांढरा स्वच्छ दुशेला घेत असत. छचुरी पोषाकाचा त्यांनां मनापासून अत्यंत तिटकारा असे. व अशा तऱ्हेचा कोणी पोषाक केल्यास त्याचा ते उघडउघड निषेध करीत.

## दिनचर्या.

राजेसाहेबांच्या रोजच्या दिनचर्येचा क्रम साधारणतः असा होता:— ते नेहमीं मोठ्या पहाटेस उठत. त्यांच्या निजण्याच्या खोलीची समोरची खिडकी उघडली कीं तेथून राजवाड्यासमोरील देवालयांतील श्रीगणपतीचें स्वच्छ दर्शन होतें. त्याप्रमाणें ते उठल्याबरोबर दैवदर्शन करीत. नंतर लागलीच शौच मुखमार्जनादि विधि आटोपून तसेच ताबडतोब घोड्यांच्या पागेंत व गाई ह्मशींच्या गोठ्यांत जात व तेथील सर्व व्यवस्था आपल्या नजरेनें पाहाण्यासाठीं कधीं कधीं तर ते तेथें दोन दोन तास देखील घालवीत. सुमारें आठ वाजण्याच्या वेळीं ते आपल्या बैठकीच्या खोलीमध्यें एक तास बसून सरकारी कामकाज पहात. यानंतर तास दीड तास ते आपल्या ऑफिसरांची व इतर नवीन गृहस्थ आल्यास त्यांची भेट घेऊन त्याच्याशीं मोकळ्या मनानें चार शब्द बोलत. यावेळीं जगांतील प्रचलित विषयासंबंधानें सुद्धां ते केव्हांकेव्हां चर्चा करीत. "टाइम्स"चें आर्टिकल ते दररोज नियमानें आपण वाचीत किंवा कोणाला वाचावयास सांगत.

नंतर ते स्नानाला जात. स्नान झाल्याबरोबर देवघरांतील श्रीझाळसाकांताचें दर्शन घेऊन जेवीत. पुढें तासभर आपल्या कुटुंबांतील लहानथोर सर्वांशीं प्रेमानें सुखदुःखाच्या गोष्टी बोलण्यांत घालवीत. बारा वाजल्यानंतर वामकुक्षी करीत. दोन ते चार साडेचार पर्यंत सरकारी कामकाज पहात. पुढें तास दीडतास बुद्धीबळें, दशावतारी गंजिफा, सोंगट्या पत्ते वगैरे खेळण्यांत वेळ जात असे. सेशन कोर्टांतील खटल्यासारखें सरकारी महत्त्वाचें काम असल्यास वरील बाकीच्या सर्व गोष्टींस फाटा देऊन दरबारांत ते चार चार तास सारखे बसत. राजकुमारांस ते या वेळीं आपल्याबरोबर आणीत. सायंकाळीं केव्हांकेव्हां ते घोड्यावर तर कधीं पायीं तर कधीं गाडींत बसून फेरफटका करण्यास जात. अस्तमानानंतर टपाल आल्यावर तें पहाण्यांत व वर्तमान पत्रें वगैरे वाचण्यांत त्यांचा कांहीं वेळ जात असे. रात्रौ ९ च्या पुढें ते निजावयास जात. प्रसंगविशेषीं रात्रीं ते गाणें बजावणेंहि करीत. त्यांनां शास्त्रोक्त संगीताचा मोठा षोक होता. त्यासाठीं त्यांनीं दत्तोपंत फडके या नांवाचे एक सुप्रसिद्ध रुद्रबीनकार व जगन्नाथपंत कडेकर या नांवाचे एक उत्कृष्ट पखवाजी यांनां मुद्दाम आपले पदरीं बाळगिले होते. राजेसाहेब जेवण झाल्यावर फक्त विडा खात. तंबाखु खात नसत. नुसता विडा खाण्याबद्दल त्यांच्यासमोर आबालवृद्धांनां मुभा असे. ते विडी ओढीत असत. गुरांचा नाद त्यांनां लहानपणापासूनच होता. त्याकरितां त्यांनीं जव्हारपासून २ मैलांवर गरदवाडी या खेड्यांत सुमारें पांचशें गाई म्हशी वगैरे बाळगून त्यासाठीं एक मोठी थट्टी बांधली. जनावरांची उत्तम पैदास आपल्या प्रांतांत व्हावी म्हणून त्यांचे त्या दिशेनें प्रयत्नहि चालू होते. त्यासंबंधें त्यांनीं शास्त्रीय रीतीची बरीच माहिती करून घेतली होती. ते घोड्यावर बसण्यांत फार पटाईत होते. प्रो. विष्णुपंत छत्रे यांच्या सहवासानें अश्वपरीक्षेची त्यांनां चांगली माहिती झाली होती. त्यांनीं आपल्या पागेंत आरबी, काठेवाडी व भीमथडी वगैरे उत्तम जातिवान् घोडे बरेच ठेविले होते. त्यांनां थोडा शिकारीचा नादहि होता. राजेसाहेबांचें अंतःकरण अत्यंत दयाळू होतें. ते मोठे प्रेमळ, विनोदी, बहुश्रुत व रसिक असे

होते. त्यांच्या साध्या रहाणीचें वर्णन वर दिलेंच आहे. ते मोठ्यापासून लहानापर्यंत, आपल्या बरोबरीच्या राजेरजवाड्यापासून तो अगदीं कंगाल भिकाऱ्यापर्यंत सर्वांशीं सारख्या प्रेमानें गोड शब्द बोलत, व यथानुशक्ति ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूप त्याचा परमार्ष घेत. राजेसाहेबांच्या भेटीला कोणालाहि मज्जाव नसे. कधींकधीं तर ते हातचें काम टाकून खालीं कोणी गरीब माणूस आपल्याकडे आल्याचें समजतांच खिडकींत मुद्दाम उभें राहून त्याचें सर्व ह्मणणें फार शांतपणें ऐकून घेत. सरकारी कामकाजासंबंधें तर ते गांवच्या मिराश्याशीं सुद्धां पुष्कळ वेळ मोकळ्या मनानें बोलत बसत. संस्थानीं आपल्याकडे विद्वान् व गुणी लोक यावे व त्यांच्या सहवासांत आपला कांहीं तरी काल जावा अशी राजेसाहेबांची सुतरां इच्छा असे. त्याप्रमाणें ते अशा लोकांनां केव्हां केव्हां मुद्दाम आग्रहानें बोलावीत. रावसाहेब मंडलीक, बापूसाहेब आठले, विष्णुपंत दादा छत्रे वगैरे गृहस्थ राजेसाहेबांचे पाव्हणे ह्मणून जव्हार येथें कित्येक दिवस राहात. तात्पर्य, गुणी लोक आपल्या घरीं आले ह्मणजे त्यांनां फार धन्यता वाटे, व त्यांचा ते अत्यंत आदर सत्कार करीत. त्यांच्या प्रत्येक गुणाचीं उदाहरणें देऊं ह्मटलें तर तो एक मोठा ग्रंथच होईल; तथापि कांहीं निवडक गोष्टींची, या लेखकाच्या व त्याच्या वडिलांच्या प्रत्यक्ष अनुभवांचीं अशीं उत्तमोत्तम उदाहरणें या राजेसाहेबांचें विस्तृत चरित्र लिहिण्याचें भाग्य माझ्या वाटेस आल्यास त्यामध्यें ग्रंथित करण्याचा विचार आहे. राजेसाहेबांस बहुतेक सर्व विषयांचें थोडें बहुत तरी परिज्ञान झालेलें होतें, आणि त्यांतच त्यांच्या उदार स्वभावाची भर पडल्यानें या संस्थानची एका संस्कृत कवीच्या "राजेंद्र कुपिता कीर्तिस्तेन देशांतरं गता" या वर्णनाप्रमाणें गुणग्राहकतेबद्दल व दातृत्वाबद्दल सर्वत्र कीर्ति पसरली श्रीमंतांचे अंगीं गुणग्राहता किती होती व आपल्या पदरीं राजा भर्तृहरीप्रमाणें उत्तमोत्तम विद्वद्रत्नें असावींत अशाबद्दल त्यांची किती उत्कट इच्छा असे यासंबंधानें कै. प्रो. विष्णुपंत छत्रे यांच्या रा. नारायण कृष्ण गद्रे यांनीं लिहिलेल्या चरित्रांतील थोडासा उतारा देणें येथें अस्थानीं होणार

नाहीं. " श्री. रघुनाथराव अण्णासाहेब विंचूरकरांसारख्या आपल्या एकाच पुत्राकरवीं तिनें प्रथमारंभीं विष्णुपंतांच्या गुणांचें परीक्षण करविल्यावर, आणि ते या परीक्षणांत किती उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण झाले,हें पाहिल्यावर, लक्ष्मीबाईनीं आपल्या इतर पुत्रांसही, ह्या गुणी पुरुषाचा संग्रह करण्याविषयीं उपदेश चालविला. तेव्हां, आपल्या हौसेस अनुरूपच उपदेश करणाऱ्या त्या मातृभक्त लक्ष्मीपुत्रांनीं भराभर त्या उपदेशानुरूप वागण्याचें कसें ठरविलें, हें वर आपण कुरुंदवाडकर त्रिवर्ग आणि सरदार कागलकर यांच्या उदाहरणानें जाणलेंच आहे.हाच प्रकार कै. श्रीमंत महाराज पतंगशहा —राजेबहाद्दर यांच्यासंबंधानेंहि लवकरच घडून आला. हे पतंगशाहाही-आंग्लविद्या शिक्षणार्थ असत. तेव्हां सहजच त्यांना विष्णुपंतांचे गुण प्रत्यक्ष पहाण्यास अनेकवेळां सांपडले त्यावरून असल्या गुणीं मनुष्याची संभावना केल्याचें, आणि त्याच्या गुणांचा उपयोगही करून घेतल्याचें, दुहेरी यश संपादण्याची इच्छा त्यांस होणें हें त्यांच्या जातिवंत राजेपणांस योग्यच होय. पतंगशहांनीं आपला मनोदय विष्णुपंतांस कळविला, तेव्हां विष्णुपंतांनींही त्यांच्या उदारपणाचा यथायोग्य गौरव केला, आणि सांगितलें कीं, "महाराजांच्या उद्देशानुरूप घडावें कसें, हाच काय तो प्रश्न आहे. कारण, आपणांकडे मीं केव्हां आणि किती दिवस रहावें ? अथवा मला कसें रहातां येईल, हेंच समजत नाहीं. तेव्हां तें आपणच सुचविल्यास ठीक पडेल !" एतावता, पतंगशहायांच्या ह्मणण्याप्रमाणें जमून येण्यास कित्येक अडचणीच होत्या खऱ्या, तथापि शेवटीं शके १८०० नंतर, त्या तितक्याहि अडचणींतून राजेबहाद्दरांचा आणि विष्णुपंतांचा कायमचा संबंध जडलाच. राजेबहाद्दरांनीं विष्णुपंतांस प्रत्यक्ष जव्हारीस अमूक एक ऋतूंत अमूक एक दिवस राहावयासच पाहिजे, अशाप्रकारचा कांहीं एक निर्बंध न घालतां मोघमच असें ठरविलें कीं, " आपलीं दोन तीन घोडीं मोतद्दारां-सुद्धां कुरुदवाडास किंवा जेथें विष्णुपंत जेव्हां असतील तेथेंच राहतील. घोड्यांचा आणि गडी माणसांचा खर्च अर्थात्, संस्थानांतून होईलच, आणि खुद्द विष्णुपंतांस अडीचशेंपासून तीनशें रुपयांचें वर्षासन पोचेल."

श्री पतंगशहा राजेबहाद्दर विष्णुपंतांस ' वस्ताद, ' ह्या नांवानें नेहमीं संबोधीत. खुद्द जव्हारकरांच्या वाड्यांत घोडे फिरविण्याकरितां एक पक्क्या विटांनीं बांधून काढलेलें अश्वमंडळ किंवा घोड्यांचें रंगण कायमचेंच करून ठेवलेलें आहे. तें अद्यापहि पहावयास सांपडतें."

प्रो. विल्सन साहेबांची सरकस प्रथमतः जेव्हां हिंदुस्थानांत आली तेव्हां त्या धर्तीवर प्रो. विणुपंत छत्रे यांच्याकडून अशीच नवी देशी सरकस तयार करावी असें श्रीमंत राजेसाहेब व विंचूरकर, कुरुंदवाडकर वगैरे इतर श्रीमंत संस्थानिक यांचे मनांत येऊन त्यांनीं त्यासंबंधें विष्णुपंत छत्रे यांनां विचारणा केली तेव्हां "आपण जर मनुष्यबळ आणि जनावरें ह्यांचा पुरवठा केलात तर आठ दहा महिन्यांतच आपण सर्वांस हा खेळ करून दाखवूं" असें त्यांनीं उत्तर दिलें. श्रीमंतांनीं ही गोष्ट मान्य केली. आणि पुढील व्यवस्था त्यांच्याच शब्दांनीं द्यायची ह्मणजे "विष्णुपंत ह्मणतात;—त्या दिवसापासून कुरुंदवाडकर विंचूरकर व जव्हारकर ह्यांचीं घोडीं बजपाशीं शिकण्याकरितां होतीं. त्याप्रमाणें ह्याच घोड्यांस कुरुंदवाड मुक्कामीं शिकविण्यास प्रारंभ केला. वगैरे."

महाराजांनीं हा जो प्रथमारंभीं विष्णुपंतांनां उदार आश्रय दिला त्यामुळें त्यांची गुणग्राहकतेबद्दल व दातृत्वाबद्दल विष्णुपंतांच्या तोंडून अखिल भरतखंडांत कीर्ति पसरली. विष्णुपंतांना याबद्दल राजेसाहेबांसंबंधीं फार अभिमान असे व तो ते आपल्या सरकशीच्या खेळाच्या अखेरीस त्यांच्याबद्दल धन्यवाद गाऊन बोलून दाखवीत. राजेसाहेबांची स्वारी पुणें मुंबईस आल्याचें समजतांच विष्णुपंत मुद्दाम आपली सरकस घेऊन तेथें येत. खास राजेसाहेबांकरितां निदान एकतरी खेळ केल्याविना व गाणें बजावणेंची मैफल केल्याविना ते रहात नसत. एवढेंच नव्हे तर राजेसाहेबांच्या नांवाला ते इतकें मानीत कीं, त्यांची सरकत कोठेंहि असो तेथें जव्हार संस्थानचा रहिवासी कोणी जरी गेला तरी त्यास त्याच्या इच्छेस वाटेल तेथेंपर्यंत सरकसीस येण्याची सदर परवानगी असे. त्याला तिकिटाची जरूरच लागत नसे.

विष्णुपंताचा व राजेसाहेबांचा स्नेहसंबंध जडल्यानंतर राजेसाहेबांनीं त्यांच्या परीक्षेचीं उत्तम जातिवंत घोडीं आपल्या पागेंत कितीतरी बाळगिलीं होती. शिवाय वाघ, तरस, हरिणें, मेंकरें निरनिराळ्या जातीचीं कुत्रीं, रोही माकडें, मोर, खबुतरें नानातऱ्हेचे पोपट वगैरे इतर पक्षी यांचा संग्रह करून "शिकारखाना खातें" ह्मणून एक निराळें खातेंच आपल्या खाजगीकडे ठेवलें होतें. विष्णुपंतांची फेरी जेव्हां वर्ष दोन वर्षांनीं जव्हारीस होई, तेव्हां "पागाखातें" व "शिकारखाना खातें" यांची एक तऱ्हेची परीक्षाच घेतली जाई. श्रीमंतांनीं आपल्या पदरच्या चाबूकस्वारांचीं दोन मुलें मुद्दाम विष्णुपंतांकडे कांहीं वर्षें शिकण्यास ठेविलीं होतीं. विष्णुपंत हे रागी आणि बागी ह्मणजे उत्तम गवई व उत्तम घोडेस्वार होते, या त्यांच्या गुणांचा आस्वाद राजे साहेबांनीं मनमुराद घेतला. सन १८९२ मध्यें राजेसाहेबांनीं विष्णुपंतास पाठविलेल्या पत्रांचें उत्तर जें ह्या लेखकास एकदा पहाण्यास मिळालें होतें ह्यावरून त्यांचा अश्वविद्येसंबंधानें निरनिराळे जुने ग्रंथ शक्य तेवढे मिळवून ते एकत्र करून विष्णुपंतांच्या अनुभवाची त्यांत भर घालून ते छापून प्रसिद्ध करण्याचा इरादा होता. असें दिसतें. राजेसाहेबांपाशीं विष्णुपंतांनीं दिलेल्या घोड्यांच्या औषधोपचार, मसाले, वगैरे संबंधाच्या कित्येक यादी संग्रहास होत्या, व त्यांचा त्यांनीं योग्य तो उपयोगही करून घेतला. जव्हारकरांची पागा त्या काळीं फार नामांकित ह्मणून गणिली जात असे. मागें निर्दिष्ट केलेले मि. राबर्टसन साहेब बाहादूर यांनीं राजेसाहेबांकरितां विलायतेहून मुद्दाम जी आस्ट्रेलियन काळ्या घोड्यांची जोडी, गाडीकरितां पाठविली होती, त्या जोडीनें एकदा पुण्यापासून खडकीपर्यंत आगगाडीच्या वेगानें खडकी स्टेशन गांठून राजेसाहेबांची निकडीची कामगिरी बजाविली होती. असो. सन१८९७सालीं प्रो. विष्णुपंत यांनां सुप्रसिद्ध गवई रहिमतखां यांच्यासुद्धां सुमारें ३।४ महिने राजेसाहेबांनीं जव्हार येथें ठेवून घेतलें होतें. त्या दिवसांची मजा काय वर्णन करावी ? जव्हारकरांच्या स्मृतिपटलांतून तो मजा केव्हांहि नाहींसा होणें शक्य नाहीं.या लेखकाला त्या वेळेचा राजे-

साहेबांचा कार्यक्रम जो आठवतो आहे तो असा:—विष्णुपंत यांचा मुक्काम जव्हार येथें रहदारी बंगल्यावर असे. मोठ्या पहाटेस उठून ते व राजेसाहेब घोड्यावर बसून फिरावयास जात. ते सूर्योदयाबरोबर राजवाड्या नजीकच्या मंडळापाशीं परत येत, मग क्रमानें सर्व घोड्यांनां रंगण धरण्यास स्वरांनां लावीत. हें काम सुमारें १० वाजेपर्यंत चाले. गांवांतील कांहीं होतकरू तरुणांनांसुद्धां यावेळीं मुद्दाम बोलावून आणून विष्णुपंतांकरवीं त्यांनां घोड्यावर बसण्याचें शिक्षण देण्यांत येई. राजपुत्र कै. कृष्णशहा व हल्लींचे राजेसाहेब विक्रमशहा यांनांहि मंडळांत घोड्यावर बसून रंगण धरण्यास शिकविलें जात असे. नंतर सायंकाळींही याच प्रमाणें क्रम चाले. रात्रौ भोजनोत्तर दिवाणखान्यांत रहिमतखां यांचें गाणें व दत्तोपंत फडके यांचें रुद्रवीणा वादन चाले. कै. जगन्नाथपंत कडेकर पखवाजी व इतर गायक वादक यांचीहि मजलस होत असे. थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे जव्हार त्या वेळीं गोकुळासारखें आनंदानें गजबजलेलें दिसत होतें. यापेक्षां अधिक उठावदार वर्णन करण्याची ताकत या लेखकाचे लेखणींत नाहीं, त्यास ना इलाज. असो. राजपुत्र कै. कृष्णशहा हे मुंबईस एलफिन्स्टन हायस्कूलमध्यें शिकत असतां त्यांनां मधुनमधून जी राजेसाहेबांचीं पत्रें जात त्यांत विष्णुपंतांकडून अश्वपरीक्षेची व अश्वारोहण विद्येची चांगली माहिती करून घेण्याबद्दल फार आग्रहाचा व अत्यंत कळकळीचा उपदेश असे. विष्णुपंतांशीं राजेसाहेबांच्या जडलेल्या संबंधाबद्दल इतकें अधिक लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, त्या सुप्रसिद्ध व्यक्तीच्या योगानें श्रीमंताचे कीर्तीस दूरवर विस्तार पावण्यास बरीच मदत झाली. यासंबंधानें एकच उदाहरण दिलें ह्मणजे वाचकांची चांगली खात्री पटेल. सन १९०० सालीं नेपाळच्या समशेरजंग बहादूर महाराजांनीं व काश्मीरच्या महाराजांनीं विष्णुपंत छत्रे यांचे अध्यक्षतेखालीं गाण्याबजावण्याचे जे मोठे जलसे केले त्यांत राजेसाहेबांनीं आपल्या पदरचे आश्रित रा. दत्तोपंत फडके रुद्र बीनकार यांचे चिरंजीव कै. गुंडोपंत रुद्रबीनकार यांनां मुद्दाम विष्णुपंतांबरोबर पाठविलें होतें व तेथें त्यांची वहावा किती झाली हें सर्वश्रुत

असल्यानें त्याबद्दल येथें अधिक तें काय लिहावें? सन १९०४ च्या दसऱ्याच्या सणास विष्णुपंत जव्हारीस आले होते. ही त्यांची शेवटचीच खेप. राजेसाहेबांचेंसुद्धां घोड्यावर अखेरचेंच बसणें ह्मणावयाचें. कारण पुढील सालींच ते वारले.

राजेसाहेबांनां माणसांची परीक्षा फारच उत्कृष्ट व लौकर करितां येत असे. एकदा आपल्या परीक्षेंत उतरलेल्या इसमाला ते सहसा दूर करीत नसत. जुन्या नौकरचाकरांवर त्यांची फार मेधा असे. बरेच दिवसांचा नौकर झाला ह्मणजे त्याबद्दल ते अभिमान बाळगीत. अशा प्रकारच्या वरच्या दर्जाच्या नौकरांना ते फार बहुमानानें वागवीत. त्यांच्या चांगल्या कामाबद्दल ते त्यांची प्रशंसा करीत. आपल्या कुटुंबापैकींच ते, असें ते वारंवार बोलून दाखवून त्यांच्या सांसारिक अडचणीसंबंधें ते त्यांचा प्रसंगाप्रसंगानें फार परामर्ष घेत. यामुळें प्रत्येक नौकर आपलें काम फारच झटून आणि मेहनतीनें व अत्यंत इमानानें करी. त्यांच्या सर्व नौकरवर्गाची वृत्ति नेहमीं समाधानी व आनंदी असे. यामुळें हरएक काम कसें बिनबोभाट व सुरळीत चाले.

कोणाची कोणत्या कामावर योजना केली असतां आपलें राज्यकारभाराचें धोरण व गाडें सुरळीत चालेल याची अटकळ ते आपल्या मनांनीं बरोबर करीत, व त्याप्रमाणें योग्यतेनुसार नेमणुका केल्या जाण्याची ते फार काळजी घेत, यामुळें हरएक नोकराचें काम उठावदार होत असे. विशेष कारणाशिवाय नोकराची हालचाल करावयाची नाहीं अशी त्यांची साधारण प्रवृत्ति होती. याचा परिणाम असा होईल, कीं, कायमपणाच्या खात्रीनें व पुष्कळ दिवसांच्या सवईनें नेमलेलें काम त्या त्या नोकराकडून सहज लीलेनें होत असे, व सुधारणा करण्यास त्यांनां वेळ मिळत असे, व उत्साहही वाटत असे. नोकरांना कसें वागवावें ही कला जणूं कांहीं त्यांच्या अंगांत मुरून गेली होती. राजेसाहेबांनीं आपल्या राज्यशकट हाकण्याचे कामांत व इतर खाजगी व्यवहाराचे कामांत उत्कृष्ट

माणसांचीच सल्लागार ह्मणून निवड केली होती. राज्यकारभाराचे राजकीय धोरणाचे बाबतींत त्या त्या वेळचे इलाखाधिपति, त्यांचे कौन्सिलर्स आणि संस्थानचे पोलिटिकल एजन्ट यांचा ते हरहमेष सल्ला घेत. तसेच कायदेकानू न्याय मुनसबा यासंबंधीं महत्त्वाचे प्रश्नासंबंधें रावसाहेब मंडळीक व माधवराव आपटे व त्यांचे पश्चात् बापूसाहेब आठल्ये व नंतर माधवरावजी बोडस या विद्वान् गृहस्थांचीं ते मतें घेत. व तेहि त्यांनां फार आनंदानें मदत करीत. राजेसाहेबांनां घोड्यांचा षोक फार होता. त्या त्या कामामध्यें ते कै. विष्णुपंतदादा छत्रे यांच्या पसंतीनेंच सर्व व्यवस्था करीत. तसेच त्यांनीं सुप्रसिद्ध डाक्तर नानासाहेब देशमुख यांनां आपले Medical Adviser नेमिलें होतें. राजकुटुंबांतील मंडळीच्या तब्येतींत प्रसंगविशेषीं तसाच कांहीं कमजास्तपणा झाला तर डाक्तर नानासाहेब ह्यांचे खेरीज दुसऱ्या कोणाकडूनही ते औषधोपचार करून घेत नसत. डाक्तर देशमुख यांच्यावर राजेसाहेबांची फार मोठी श्रद्धा होती. संस्थानांतील वैद्यखात्यामध्यें त्यांच्याच अनुमतीनें ते फेरफार घडवून आणीत. याच प्रमाणें इतर बाबतींतसुद्धां त्यांनीं त्या त्या कामांत जे निष्णात व नांवाजलेले असतील त्यांचाच सल्ला घेण्याचें व्रत आमरण पाळलें होतें. यामुळें राजेसाहेबांची प्रत्येक गोष्ट फारच उत्कृष्ट प्रकारें पार पडत असे. त्यांनां कोणत्याहि कामांत अडचण अशी कधींच भासली नाहीं. राज्यकारभार चालविण्यासारखें मोठ्या जबाबदारीचें, महत्त्वाचें व कठीण काम त्यांनां करतलामलकवत् झालें होतें.

त्यांची स्मरणशक्ती मोठी दांडगी होती. एकदां पाहिलेली वस्तु किंवा एकदां भेटलेला मनुष्य पुनः कितीहि दिवसांनीं त्यांच्यापुढें येवो ते त्यास बरोबर ओळखीत. त्यांच्या बालपणांतील खेळगडी, व विद्यार्थी दशेंतील सहाध्यायी हे, या त्यांच्या गुणामुळें पुष्कळ वेळ, त्यांच्या भेटीस येत असत. कधींकधीं तर ते मुद्दाम त्यांनां बोलावून घेत, व आपल्या बालपणांतील घडलेल्या गोष्टींबद्दल मोठ्या प्रेमानें व मोकळ्या मनानें त्यांच्याशीं तासचेतास बोलत बसत. या स्नेही मंडळींनां ते अगत्यपूर्वक आपले पाव्हणे

ह्मणून कित्येक दिवस मुद्दाम वाड्यांत ठेऊन घेत. लहानपणच्या संवगड्याशीं प्रेमसंवाद करण्याचे सुखाचा अनुभव सर्वांनां आहेच तेव्हां याबद्दल अधिक तें काय लिहावें ?

राजेसाहेबांचें अंत:करण फारच दयार्द्र होतें हें मागें सांगितलेंच आहे. ते मनाचे इतके कोवळे असत कीं, गांवांत कोणी ओळखीचा इसम आजारी झाल्याचें समजतांच ते आपल्या जवळच्या नौकरास तावडतोब त्याच्या शोधसमाचारास पाठवीत. एवढेंच करून ते थांबत नसत, तर डॉक्टरास मुद्दाम बोलावून आणून त्याच्या औषधपाण्याची तजवीज करण्यास आपण स्वत: सांगत. केव्हां केव्हां तर ते परिचित माणसाच्या—मग तो गरीब असो वा श्रीमंत असो—नौकर असो वा नसो—कोणत्याहि दर्जाचा तो असो—त्याच्या घरीं स्वत: समाचारास जात व त्याच्या अडचणी शक्य त्या दूर करीत. बाहेर ठिकाणच्यासुद्धां दैवी आपत्तींत सांपडलेल्या माणसांनां ते यथाशक्ति मदत करीत व धीर देत असत.

राजेसाहेब मराठी भाषा फारच शुद्ध बोलत. त्यांच्या वाणींत एकतऱ्हेचा रस भरलेला असे, त्यामुळें त्यांच्याशीं गप्पा गोष्टी करतांना कोणालाहि तेथून उठावें असें वाटत नसे. युरोपियन ऑफिसर अगर तसाच मोठा आंग्लविद्याविशारद गृहस्थ असल्यास त्याच्याशीं संभाषण करतांना मात्र ते इंग्रजी बोलत. एरव्हीं, इंग्रजी बोलण्याचा त्यांचा फारसा प्रघात नसे. फार तर काय, पण मराठी बोलतांनां मध्यंतरीं इंग्रजी शब्द सहसा कधीं ते वापरीत नसत. समोरच्या माणसाशीं कोणत्या भाषेंत कोणत्या विषयावर कशा प्रकारें बोलावें हें त्यांनां चांगलें साधलें होतें. गुजराथी गृहस्थांशीं ते गुजराथीमध्यें बोलत. उत्तर हिंदुस्थानांतील एखाद्या इसमाशीं गांठ पडल्यास किंवा ज्याला मराठी गुजराथी इंग्रजी ह्या भाषा समजत नाहींत अशांशीं ते हिंदी भाषेंत संभाषण करीत. त्यांनां पर्शियनहि व्यवहारापुरतें बोलतां येत असे. इस्लामी धर्माच्या एखाद्या विद्वान् गृहस्थाबरोबर बोलण्याचा प्रसंग आल्यास ते पर्शियन भाषा बोलत. एखादा शास्त्री पंडित असा

 १७६२

माणुस राजेसाहेबांच्या भेटीस येई तेव्हां त्याच्याशीं बोलतांनां उदाहरणा-दाखल पुष्कळ वेळां ते उत्तम उत्तम संस्कृत सुभाषितें ह्मणून दाखवीत. त्यांच्याशीं धर्मशास्त्रासंबधीं किंवा रूढीसंबंधीं वादविवाद करतांना ते साधक बाधक प्रमाणांचा खोल विचार करून पुढें आलेल्या प्रश्नांचा चांगला निर्णय लावून देत. बैरागी गोसावी वगैरे साधूंबरोबर बोलण्याचा प्रसंग येई तेव्हां ते तुलसीदासाचे दोहरे, कबीराचीं पदें, यांचा दाखल्या दाखल उपयोग करीत. भर्तृहरीचीं शतकत्रयें व चाणक्यनीतींतील सर्व श्लोक त्यांनां तोंडपाठ असत. येरव्हीं साध्या बोलण्यामध्यें सुद्धां मधून मधून ते निवडक मराठी ह्मणींचा व पंच तंत्र, इसाबनीती यांतील गोष्टींचा आणि तशाच तऱ्हेच्या इतर मार्मिक गोष्टींचा उपयोग करण्याची जणूं कांहीं त्यांनां संवयच पडून गेली होती. प्रत्येक समाजाची व पंथाचीं मर्म-स्थळें त्यांनां चांगलीं माहिती झालेहीं होती. त्यामुळें कोणत्याहि गोष्टीचा अवास्तव स्तुतीचा फुगा त्यांचे पुढें टिकाव धरीत नसे. त्यांच्या नेहमींच्या बोलण्यांत विनोद फार असे. परंतु तो अतीशय सभ्यपणाचा होता.

संस्थानांतील डोंगरी जातीच्या लोकांची भाषा मराठीच आहे. तथापि त्यांत अशुद्ध शब्दांचा भरणा इतका मोठा आहे व बोलण्याची ढब इतकी कांहीं चमत्कारिक आहे, कीं, मोठा मराठी भाषाकोविद असला तरी त्याला त्यांच्या भाषेचा उलगडा होऊन अर्थ समजण्याची मारामार पडेल. त्यांत जातिभेदपरत्वें फरक आहेत ते तर निराळेच; परंतु राजेसाहेबांची त्यांच्या भाषेसंबंधाची तयारी इतकी उत्तम होती, कीं, त्यांच्याकडे एकादा 'वारली' जातीचा इसम आल्यास त्याच्याशीं वारल्यासारखी कोळ्याशीं कोळ्यासारखी, ठाकूर आल्यास हुबेहुब ठाकरी भाषेप्रमाणें असे ते कित्येक वेळ त्यांच्याशीं बोलत बसत. यामुळें या गरीब प्रजांनां आपल्या राजाशीं बोल-तांना व त्याच्याजवळ आपली दाद लावितांना दुभाष्याची जरूर केव्हांच लागत नसे. आपल्या भाषेंत राजेसाहेब आपल्याशीं बोलत आहेत हें पाहून त्यांनां प्रेमाचें भरतें येऊन मोठी धन्यता आणि कौतुक वाटे.

राजेसाहेबांचें हस्ताक्षर वळणदार होतें; परंतु ते स्वतः आपल्या हातांनीं एखादें खाजगी पत्र अगर सरकारी कामकाजावर शेरा फारच क्वचित् लिहित. लिहिण्याचें हरएक इंग्रजी व मराठी काम मग तें खाजगी असो वा सरकारी असो, ते आपल्या खास हुजुर चिटणिसाकरवीं अगर इतर लायक विश्वासू माणसाकरवीं आपल्या नजरेसमोर करून घेत. तथापि त्यांत भाषेच्या रचनेसंबंधें किंवा योग्य अर्थ दाखविणाऱ्या शब्दांसंबंधें ते केव्हां केव्हां आपल्या हातांनीं फेरफार करून शोध घालीत असत. कांहीं कांहीं इंग्रजी सरकारी कामें तर त्यांनीं कै. श्री युवराज कृष्णशहा यांच्या हातून लिहिलेलीं या लेखकाच्या प्रत्यक्ष पहाण्यांत आलेलीं आहेत.

राजेसाहेब खाजगी व्यवहारांत मनस्वी साधे असत. पागेंत किंवा थट्टीमध्यें ते केव्हां केव्हां उघड्या जमीनीवर देखील बसत. त्याबद्दल त्यांनां बिलकूल विधिनिषेध वाटत नसे. परंतु दरबारच्या कामांत व इतर सरकारी व्यवहारांत त्यांचा थाटमाट राजाला शोभेल अशाच तऱ्हेचा असे. त्यांत कमीपणा झालेला त्यांनां बिलकूल खपत नसे. संस्थानीं लष्करी शिबंदी मुळींच नव्हती व नाहींहि. परंतु राजेसाहेबांनीं राजवाड्याच्या कांपौंडमध्यें "तिजोरी" व "जेल" कडे बंदोबस्ताकरितां ठेविलेल्या शिपायामध्यें एक जात पुरभय्ये परदेशी व अस्सल कोंकणी मराठे जवान यांचाच भरणा केला होता. शिवाय ह्याच लोकांचें व कांहीं शिकून तयार केलेले मुसलमान तरुणांचे त्यांनीं एक लहानसें स्वारांचें पथक बनविलें होतें. फार काय सांगावें त्यांनीं आपल्या खास तैनातींत जे हुजरे व पट्टेवाले बाळगिले होते त्यांमध्यें हुशार तेख पाणीदार व चलाख लोकांचाच समावेश केला होता. वरील सर्वांचे ड्रेस हत्यारेंपात्यारें वगैरे इतकीं सुंदर व चोख असत कीं लष्करी शिपायांत व त्यांच्यांत कोणत्याहि बाजूनें कोणालाहि केव्हांहि उणेपणा काढतांच आला नाहीं. दरबारचें काम करितांना वरील पैकीं कांहीं इसम, तसेच, भालदार चोपदार वगैरे ह्यांनीं जरूर त्या बंदोबस्ताकरितां हजर रहावयासच पाहिजे असा त्यांचा सक्त हुकूम असे. दरबारांतील किंवा स्वारींतील शिस्तींत व थाटांत यत्किंचितहि कमीपणा आढळलेला

त्यांनां पसंत पडत नसे. स्वारी मुंबई पुणें वगैरे ठिकाणीं गेली तरी तेथेंहि हाच थाट दृष्टीस पडत असे. फारतर काय पण राजेसाहेबांनीं ह्या ठिकाणीं सुद्धां आपली घोडा गाडी न्यावी. भाड्याच्या गाडींत कधींदेखील ते बसलेले कोणालाहि आठवत नाहीं. सरकारी व खासगी कामकाजासाठीं मुंबईस केव्हां केव्हां जाणें पडे त्याकरितां व कुमार साहेब कृष्णशहा हे तेथें शिकण्यास असले वेळीं त्यांच्याकरितां त्यांनीं स्वतंत्र बंगले भाड्यांनीं घेऊन ठेवले होते. राजेसाहेबांची अंगयष्टि सडसडीत होती. लहानपणीं पुण्यास शिकण्यास असल्या वेळीं त्यांनीं जुन्या पद्धतीची थोडीबहुत तालीम करण्याचा क्रम ठेविला होता. पुढें जव्हारीस आल्यानंतर वयमानपरत्वें तो सुटला, तथापि त्यांची इतर शारीरिक मेहनत–पायीं फिरणें, घोड्यावर बसून रपेट करणें वगैरेसारखी–नेहमीं चालू असे. त्यामुळें त्यांचें शरीर शेवटपर्यंत सुटसुटीतच राहिलें. पुणें येथें राजवाड्यामध्यें त्यांनीं आपल्याकरितां एक तालीमखान्याची जागा तयार करविली होती. जव्हार येथील तालीमखाना त्यांनींच बांधला. आरंभीं या खात्यावर वेताच्या काठ्यांवर मलखांबाच्या उड्या करणारा, दांडपट्टा, बोथाट्या वगैरेंचे हात उत्तम करणारा व कुस्त्यांचे डावपेचांत निष्णात असलेला असा एक तालीममास्तर नोकर ठेविला होता. तरुण पिढीनें शारीरिक मेहनत जरूर घेतली पाहिजे, असा यांचा कटाक्ष असे. त्या काळीं लांबलांबून येणारे उत्कृष्ट तालीमबाज धंदेवाले पैलवान् यांचे सामने व खेळ ते राजवाड्याच्या पुढील मोठ्या पटांगणांत मुद्दाम करीत. असल्या व इतर अशाच प्रकारच्या हरएक खेळांनां गांवच्या सर्व लोकांस ते आग्रहानें व प्रेमानें बोलावून आणीत. या पैलवानांनां राजेसाहेबांकडून त्यांच्या कल्पनेच्या बाहेर मौल्यवान् वस्त्रें व रोकड पैशांच्या रूपानें देणगी ( बिदागी ) मिळे. श्रीमहालक्ष्मीचे पटांगणांत त्यांनीं एक तात्पुरतें "पोलो"च्या खेळाकरितां रंगण तयार केलें होतें. ह्या खेळांत राजपुत्र, इतर तरुण मंडळी व स्वार हे सामील होत. क्रिकेट व टेनिस खेळण्याकरितां त्यांनीं राजवाड्यानजीकच्या जुन्या चौथऱ्यावर व सूर्यतलावानजीकच्या नवीन बांधलेल्या रहदारी बंगल्याशेजारीं चांगलीं क्रीडा-

गणें तयार केलीं होतीं. अद्यापिहि ह्या जागा असले खेळ खेळण्याकरतां उत्तम सोईच्या अशा मानिल्या जात आहेत.

राजेसाहेबांचीं राजकीय मतें Moderate स्वरूपाचीं होतीं. सार्वभौम इंग्रजसरकाराविषयींची त्यांची राजनिष्ठा व मित्रप्रेम फार उज्ज्वल होतें. परंतु, त्याविषयींची तोंडाची पोकळ वाच्यता करणें त्यांनां पसंत नव्हतें. तसेंच प्रचलित राज्यपद्धतीवर वाटेल तशी अद्वातद्वा टीका करून तोंडसुख घेणाऱ्या वर्गाचा ते अगदीं अंतःकरणपूर्वक तिटकारा करीत. राजनिष्ठेची कसोटी दाखविण्याची संधि ते मुळींसुद्धां वायां जाऊं देत नसत. मरहूम महाराज्ञी विक्टोरिया यांच्या दोन्ही वेळच्या जुबिलींच्या प्रसंगीं (सन १८७७ व सन १८९७) त्यांनीं आपली राजनिष्ठा प्रत्यक्ष सत्कृत्यांच्या रूपानें जगाच्या निदर्शनास आणिली. पुढें मरहूम सार्वभौम बादशाहा सातवे एडवर्ड यांच्या राज्यारोहणप्रसंगीं सुद्धां त्यांनीं आपली राजधानी सोडून दिल्ली वगैरे बाहेर ठिकाणीं न जातां जव्हारमध्यें आणि राज्यांत इतर ठिकाणीं तो मंगलकारक उत्सव साक्षात् आपल्या देखरेखी-खालीं फार थाटानें व हौसेनें आपल्या नेहमींच्या उदार स्वभावास अनु-सरून मोठ्या आनंदानें पार पाडला. त्यांचा बाणेदार व कडकडीत स्वभाव त्यांच्या शुद्ध राजनिष्ठेला केव्हांच आड आला नाहीं, हें सन १८९७ व १८९८ मध्यें ठाणे जिल्हा व त्याच्या आसपासचा भाग यांमध्यें माज-लेला दरोडेखोरांचा पुंडावा मोडण्याचे कामीं त्यांनीं जी मेहनत केली त्यावरून स्पष्ट होतें.

त्यांचीं सामाजिक मतें फार पुढें गेलेलीं अशीं नव्हतीं तरी, जुनें तें सर्व कांहीं चांगलें असें ह्मणणाऱ्यांपैकीं मात्र ते नव्हते. परिस्थितीप्रमाणें आपल्या चालीरीतींत समाजांचीं मनें न दुखवितां हळुहळू फेरफार करणें जरूरीचें आहे असें ते ह्मणत. पाश्चात्य चालीरीतींचें सर्वस्वी अविचारानें अनुकरण करणाऱ्यांचा ते मनःपूर्वक तिटकारा करीत. पण घेण्याजोग्या गोष्टी ते स्वतः आचरणांत आणीत.

आपल्या धार्मिक जुन्या गोष्टींबद्दल त्यांनां आदर असे. राजघराण्यांतील पूर्वापार चालत आलेले कुलधर्म व कुलाचार यथाविधि चालविण्याबद्दल ते फार दक्षता बाळगीत. तथापि ते कर्मठ मार्गांतले नव्हते. धार्मिक कृत्यांतील पोकळ दंभ त्यांनां बिलकुल आवडत नसे. मध्यंतरीं निघालेलें वेदोक्ताचें खूळ त्यांना पसंत पडलें नाहीं. धर्माचे बाबतींत फार खोल जाऊन कोणाचें मन दुखविण्याची त्यांची इच्छा नव्हती. आपल्या रयतेनें स्वधर्मानेंच वागावें अशाबद्दल ते वेळोवेळीं उपदेश करीत. विशेषत: त्यांच्या "राजकोळी" जातीचे ते एक प्रकारचे "शंकराचार्य"च असल्यामुळें त्या जातीच्या धार्मिक कृत्यांबद्दल व नैतिक आचाराविचारांबद्दल ते शुद्ध राहावे म्हणून फारच काळजी घेत. ढोंगी साधु, बैरागी, व पंचाक्षरी कुडबुडे जोशी, वगैरे भुलथापा देणाऱ्या लोकांच्या वचनावर व शब्दावर त्यांची बिलकूल श्रद्धा नसे.

राजेसाहेबांच्या स्वभावाचें, रहाणीचें व गुणांचें वरील त्रोटक वर्णन वाचून आमच्या मर्मज्ञ वाचकवृंदास त्यांच्या सुखकर कारकीर्दीची चांगली कल्पना होईलच. त्याच त्यांच्या गुणांसंबंधें थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे त्यांचा आश्रय कोणाकोणाला नव्हता म्हणून सांगावें ? यःकश्चित् दारोदर भीक मागणाऱ्या गारोड्यापासून तों इंग्लंडसारख्या सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या देशामध्यें उच्च दर्ज्याचें शिक्षण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस खेडोखेडीं सडकेवर नाड्यांवर चढून खेळ करून दाखवून पोट भरणाऱ्या गरीब कोल्हाटी लोकांपासून तों हिंदुस्थानांतील सर्कसीचे आद्य संस्थापक जे कै. प्रो. विष्णुपंत छत्रे यांच्या सर्कशीस, बालेघाटी खेडवळ लावण्या व पोवाडे म्हणणाऱ्या तमासगीर गोंधळीलोकांपासून तों सशास्त्र रुद्रवीणा वाजविणाऱ्या तंतुवाद्यविशारदांस, निरनिराळ्या प्रकारचीं हुबेहूब सोंगें आणून पोटासाठीं गांवोगांव भटकणाऱ्या बहुरूप्यांपासून तों कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या सुप्रसिद्ध संगीत नाटकास, आपल्या राज्यांतील जंगली अडाणी प्रजेस गांवकीचें तोरण बांधण्याबद्दलच्या लहानशा वर्गणीपासून तों एकंदर व्यक्तिमात्राच्या

हितासाठीं जमा होत असलेल्या प्रचंड फंडास ह्या राजेसाहेबांचा उदार आश्रय मिळाला नाहीं असें कधींच झालें नाहीं. एकंदरींत राजेसाहेब हे स्वतःच उत्तम असल्यानें उत्तम माणसाची पारख कशी करावी याची हातोटी त्यांनां फार उत्तम साधल्यानें अर्थात्च त्यांचे पदरीं उत्तम सल्लागार, उत्तम कारभारी, उत्तम कारकून, उत्तम हरिदास, उत्तम शास्त्री, उत्तम वीनकार,उत्तम पखवाजी,उत्तम कारागीर, उत्तम स्वार,उत्तम शिपाई, उत्तम वाजन्त्री, उत्तम भालदार, उत्तम सिंगाड्या याप्रमाणें सर्व आश्रित जनांत उत्तमांचाच भरणा झाला होता. एक माणसाची निवड उत्तम झाल्या कारणानें मुक्या जनावरापासून तों तहत निर्जीव वस्तूपर्यंत जें जें कांहीं राजेसाहेबांनीं आपल्याजवळ बाळगिलें होतें त्यांत टाकाऊ असें कांहींच नव्हतें. या वर्णनामध्यें लेखकानें आपल्या लेखणींस अतिशयोक्तीचें तोंडसुख घेण्याची जणू कांहीं अपूर्व मुभा दिली आहे असें प्रथमदर्शनीं कोणत्याहि नवख्या वाचकास वाटेल आणि तसें तें वाटणें अगदीं साहजिक आहे; परंतु ज्यानें श्रीमंत महाराजांची कारकीर्द समक्ष पाहिली आहे त्यास मात्र आमच्या लिहिण्याची सत्यता पूर्ण पटेल; इतकेंच नव्हे तर हें वरील वर्णन पुष्कळ अंशीं अपुरेंच आहे असे त्याच्या तोंडून उद्गार निघाल्याविना रहाणार नाहींत. याचे प्रचीतीसाठीं आमच्या चरित्रनायकाचे मृत्युलेख, जे त्या वेळीं प्रसिद्ध झाले आहेत त्यांत सुप्रसिद्ध विद्वान् वृत्तपत्रकारांनीं त्यांच्यासंबंधीं आपलीं जीं मतें प्रकट केलीं आहेत त्यांपैकीं कांहींचा उल्लेख केल्याविना आमच्यानें रहावत नाहीं.

The Times of India, Bombay, 30th June 1905.

Death of Raja of Jawhar.

A Sympathetic Ruler.

We regret to announce the death of His Highness Malhar Rao alias Patang Shah, Raja Saheb of Jawhar, which took place at 1-30 A. M. on the 27th inst in the State Palace at Jawhar. The lamented chief had endeared himself by his kind and sympathetic rule to all the

sections of his subjects, and the Jawhar State enjoyed under his regime a period of prosperity and contentment. His Highness took an earnest interest in the welfare of his people, and his liberality towards those needing help and succour was worthy of admiration.

The late chief during his minority received his education at Poona, and had benefit of being guided in his studies by wise and cultured men. In his youthful days he was known to be an enthusiastic sportsman, and his reputation as a courageous rider, a keen judge of horseflesh, and an excellent shooter went beyond the limits of his territory. His love of horses led to the maintenance of the large stables which his State Palace possesses, and in which some of the finest horses are to be seen. His Highness was a Chief of remarkably simple habits, + + × × × + But behind his simple bearing he possessed a noble and generous heart, going out in genuine sympathy to those confiding in his care. His death will be greatly mourned not only by the people of his territory, but also by a large number of friends and admirers throughout this Presidency.

---

The Advocate of India,
Bombay, 30th January 1905.
Death of the Raja of Jawhar.

The death occurred on the 27th inst. in the capital of hir State of His Highness Malhar Rao Saheb of Jawhar. The late Chief was a wise and sympathetic ruler and his rule has been marked by many improvements effected in the State.

---

केसरी–पुणें, ता. ३१ जानेवारी १९०५

जव्हार संस्थानचे अधिपति श्रीमंत राजे पतंगशहा यांस गेल्या शुक्रवारीं पहाटेस २ वाजतां देवाज्ञा झाली. हें दुःखकारक वर्तमान ऐकून आमचे वाचकांपैकीं पुष्कळांस फार वाईट वाटेल यांत संशय नाहीं. +++

सन १८७८ सालीं राजेसाहेब यांनां राज्याचे पूर्ण अधिकार दिले. तेव्हां-पासून आज सव्वीस वर्षें राजे पतंगशहा यांनीं आपल्या लहानशा पण टुमदार संस्थानाचा कारभार बिनबोभाट व फार उत्तम रीतीनें चालविला. त्यांचा स्वभाव जात्याच उदार व गोड असून वृत्ति नेहमीं आनंदित असे. त्यांस अर्वाचीन पद्धतीचें इंग्रजी शिक्षण बरेंच मिळालें होतें, व कै. राव-साहेब मंडलीक व कै. बापूसाहेब आठले यांचेसारख्यांच्या सहवासानें व हरएक प्रसंगीं मिळणाऱ्या सल्लामसलतीनें त्यांस कोणतीहि अडचण सहसा येत नसे. इंग्रज सरकाराशीं त्यांचें वर्तन नेहमीं सरळ व प्रेमाचें असे व त्यामुळें गव्हरनरपासून सर्व अधिकारी त्यांस फार मान देत असत. आपल्या रयतेस संतुष्ट ठेवणें हेंच संस्थानिकांचें मुख्य कर्तव्य असें ते समजत व त्याप्रमाणें आपल्या राज्यांतील व बाहेरील सर्व विद्वान् व योग्य माणसांचा परामर्श घेण्यास व संस्थानांतील गरीब प्रजेस धान्याची मदत करणें, रस्ते व विहिरी बांधणें वगैरे अनेक लोकोपयोगी कामें करण्यास ते नेहमीं तयार असत.+ + + + +

---

नेटिव ओपिनिअन, मुंबई, ता. १ फेब्रुआरी १९०५.

जव्हार संस्थानच्या राजेसाहेबांचा मृत्यु— आह्मास कळविण्यास अत्यंत दिलगिरी वाटते कीं ठाणें जिल्ह्यांतील जव्हार संस्थानचे राजेसाहेब श्री. मल्हारराव ऊर्फ पतंगशहा यांस गेल्या शुक्रवारीं देवाज्ञा झाली. × × × त्यांनां आपल्या संस्थानचा राज्यकारभार पाहाण्याचा अधिकार मिळाल्या-पासून शेवटपर्यंत त्यांनीं आपल्या संस्थानचा कारभार मोठ्या हुषारीनें व दक्षतेनें चालवून आपल्या प्रजेची चांगली प्रीति संपादन केली होती. प्रजेचें जें हित तेंच आपलें हित असें ते नेहमीं मानून त्याप्रमाणें वागत असत. त्यांस शिकारीचा व घोड्यावर बसण्याचा फार नाद असे. त्यांची राहाणी अगदीं साध्या तऱ्हेची असे. + + + त्यांच्या मृत्यूनें त्यांच्या प्रजेस फार हळहळ वाटेल एवढेंच नव्हे, पण महाराष्ट्रांतील ज्या ज्या मनुष्यास त्यांची माहिती आहे त्यास वाईट वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

इंदुप्रकाश—मुंबई,
ता. ३० जानेवारी १९०५.

श्री. राजे पतंगशहा यांचा मृत्यु—हिज हायनेस श्री. महाराज पतंगशहा राजेसाहेब सं. जव्हार यांस पक्षघाताचे आजारानें ता. २७ जानेवारी रोजीं प्रातःकाळीं २ राजतां जव्हार येथें देवाज्ञा झाली हें कळविण्यास आह्मांस अत्यंत दुःख वाटतें. + + + ते आपल्या साध्या व प्रेमळ स्वभावानें सर्वांस प्रिय असत. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व कुंटे ह्यांच्या शिक्षणाच्या व निकट परिचयाच्या आपल्यास झालेल्या लाभाबद्दल त्यांस अखेरपर्यंत मोठा अभिमान वाटे. × × × त्यांनां आपल्या संस्थानचे कारभाराची मुखत्यारी मिळाल्यापसून ते कै. रावसाहेब मंडलीक, बापूसाहेब आठल्ये, माधवराव आपटे ह्यांची मित्रत्वाच्या नात्याचे कामांत हमेष सल्ला घेऊन आपला कारभार बिनबोभाट चालवीत. × × × जे बांधीव रस्ते व विहिरी हल्लीं त्या संस्थानांत दृष्टीस पडतात, त्यांचें सर्व श्रेय राजे पतंगशहा यांजकडेसच आहे. + + + कै. पतंगशहा यांची स्वधर्माचे ठिकाणीं फारच निष्ठा होती, व धार्मिक कामाकडे त्यांचा बराच व्यय होत असे. शिक्षणसंबंधी नवीन उपयुक्त संस्थांस यथाशक्ति मदत करण्यास ते नेहमीं तयार असत. मात्र आपल्या देणगीची प्रसिद्धि होऊन त्याबद्दल आपली कोणी स्तुति करणें ह्याचा त्यांस मनःपूर्वक तिट्कारा होता. पुणें मुंबई—सारख्या ठिकाणच्या वारंवार यात्रा करण्यापेक्षां आपले संस्थानीं कांहींसें एकांतवासांत राहाणें त्यांनां फार आवडे.

---

अरुणोदय—ठाणें, ता. ५ फेब्रुवारी १९०५.

श्री. महाराज पतंगशहा राजेसाहेब यांचा मृत्यु ! श्री. महाराज पतंगशहा राजेसाहेब हे ठाणें जिल्ह्यांतील जव्हार संस्थानचे अधिपति होते, यामुळें आह्मां ठाणे जिल्ह्यांतील लोकांस त्यांच्या निधनामुळें विशेष वाईट वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. ++++ १८७८ सालीं त्यांच्या हातीं राज्यसूत्रें आलीं व तेव्हांपासून त्यांनीं आपला कारभार प्रजावत्सल, न्यायी, परोपकारी, व

अभिमानी बाण्यानें चालविला होता. ++++ संस्थानच्या कारभारांत जेव्हां एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करणें असे तेव्हां ते कै. राव-साहेब मंडलीक, बापूसाहेब आठल्ये, माधवराव आपटे इत्यादि विद्वान् लोकांची सल्ला घेत असत. श्रीपतंगशहा हे जितके प्रजावत्सल होते तितकेच ते राजनिष्ठहि होते.+++ त्यांच्या प्रजावत्सलपणाची साक्ष त्यांनीं मदत दिलेली त्यांची हल्लींची प्रजा तर देईलच, परंतु मर्त्य मानवजातीपेक्षांहि अधिक दिवस टिकणारे साक्षीदार अथवा स्मारकें त्यांनीं आपल्या राज्यांत करून ठेवलेलीं आहेत व तीं विहिरी व रस्ते हीं होत.XXX त्यांची धर्म-निष्ठा दांडगी होती. त्यांचा स्वभाव उदार होता व त्यामुळें शिक्षणसंस्था वगैरेसारख्या गोष्टींस ते वारंवार प्रोत्साहन व मदत करीत; परंतु ते खरे उदार असल्यामुळें आपल्या देणगीबद्दल त्यांची स्तुति केलेली त्यांस खपत नसे. XXXX त्यांस उगीचच मुंबईच्या वाऱ्या कराव्याशा वाटत नसत. किंबहुना त्यांस संस्थानांतील एकांतवासच अधिक प्रिय वाटे. त्यांच्या संबंधींच्या आणखी पुष्कळशा गोष्टी त्यांच्या चरित्र लेखनांत लिहितां येण्यासारख्या आहेत.

# प्रकरण सातवें.

## उपसंहार.

आह्मी या संस्थानची ४० वर्षांपूर्वीची स्थिति कशी होती याचें थोडेंसें दिग्दर्शन मागें केलें आहेच तेव्हां त्या स्थितीचें चित्र व हल्लींच्या स्थितीचें चित्र हीं दोन्हीं डोळ्यांसमोर धरिलीं ह्मणजे श्रीमंत कै. पतंगशहा राजेसाहेब यांनीं हें पुरातन संस्थान सुधारण्याचे कामीं किती अविश्रांत श्रम केले ते वाचकांचे मनावर नीट प्रतिबिंबित होतील. इतकी शांततेची, सुखाची व प्रागतिक कारकीर्द संस्थानच्या गादीवर गेल्या पावणेसहाशें (५७५) वर्षांत जितके राजे बसले त्या कोणाचीहि झाली नसावी असें ह्या संस्थानसंबंधें आज जे कागद उपलब्ध आहेत त्यांवरून अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं. आतां शेवटीं इतकेंच लिहितों कीं, आज जी जी चांगली गोष्ट, जी जी सुधारणा, जी जी सोय जव्हारमध्यें दृष्टोत्पत्तीस येत आहे त्या सर्वांचें जनकत्व आमच्या चरित्रनायकाकडेसच आहे, व असें होण्याला त्यांनां चांगलीं माणसें लाभलीं व तीं बराच काळ टिकलीं हा एक परमेश्वरी योगायोगच ह्मणावयाचा. जव्हार संस्थानच्या अधिपतींच्या मालिकेमध्यें ह्यांनां " Patangshah The Peace Maker." असें ह्मणणें अगदीं अयोग्य होणार नाहीं.

या लेखकानें व त्याच्या पूर्वजांनीं ह्या संस्थानच्या परमपूज्य गादीची नौकरी सुमारें एक शतकपर्यंत इमानेंइतबारें व अविच्छिन्न केलेली असून चरित्रनायकाशीं त्याचा व त्याचे वडिलांचा कित्येक वर्षेपर्यंत साक्षात् निकट संबंध असल्यानें या लेखांत स्वानुभवाच्या अशा खऱ्या खऱ्या गोष्टीच ग्रथित केल्या आहेत. असो.

राजेसाहेबांच्या निधनानंतर त्यांचे वडील चिरंजीव श्री. महाराज कृष्णशहा राजेसाहेब हे राज्याचे मालक झाले. त्यांना संस्थानच्या कारभाराची मुखत्यारी सन १९०५ च्या एप्रील महिन्यांत मिळाली. ते सुशिक्षित, प्रेमळ व रसिक असत. त्यांचा स्वभाव मिडस्त असे. अपशब्द चुकून-

सुद्धां ते कधीं उच्चारीत नसत. यांची बुद्धि फार तीव्र होती. प्रत्येक विषयाचें आपल्याला मार्मिक ज्ञान असावें अशी यांची इच्छा असून तदनुरोधानें ते प्रयत्न करीत. हे इंग्रजी फार सुंदर बोलत. यांचें मराठी व इंग्रजी हस्ताक्षर इ[illegible] कृष्ट होतें, कीं, चांगल्या कारकुनास तें पाहून लाजच वाटावी. [illegible] भाषा लिहिण्याची शैली मोठी विनोदप्रचुर पण मृदु असे [illegible] अंतःकरणास त्यामुळें गुदगुल्याच होत. ह्यांच्या कारकीर्दी[illegible] ची फार वृद्धि झाली. जव्हार येथें पाण्याची सोय करणें व [illegible] तू पक्की सडक करणें हे त्यांचे मोठे उद्देश होते. परंतु ते तडीस [illegible] कालाची अवधि परमेश्वरानें त्यांस दिली नाहीं.

ह्यांचे [illegible] जव्हार येथें तार ऑफिस उघडण्यांत आलें. ब्रिटिश सरकारक[illegible] मानपूर्वक दिल्लीदरबारनिमित्त कारोनेशन मेडल् देण्यांत आलें होतें [illegible] ३।३।१४ रोजीं जी हिंदीसंस्थानिकांची कान्फरन्स भरली होती [illegible] जर होते. असो. त्यांच्या संबंधाच्या आणखी पुष्कळशा गो[illegible] चरित्रलेखनांत लिहितां येण्यासारक्या आहेत. यांनीं संस्थानचा [illegible] र उत्तमप्रकारें सुमारें १२ वर्षें केला. दुर्दैवानें ते अकालीं[illegible] राजे ता. १६।११।१७ रोजीं मृत्यु पावले.

पुढें [illegible] आमच्याचरित्रनायकांचे कनिष्ठ चिरंजीव **मार्तंडराव** **भाऊसाहे**[illegible] **मशहा राजेसाहेब** हे गादीचे मालक झाले. त्यांना ब्रिटिशसरका[illegible] . १५।४।१८ रोजीं राज्यकारभाराची पूर्ण मुखत्यारी मिळाली. हे [illegible] ष्ठ व दयाळू असून अत्यंत पितृभक्त आहेत. आपल्या वडि[illegible] मार्गावर त्यांची दृढतर श्रद्धा असून दैवयोगानें त्यां[illegible] गुणे यांच्यासारखा विद्वान् ब्रिटिशमुलखांत सर[illegible], अनुभवी व पोक्त कारभारी लाभल्यानें व [illegible] आहेची निवड झाली असल्यानें त्यांनीं थोड्याच अव[illegible] रणा घडवून आणल्या त्यांपैकीं कांहींचा येथें निर्देश [illegible] गनें रहावतच नाहीं.

महायुद्धामध्यें ब्रिटिशसरकारास जो अपूर्व जय मिळाला तत्प्रीत्यर्थ श्रीमंतांनीं आपल्या रयतेस त्यांच्या मालकी जमिनीवरील झाडोऱ्याची मालकी दिल्याचें जाहीर केलें. यामध्यें त्यांचा मुत्सद्दीपणा राज्यकारभाराचें उदार धोरण व साम्राज्य सरकाराविषयीं एकांत राज-निष्ठा ह्या गोष्टी जगाच्या चांगल्या निदर्शनास आलेल्या आहेत. तसेंच जव्हार येथें स्वतंत्र रीतीनें म्यु. पा. ची स्थापना व जांभुळविहिरीनजीक तलाव करून पाण्याची सोय करणें, ह्यांवरून प्रजेच्या कल्याणाकडे व स्.ईकडे ह्यांचें फार बारीक लक्ष आहे हें दृग्गोचर होतें. मागील कारकीर्दींत सुरू झालेल्या तलवाडे मलवाडे रोडचें कामही हातीं घेण्यांत आलें आहे. असो. याप्रमाणें पुष्कळच गोष्टी नमूद करतां येण्यायोग्या आहेत, परंतु स्थलसंकोचास्तव त्या येथें दिलेल्या नाहींत.

वर ज्या सुधारणा सांगितल्या त्यांवरून व हल्लीं होत आहेत त्यांवरून त्यांच्या राज्यकारभाराचें जें धोरण त्यांनीं स्वीकारलें आहे तें त्यांनां फारच भूषणावह आहे. त्यांच्या वडिलांनीं जव्हार संस्थानच्या राज्यकारभाराचा जो पक्का मार्ग अत्यंत मेहनतीनें तयार केला आहे तो तसाच कायम टिकवून त्यास सर्वांगसुंदर करण्याच्या ज्या त्यांच्या इच्छा त्या तो जगच्चालक प्रभु सुफलित करो, व त्यांची कारकीर्द दीर्घकाल लाभून ती सर्व प्रजाजनांना अत्यंत सुखदायक होवो.

श्री.विक्रमशहा राजेसाहेब यांचें पहिलें कुटुम्ब श्री.सौ. ह्याळसाबाईसाहेब या ता. १।६।१९१५ रोजीं वारल्यानंतर पुढील वर्षाच्या मार्च महिन्यांत ता. ६।३।१९१६ रोजीं राजेसाहेबांचा मोखाडे पेठ्यांतील मौजे वाशाळे गांवचे रहाणार मंबाजी पाटील नडगे ह्यां [illegible] न्येशीं द्वितीय शरीरसंबंध झाला. ह्याच हल्लींच्या राणीसाहेब [illegible] गुणाबाईसाहेब होत. नांवाप्रमाणें त्या खरोखर गुणवतीच [illegible] एकंदर सर्व प्रकारचें शिक्षण घेण्याचा त्यांचा जो हल्लीं उपक्रम आहे त्यांत सर्वशक्तिमान् प्रभु त्यांनां यश देवो, व थोरल्या पतंगशहा राजेसाहेबांच्या मातोश्री-

प्रमाणें ह्याहि उत्तम प्रकारें नांवाजल्या जावोत. श्रीमंतांच्या हुरुपास च उत्साहास आणि अखिल प्रजाजनांस अत्यानंद वाटण्याजोगी गोष्ट ह्मटली ह्मणजे त्यांनां ता. ११ माहे दिजंबर सन १९१७ रोजीं झालेलें पुत्र-रत्न,होय. हे छोटे कुमारसाहेब आमच्या चरित्रनायकांचें नांव यथार्थ करोत एवढेंच नव्हे तर ते जव्हार संस्थानच्या इतिहासांत "सवाई पतंगशहा" व्हावेत अशी त्या जगन्नियंत्याजवळ आमची प्रार्थना आहे.

शेवटीं या लेखकाची त्या दीनदयाळ परमेश्वराजवळ अनन्यभावें हीच प्रार्थना आहे, कीं, त्यानें आमचे प्रभु हल्लींचे संस्थानचे अधिपति श्री. विक्रमशहा राजेसाहेब व चक्रवर्ती हिंदुस्थानचे बादशहा पंचम जार्ज यांनां उदंड आयुष्य द्यावें व त्यांचे हातून उत्तरोत्तर या पुरातन संस्थानची अधिकाधिक भरभराट व्हावी.

समाप्त.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

REFBK-0001762

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५०६२
शाखा